'मराठी शारदियेच्या चंद्रकळा'

मराठी उच्च अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तक

संपादन
सुमन बेलवलकर

भारतीय भाषा संस्थान
मैसूर - 570 006.

मराठी शारदियेच्या चंद्रकळा
मराठी उच्च अभ्यासक्रमासाठी पाठयपुस्तक

CENTRAL INSTITUTE OF INDIAN LANGUAGES
PUBLICATION NO.453

Major Indian Languages: Marathi

जैसे शारदियेचे चंद्रकळे -। माजि अमृतकण कोवळे
ते वेचिती मने - मवाळे । चकोरतलगे।।
तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा
अति हळुवारपण चित्ता । आणुनिया ।।

-ज्ञानेश्वर

‘मराठी शारदियेच्या चंद्रकळा’

मराठी उच्च अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तक

संपादन

सुमन बेलवलकर

भारतीय भाषा संस्थान

मैसूर - 570 006.

Marathi Shardiyocya Candrakala, an Advanced Course in Marathi
Edited by Suman Belwalkar

January 2000

First published: ——————

Agrahayana 1921

Address for correspondence:

Director
Central Institute of Indian Languages
Manasagangotri, Vinoba Road
MYSORE 570 006, INDIA.

Phone: 91-821-515558, 515820
Telex: 0846-268 CIIL IN
E.mail: ciil@giasbg01.vsnl.net.in

Grams: BHARATI
Fax: 0091-821-515032
Website: http://www.ciil.org

ISBN-81-7342-059-9

Price Rs. 120/

Published by Dr. Omkar N. Koul, Director for
Central Institute of Indian Languages, Mysore.
Printed by Mr. S.B.Biswas, Manager, at
CIIL Printing Press, Manasagangotri, Vinoba Road,
Mysore 570 006, India.
Production: K. Srinivasacharya

FOREWORD

The Central Institute of Indian Languages was established on 17th July 1969 to help, evolve and implement the language policy of the Government of India and to coordinate the development of Indian languages through research, training, material production for their use in education, administration and other public domains. The Institute has seven Regional Language Centres to impart 10 months intensive training in modern Indian languages to the teachers deputed by their respective State Governments and Union Territories. The training programme is divided into three levels; Basic Course, Intermediate Course and Advanced Course. The Centres produce different types of instructional materials including audio-visual aids.

The materials which are produced in the Regional Language Centres are specialized in nature and are designed to suit the needs of the second language learners to develop all the four skills, namely, listening, speaking, reading and writing within a short duration of 10 months.

The Basic Course primarily aims at developing the skills of listening and speaking; the Intermediate Course aims at developing the skills of reading and writing; and the Advanced Course aims at developing interest and skill in appreciation of literature in the concerned language.

The present volume, *Marathi Shardiyocya Candrakala,* an Advanced Course in Marathi edited by Ms. Suman Belwalkar is designed to suit the needs of the learners of Marathi as a second language at the advanced level. I hope that the learners of Marathi as a second language will find this book quite useful.

(Omkar N. Koul)
Director

डॉ विजया चिटणीस - माडगूळकर
यांच्या स्मृतीस

ACKNOWLEDGEMENT

I am grateful to the authors/poets and copyright holders for their generous permission to include their materials in this book; Shri S.K. Padhye, Editor 'Samagra Keshavsut' for *'nava shipai'* (poem), Shri P.L. Deshpande for *'sundar mi honar'*, Shri Daya Pawar for *'baluta'*, Shri Mangesh Padgaonkar for *'jypsee'* (poem), Smt. Shireesh pai for her father's writing *'to mi navech'*, Shri S.N. Pendse for *'garambicha bapu'*, Smt. Indira Sant for *'ashich yete kadhi ekada'* (poem), Shri Shivajirao Ghate for his father's work *'maharashtrache man'*, Smt. Veera Sharma for her mother's work *'mich he sangitala pahije'*, Shri Jayawant Dalvi for *'sare pravasi ghadiche'*, Shri N.D. Maharor for *'ranatalya kavita'* (poem), Shri V.D. Madugulkar for *'kavla'*, Shri M.V. Madgulkar for his mother's essay *'shaleya marathi ani zopadpathi* and Shri S.P. Bhagwat (Publisher) for Dr. N.G. Kalelka's *'payashuduha marathi'*.

With deep sense of gratitude, I thank all the authorities who have given permission to use their material.

I am thankful to Dr. E. Annamalai, Dr. M.S. Thirumalai and Professor A.R. Kelkar for their guidance and valuable suggestions.

I also thank Dr. Usha Nair, Principal, Western Regional Language Centre, my colleagues Dr. K.P. Lekhwani and Dr. Mrs. M.K. Sampat for their encouragement. I am grateful to the Publication Unit of the Central Institute of Indian Languages and the staff.

Suman Belwalkar

अनुक्रमणिका

गद्यविभाग

पद्यविभाग

प्रस्तावना

भारतीय भाषा संस्थान, मैसूर या संस्थेने भारतातल्या माध्यमिक शिक्षकांना प्रादेशिक भाषांचे प्रशिक्षण देण्यासाठी क्षेत्रीय भाषा केंद्रांची स्थापना केली. त्रिभाषासूत्राची अंमलबजावणी करताना तिसरी भाषा म्हणून भारतातली कोणतीही प्रदेशिक भाषा शालेय विद्यार्थ्यांना शिकवता येणे या प्रशिक्षणामुळे शक्य झाले आहे. या योजनेअंतर्गत मराठी भाषेच्या अभ्यासक्रमातील 'मराठी शारदियेच्या चंद्रकळा' हे तिसरे पाठयपुस्तक प्रकाशित स्वरूपात सादर करताना मला अतिशय आनंद वाटतो आहे.

हे पाठयपुस्तक हातात घेण्यापूर्वी प्रशिक्षणार्थ्यांनी भाषाशिक्षणाचे दोन टप्पे ओलांडलेले असतील. पहिला मराठी संरचना शिकवणारा प्राथमिक अभ्यासक्रम. यासाठी डॉ. विजया चिटणीस यांनी लिहिलेले 'An Intensive Course in Marathi' हे पाठयपुस्तक पूर्वीच प्रकाशित झाले आहे नंतरच्या माध्यमिक अभ्यासक्रमात मराठी संस्कृती, जीवनपध्दती यांचा परिचय करून देणारे 'मराठी जीवन छटा, हे पाठयपुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. त्यापाठोपाठ मराठीतल्था संपन्न साहित्याचा आस्वाद घडवण्यासाठी उच्च अभ्यासक्रमाचे हे पाठयपुस्तक 'मराठी शारदियेच्या चंद्रकळा'या नावाने प्रसिद्ध होत आहे. कोणत्याही परभाषिकाला मराठीचे अध्ययन करण्यासाठी 'अक्षरांपासून अक्षरवाङ्मयापर्यंत' घेऊन जाणारी श्रेणीबद्ध आणि सलग अशी ही तीन पाठयपुस्तकांची मालिका आहे.

या पाठयपुस्तकाचे शीर्षक 'शारदियेच्या चंद्रकळा, या ज्ञानेश्वरांच्या शब्दांनी मंडित आहे. श्रोत्यांनी कोमल मनाने आपली कथा अनुभवावी अशी विनंती करताना ज्ञानेश्वरांनी ही सुंदर कल्पना मांडली आहे. इथे परभाषा म्हणून मराठी शिकणारी जी 'चकोरतलगे' आहेत त्यांच्या चोचीतले बळ ध्यानी घेऊन या शीर्षकाची योजना केली आहे.

भाषेच्या अध्ययनाची यात्रा त्या भाषेतल्या अभिजात साहित्याचे 'धाम' गाठल्याशिवाय पूर्ण होत नाही. परंतु अशा विद्यार्थ्यांसाठी साहित्याची निवड करताना त्यांची मर्यादित भाषाशक्ती विचारात घ्यावीच लागते. त्यामुळे वाङ्मयेतिहासाच्या कालानुक्रमे मराठी साहित्यात आलेले सर्व प्रवाह अशा पाठयपुस्तकात समाविष्ट करता येत नाहीत परभाषिकांसाठी मराठी साहित्याच्या इतिहासाचा धावता आढावा, स्वतंत्र पुस्तकरूपात प्रसिद्ध होत आहे. या दृष्टीने काही संतकविता वगळता मध्ययुगीन मराठी साहित्याचा अंतर्भाव या पुस्तकात केला नाहं. तसेच दिग्गज साहित्यिकांचे जे लेखन मराठी वाचकांना आवडले; ते तसेच डोळे मिटून परभाषिकांसाठी उचलता येत नाही. इथे आकलनाच्या कक्षेचा प्रथम विचार करावा लागतो यामुळेच पु.ल. देशपांडे आणि आचार्य अत्रे यांचे विनोदी साहित्य बाजूला ठेवून त्यांच्या नाटकांमधले 'गंभीर' उतारे इथे घेतलेले दिसतील. असे असूनही मराठी साहित्यात ज्यांनी मोलाची भर घातली अशा शक्य तितक्या साहित्यिकांच्या लेखनाची तोंडओळख करून देण्याचा हा प्रयत्न आहे. या पाठांचा अनुक्रम, आशय, भाषेची आकलनीयता यांचा विचार करून बनवलेला आहे; त्याचा साहित्यिकांच्या ज्येष्ठतेशी वा श्रेष्ठतेशी संबंध

नाही हे ध्यानात ठेवावे लागेल. यात नाटक, आत्मचरित्र, कादंबरी, ललित निबंध, प्रवासवर्णन, वैचारिक निबंध, विनोद इ. निरनिराळे वाङ्मयप्रकार आले आहेत. अहिराणी, कोकणी, सातारी या बोलींचे नमुने आहेत निसर्गवादी, भाषापंडित, शेतकरी, विदुषी, दलित, पददलित या सर्वांच्या जीवनाचे दर्शन या साहित्यातून घडते. मराठीत 'ज्ञानपीठ पारितोषिक' हा सर्वोच्च साहित्यिक बहुमान लाभलेल्या 'ययाति' कादंबरीतील उता-याचा या पुस्तकात आवर्जून समावेश केला आहे. यातले बरेच लेखक साहित्य अकादमीने त्यांच्या दर्जेदार ग्रंथनिर्मितीसाठी गौरविलेले आहेत. समृद्ध अशा मराठी साहित्याच्या या कणदर्शनाने वाचकाला मुळातून हे साहित्य वाचण्याची प्रेरणा व्हावी हा यामागे हेतू आहे. या पुस्तकासाठी साहित्यातल्या काही उता-यांची निवड डॉ. विजया चिटणीस यांनी केली होती. त्यांच्या मार्गदर्शनानुसार इतर पाठ आणि कवितांची भर घातली गेली. प्रत्येक पाठासाठी लेखक परिचय, शब्दार्थ, सांस्कृतिक टिपा, आकलनात्मक प्रश्न, भाषाभ्यास आणि पूरक लेखन । वाचन हा भाग मी तयार केलाः

यातील लेखक परिचय प्रमुख्याने परभाषिकाच्या दृष्टीने उपयुक्त ठरावा असाच प्रत्येक ठिकाणी लिहिला आहे. शब्दार्थ केवळ कोशाप्रमाणे न देता त्याचा वापर लक्षात घेऊन खुलासावजा दिले आहेत. साहित्याला चिकटून येणारे काही सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ चांगले समजल्याशिवाय आकलन स्पष्ट होत नाही; यासाठी आवश्यक तिथो सांस्कृतिक टिपाही दिल्या आहेत. आकलनात्मक प्रश्नांमधे प्रामुख्याने छोटे प्रश्न, संदर्भासह स्पष्ट करण्यासाठी वाक्ये, काही टिपा यांचा समावेश आहे, तर भाषाअभ्यासात वाक्प्रचार, समानार्थी - विरुध्दार्थी शब्द, काही शब्दांचा खुलासा दिला आहे. वाक्यरचनेची प्रसंगानुरूप उदाहरणे देऊन तशाप्रकारची वाक्ये विधार्थ्यांनी करावीत अशी अपेक्षा नोंदवली आहे. हे सर्व प्रश्न प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी स्वतः नवनव्या रचना कराव्या या हेतूने बनवलेले आहेत. भाषेतील अर्थाच्या छटा अणि अभिव्यक्तीचे सामर्थ्य यांचा क्रमशः परिचय व्हावा अशीही अपेक्षा आहे. पूरक लेखन/वाचनासाठी दिलेल्या सूचना केवळ 'गृहपाठ' म्हणून नाहीत. विद्यार्थ्यांना वाचनाबाबत काही दिशा देणे आणि त्यांचे विचार व्यक्त करण्याची संधी देणे या दुहेरी हेतूने हे प्रश्न विद्यार्थ्यांसाठी दिले आहेत. यात सुचवलेले सर्व वाचन उच्च अभ्यासक्रमाच्या वेळात होणे शक्य नाही याची कल्पना असूनही 'काय वाचावे' यासंबंधी पुढेही मार्गदर्शन करण्याचा हा प्रयत्न आहे. हे सर्व स्वाध्याय तयार करताना डॉ. एम्. एस. तिरुमलै (माजी उपसंचालक, भारतीय भाषासंस्थान, मैसूर) यांच्या अनुभवी मार्गदर्शनाचा मला अतिशय उपयोग झाला. पुस्तकाचा कच्चा आराखडा प्रख्यात भाषावैज्ञानिक डॉ. अशोक केळकर यांनी बारकाईने तपासून मौलिक सूचना केल्या या दोघा वरिष्ठांच्या आस्थेवाईक मार्गदर्शनामुळे यातले बरेचसे दोष कमी होण्यास मदत झाली.

पश्चिम विभागीय भाषाकेंद्र या आमच्या कार्यालयाचे सहकार्यही याबतीत महत्त्वाचे आहे. प्राचार्या डॉ. उषा नायर यांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. डॉ.लेखवाणी आणि, डॉ. मधु संपट या माझ्या ज्येष्ठ सहका-यांशी झालेल्या चर्चेचा मला लाभ झाला. पुस्तकातील पाठाचे टंकलेखन श्री.अधिकारी आणि श्रीमती.मोकाशी यांनी न कंटाळता, पुन्हापुन्हा केले.

तथापि ज्यांच्या कृपाप्रसादाशिवाय हे पाठयपुस्तक निघणे शक्यच झाले नसते त्या सर्व थोर लेखक - लेखिका, कवी - कवयित्री आणि त्यांचे वारसदार यांचे ऋण शब्दातीत आहे. या सर्व उदारहृदयी शारदात्मजांनी कसल्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता आपले साहित्य या पुस्तकात अंतर्भूत करण्यास

तत्परतेने अनुमती दिली. अनुमतीच्या पत्रातूनही या कामाबद्दल आस्था दाखवली, आशीर्वाद दिले. या सर्वांविषयी माझ्या मनांत काठोकाठ कृतज्ञता आहे.

भारतीय भाषा संस्थान, मैसूर या संस्थेने रौप्यमहोत्सव साजरा केला आहे. या सोहळ्यात पुस्तकाचे प्रकाशन व्हावे म्हणून आग्रहपूर्वक ही जबाबदारी माझ्यावर सोपवणारे माजी संचालक डॉ.इ. अण्णामलै यांची मी मनःपूर्वक आभारी आहे.

सुमन बेलवलकर
मराठी विभाग
पश्चिम विभागीय भाषाकेंद्र
डेक्कन कॉलेज पुणे - ४११००६

धडा पहिला

कावळा

लेखक श्री. व्यंकटेश माडगूळकर
(जन्म १९२७)

परिचय

व्यंकटेश माडगूळकर हे मराठीतले महत्त्वाचे ग्रामीण कथा - कादंबरी लेखक आहेत माडगूळ या दक्षिण महाराष्ट्रातल्या लहान खेडयात ते वाढले. खेडयातल्या जीवनाचे अत्यंत वास्तववादी आणि कलापूर्ण चित्रण मराठीत प्रथम माडगूळकरांनीच केले 'बनगरवाडी'ही त्यांची ग्रामीण कादंबरी सर्व भारतीय भाषांमधे भाषांतरित झाली आहे. 'गावाकडच्या गोष्टी', 'माणदेशी माणसं', 'जांभळाचे दिवस'हे त्यांचे लेखनही ग्रामीण जीवनावर आहे. 'कोवळे दिवस', 'वावटळ', 'करुणाष्टक', 'गोष्टी घराकडील' या पुस्तकांमधे त्यांचे स्वतःचे व कुटुंबियांचे जीवनचित्र आहे असे मानले जाते. चित्रकार आणि शिकारी असलेले माडगूळकर निसर्गप्रेमी आहेत. बंदूक टाकून ते वन्यप्राणी, पक्षी यांच्या निरीक्षणात रंगून गेले. 'नागझिरा', 'जंगलातील दिवस', 'सत्तांतर' ही त्यांची पुस्तकं निसर्गनिरीक्षणातून लिहिली आहेत. सूक्ष्म निरीक्षण, नेमकेपणा, कमीतकमी शब्दांत प्रभावी चित्र उभे करण्याचे सामर्थ्य आणि जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत. त्यांच्या 'सत्तांतर' ला साहित्य अकादमीचे पारितोषिक (१९८३) मिळाले आहे.

कावळा

अगदी लहानपणीच काऊ चिऊची ओळख आपल्याला होते. भाताचा मऊ घास भरवताना आई त्यांचीच नावं घेते. हा चिऊचा हा काऊचा. बोलायला यायला लागलं की पहिली गोष्ट सांगता येते ती, एक होती चिमणी, एक होता कावळा.

हा कावळा मोठा वस्ताद पक्षी आहे. माणसाच्या जवळपास राहूनही तो अंतर राखून असतो. इतर पाखरं बेसावध आढळतील पण कावळा अष्टौप्रहर सावध बुध्दीनी वागतो. त्याला फसवून गोत्यात आणणं ही जवळजवळ अशक्य गोष्ट आहे.

पोट भरणे ही कावळ्याच्या हिशेबी अगदी सोपी गोष्ट आहे. त्याला काहीही चालतं. अमूक एक वस्तू टाकाऊ आहे, असं त्याला कधी वाटतच नाही. उकिरडयावर पडलेला उंदीर तो खुषीनी उचलून घेऊन जातो. डोक्यावर माशांनी भरलेली पाटी घेऊन घाईगडबडीनी चाललेल्या कोळणीच्या पाटीतला मासा वरच्यावर पळवतो. धोरणानी उघडया खिडकीतून स्वयंपाकघरात शिरून भाकरीपोळी लांबवतो. ही चोरी आहे, ही लाज त्याला बिलकूल नसते.

माणूस वस्तीच्या आसपास राहून कावळा चोरी लबाडीनी अन्न मिळवतो, तसा बाहेर रानात भटकूनही मिळवतो. मिरच्यांच्या पिकात शिरून कोवळया मिरच्या खा, मक्याच्या कणसावर ताव मार, गव्हाच्या लोंब्या ओरबाड, ज्वारीची कणसं ओरबाड असं त्याचं चालू असतं शिजलेलंच अन्न पाहिजे असा चवचालपणा नाही, वाळला शिधाही चालतो. शाकाहारच पाहिजे असा सोवळेपणा नाही, मांसमच्छरही चालतं. ओलं - वाळलं खाऊन तो तृप्त असतो.

नीट ध्यान देऊन बघितलं तर आपल्याला दोन प्रकारचे कावळे दिसतात. एक हजामत केलेले आणि दुसरे हजामत वाढवलेले. पहिल्या कावळयांची मान राखी रंगाची असते. सगळं अंग काळं कुळकुळीत आणि मान तेवढी राखी. हजामत वाढलेल्या कावळयांची मान व अंग यात काही फरक नसतो. हे दोन्हीही कावळेच, तरीसुध्दा त्यांच्यात थोडा फरक आहे, जात - पोटजात यात असतो तसा. हजामत केलेले कावळे मानव जातीच्या, गाववस्तीच्या आसपास दिसतात. आपल्या जातभाईंपेक्षा ते अंगानीही लहान असतात. चोचही लहान असते. पण उडण्याच्या बाबतीत ते आपल्या बोजड जातभाईंपेक्षा जास्ती चलाख असतात. दुसरा काळाकुळकुळीत कावळा खरा रानात रहाणारा.

त्याची चोच मोठी असते, आवाज सुध्दा जास्ती कणखर, घोगरा असतो. हा रानातला कावळा गावात दिसतच नाही असं नाही. दिसतो, पण त्याचं खरं रहाणं रानातच. राखी मानवाल्या कावळ्यासारखा तो घराभोवती खरकटं धुंडत किंवा मेलेल्या उंदरासाठी उकिरडे चिवडत बसत नाही. हे कावळे माणूस वस्तीपासून लांब, रानात, जंगलात एकटेदुकटे आढळतात.

जंगलात शिकारीला गेल्यावर हया कावळ्यांचा फार उपयोग होतो.वाघासारखं जनावर बाहेर पडलेलं पाहिलं की तीक्ष्ण नजरेचा कावळा आरडाओरडा करतो. जनावराची हालचाल शिका-याला कळते.

गरीबगुरीब जनावरांना, पाखरांना शिका-यापासून धोका आहे, हे ध्यानात येताच हेच कावळे, शिका-या ऐवजी जनावरा - पाखरांना सावध करतात.

देवानी जे दिलं आहे, त्यावर कावळा खूष असतो. आपल्या कावळेपणावर तो खूष असतो.

- **'बालोघान'** द्या द्‌या

शब्दार्थ

वस्ताद	-	पक्का, धूर्त
गोत्यात आणणे	-	उडचणीत टाकणे
च्या हिशेबी	-	च्या दृष्टीनी, च्या मते
उकिरडा	-	केरकचरा टाकण्याची सार्वजनिक जागा, कचऱ्याचा ढीग.
लोंब्या	-	गव्हाच्या आणि भाताच्या (तांदळाच्या) कणसांना लोंब्या म्हणतात

शिधा	-	न शिजवलेले पदार्थ. डाळ, तांदूळ, मीठ, गूळ इ.
मांसमच्छर	-	मासे, मांस इ.
हजामत करणे	-	केस क़ापणे (पुरुषांनी)
बोजड	-	लठ्ठ, हालचाल करायला कठीण
खरकटं	-	जेवताना बाहेर सांडलेले अन्नकण किंवा उरलेले - खराब झालेले अन्नपदार्थ फेकून देतात त्याला खरकटं म्हणतात.

सांस्कृतिक टिपा

१) जात - पोटजात

एक मुख्य जात आणि त्यात काही प्रकार असतात. उदाःब्राह्मण ही एक जात त्यात देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, तेलंगी इ. प्रकार असतात त्या पोटजाती. या सर्व पोटजातींमधे काही समान भाग असतात. उदाः सर्व ब्राह्मण इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठवर्णीय समजतात. ते शिक्षित असतात. त्यांचा व्यवसायही शिक्षणाशी संबंधित असतो. पण पोटजातींमधे भेदही असतो. उदाःकोकणस्थ ब्राहमण गोरे, घारे, शिस्तप्रिय तर देशस्थ ब्राहमण सामान्यतः काळेसावळे दिलदार, थोडेसे बेशिस्त (त्यांच्या आचार विचारातही साम्य आणि फरक दिसतो.) पूर्वी या पोटजातींमधे बेटीव्यवहार होत नसे.

२) **खरकटं** - जेवताना ताटाबाहेर सांडलेले अन्नाचे कण म्हणजे खरकटं. जेवण झाल्यावर जे सांडलेलं आणि उरलंसुरलं अन्न फेकून दिलं जातं त्यालाही खरकटं म्हणतात. याशिवाय जेवत असताना तो हात खरकटा, कसलंही पीठ भिजवताना तो हात खरकटा समजतात. सोवळं ओवळं मानणारे ब्राह्मण खरकटथ्या बद्दल फार काटेक़ोर असतात. कोणताही शिजलेला अन्नपदार्थ, भिजलेलं पीठ, भाजलेली कणसं लाहंथा पण खरकटे, पदार्थ मानले जातात.

३) **शिधा** - ब्राह्मण पूजा सांगायला दुस-या घरी जातात तेव्हा त्यांना दक्षिणा (पैसे) आणि जेवण देण्याची पद्धत आहे. जर ते ब्राह्मणाखेरीज इतरांच्या घरी पूजा

सांगायला गेले असतील तर त्या घरी ते जेवत नाहीत. दुस-या जातीच्यांनी शिजवलेलं अन्न त्यांना चालत नाही. अशावेळी त्यांना डाळ, तांदूळ, पीठ, गूळ, तेल इ. पदार्थ जेवणाऐवजी देतात, त्यांना शिधा म्हणतात.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) कावळ्याचा आणि आपला पहिला परिचय केव्हा होतो? कसा?

२) इतर पाखरं आणि कावळ्यात काय फरक आहे?

३) कावळ्याच्या खाण्यात काय काय येतं?

४) कावळा आपलं अन्न कोणत्या मार्गांनी मिळवतो?

५) कावळ्यांचे किती प्रकार लेखकाला आढळले? त्यात कोणता फरक लेखकाला दिसला?

६) कावळा हा शिकारी आणि प्राणी-पक्षी या दोघांचाही मित्र कसा आहे?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा

१) त्याला फसवून गोत्यात आणणं ही जवळजवळ अशक्य गोष्ट आहे.

२) ही चोरी आहे, ही लाज त्याला बिलकूल नसते.

३) शिजवलेलंच अन्न पाहिजे असा चवचालपणा नाही.

४) ओलंवाळलं खाऊन तो तृप्त असतो.

५) तरीसुध्दा त्यांच्यात थोडा फरक आहे जात - पोटजात यात असतो तसा.

७) आपल्या कावळेपणावर तो खूष असतो.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

घास भरवणे, नाव घेणे, अंतर राखून असणे, गोत्यात आणणे, च्या हिशेबी,

लाज असणे / नसणे, ताव मारणे, ध्यान देणे, च्या बाबतीत, खरकटं धुंडणे, उकिरडे चिवडणे, आरडाओरड करणे.

प्रश्न २ पुढील वाक्प्रचार / शब्दांच्या जोड्या जवळजवळ असूनही त्यात अर्थाचा फरक आहे तो समजून घ्या आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा

घास भरवणे	-	घास देणे
चवचालपणा	-	सोवळेपणा
वरच्यावर	-	वरचेवर
धुंडणे	-	चिवडणे.

प्रश्न ३ लांब या अव्ययापासून लांबवणे हे क्रियापद तयार होते, पुढील अव्ययांपासून अशीच क्रियापदे बनवली आहेत, त्यांचा वाक्यात उपयोग करा.

खाली - खालावणे, दूर - दुरावणे, पुढे - पुढारणे, मागे - मागासणे, उंच - उंचावणे

प्रश्न ४ पुढील क्रियापदांपासून विशेषणे बनवून वाक्यात उपयोग करा

उदा : टाक - टाकाऊ याप्रमाणे

विक, टिक, जळ, चर

प्रश्न ५ विरुद्ध अर्थाचे शब्द द्या.

वस्ताद, ओलं, बेसावध, बोजड, सोपी, चलाख, टाकाऊ, एकटादुकटा, खुषीनी, तीक्ष्ण, घाईगडबडीनी.

प्रश्न ६ विरुद्ध अर्थानी बनलेले जोडशब्द

ओलावाळला, सुखदुःख, पापपुण्य, बरंवाईट, खरंखोटं, लहानमोठा, कमीजास्त - असे शब्द सांगा.

प्रश्न ७ काळा या विशेषणापासून काळाभोर, काळा कुळकुळीत, काळाकुट्ट, काळाकभिन्न इ. तीव्रतादर्शक विशेषणे तयार झाली आहेत त्यांचा योग्य वापर असलेली वाक्ये बनवा.

प्रश्न ८ 'नाव घेणे' या वाक्प्रचाराचा निरनिराळ्या संदर्भात वापर होतो. पुढील वाक्यांवरून हा संदर्भ लक्षात घ्या आणि स्वतंत्र वाक्यं तयार करा.

१ मराठयांच्या इतिहासाविषयी बोलताना लोक प्रथम शिवाजीचं नाव घेतात. (उल्लेख) नाव घेव्याजोगा.

२ रश्मीनी लग्नात नाव घेतलं (सांस्कृतिक विधी)

३ मी तुमचे पैसे पाहिलेसुद्धा नाहीत उगीच माझं नाव घेऊ नका.(आरोप)

४ वि.वा. शिरवाडकरांनी कवितेसाठी 'कुसुमाग्रज' हे नाव घेतलं (टोपणनाव)

प्रश्न ९ हिरव्या मिरच्या खा, मक्याच्या कणसावर ताव मार या वाक्यांत आज्ञार्थाचा उपयोग सतत चालणा-या गोष्टीच्या वर्णनासाठी केला जातो. या पद्धतीनी घरातली आजी, दंगेखोर मुलगा यांचं वर्णन करा.

प्रश्न१० पुढील वाक्यं अर्थ न बदलता नकारार्थी करा.

१ त्याला फसवून गोत्यात आणणं ही जवळजवळ अशक्य गोष्ट आहे.

२ पोट भरणं ही कावळ्याच्या हिशेबी अगदी सोपी गोष्ट आहे.

३ कावळा चोरीलबाडीनी अन्न मिळवतो.

४ आपल्या जातभाईंपेक्षा ते अंगानीही लहान असतात.

५ हे कावळे एकटेदुकटे आढळतात.

प्रश्न११ पुढील वाक्यं अर्थ न बदलता होकारार्थी करा.

१ ही लाज़ त्याला बिलकूल नसते.

२ हजामत वाढलेल्या कावळ्यांची मान व अंग यात काही फरक नसतो.

३ हा रानातला कावळा गावात दिसतच नाही असं नाही.

४ तो राखी कावळ्यासारखा थव्याथव्यानी झाडावर बसत नाही.

प्रश्न १२ अष्टौप्रहर म्हणजे दिवसभर, सर्ववेळ. याप्रमाणे तिन्ही त्रिकाळ, बारमास, महिनो न महिने, दिवसचे दिवस, तासंतास, वर्षानुवर्षं हे शब्द काळाचा दीर्घपणा, सातत्य दाखवतात. त्यांचा वाक्यात उपयोग करा.

पूरक वाचन लेखन इ.

१ याच पद्धतीनी पुदील विषयांवर निबंध लिहा.

कुत्रा, मांजर, गाढव, उंदीर, डुक्कर

२ 'कावळा' या उताऱ्यात मनुष्यस्वभावाचेही चित्र उमटले आहे माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीतली आनंदा रामोशी ही व्यक्तिरेखा त्या दृष्टीनी अभ्यासा.

३ 'माडगूळकरांची शब्दयोजना' यावर एक टिपण लिहा.

(विशेषतः कावळा अन्न कसं मिळवतो या संदर्भातली क्रियापदे, या उता-यातली विशेषणे यांचा अभ्यास करून)

४ माडगूळकरांची 'सत्तांतर' व 'नागझिरा' ही पुस्तकं वाचा.

धडा दुसरा

कावळयांची शाळा

लेखक श्री. विजय धोंडोपंत
तेंडुलकर (जन्म १९२८)

परिचय

प्रसिद्ध नाटकाकार, पत्रकार आणि चित्रपटकथा लेखक. जीवनाचे विदारक दर्शन घडवण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. ते नेहमी 'मळलेल्या माणसांच्या शोधात' असतात. 'श्रीमंत', 'माणूस नावाचे बेट', 'अशी पाखरे येती', 'सखाराम बाईंडर', 'घाशीराम, कोतवाल', 'गिधाडे', 'कमला', 'कन्यादान' ही प्रसिद्ध नाटके. 'रात्र आणि इतर एकांकिका', 'अजगर आणि गंधर्व' हे. एकांकिका संग्रह तसेच 'काचपात्र', 'द्वंद्व', 'गाणे' हे त्यांचे कथासंग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. 'शांतता कोर्ट चालू आहे' या त्यांच्या नाटकाला सर्व भारतीय भाषांमधील उत्कृष्ट नाटयकृतीसाठी असलेला 'कमलादेवी चट्टोपाध्याय पुरस्कार' देऊन भारतीय नाटयसंघाने त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

कावळयांची शाळा

काटदरे	-	तर काय भेंडेसाहेब, आमचा रेडिओ आम्ही विकणार
मंगेश	-	विकणार?
काटदरे	-	हो, मिळेल त्या किंमतीला. त्यातल्या त्यात बरी किंमत येते एवढंच पहायचं.

मंगेश - अस्सं.

काटदरे - आता तुम्हीच पहा. मोठा गोपू आमचा बारा वर्षांचा, त्यानंतरचा बापू दहा वर्षांचा, झंपू आठ वर्षांचा, चंपी सहा वर्षांची, गंगी चार वर्षांची, आणि आताचा महादू -

मंगेश - दोन वर्षांचा .बरोबर. जरा कॉटला हात लावा की!

काटदरे - हो हो (मंगेशबरोबरीने कॉट उचलू लागत) या सगळ्या आरडयाओरडयात आणि रडण्याओरडण्यात रेडिओ ऐकू येतो कुणाला? काय उपयोग त्याचा?

मंगेश - अस्सं. हे - - - - टेबल मला वाटतं - - - -

काटदरे शिवाय भेंडेसाहेब, आमची ही - बायको - जिवंत रेडिओच तो. खळ म्हणून नाही तोंडाला. फक्त किल्ल्या नाहीत, आणि एरियल नको.

मंगेश - हो ती कॉट ठेवा की खाली.

काटदरे ओ यस. (कॉट खाली ठेवून तिच्यावरच बसून बोलू लागतो.) शिवाय आमची काशी - मेव्हणी आमची -

मंगेश - बरं तिचं काय? जरा प्लीज टेबल धरता का?

काटदरे - ओ यस. (उठून जाऊन मंगेशनी धरलेलीच टेबलाची बाजू धरतो. मंगेश बाजू बदलतो - दोघे टेबल उचलून भिंतीकडे निघतात) दिवसभर नॅशनल प्रोग्रॅम! जोगिया, मांड, पिलू, मारवा, भैरव, शंकरा आणि तो अडाणा.

मंगेश - अस्सं. (टेबल आपल्या बाजूने खाली ठेवतो)

काटदरे - (एका टोकानी हातात धरलेले टेबल तसंच धरून) सा - पासून सा - पर्यंत कुठला सूर येत नाही विचारा ! हार्मोनियमच आहे म्हणा ना घशात, बाजाची पेटी. तेव्हा निश्चय ठरला आमचा भेंडेसाहेब. रेडिओला रजा

द्यायची. विकून टाकायचा तो. आज म्हटलं तर आज देऊन टाकू, कुणाला हवा. त्याला किंमत मात्र बरी आली पाहिजे (थांबून) काय?

मंगेश - (कॉट योग्य जागी सरकवण्यात दंग. मग पाहून को-या मुद्रेनी) काय?

काटदरे - पटतंय ना आमचं?

मंगेश - हो हो रेडिओ विकणार तुम्ही. विकून टाका. टेबल ठेवा खाली.

काटदरे - (टेबल सोडून बाजूच्या स्टुलावर बसतो) जी वस्तू उपयोगाची नाही ती टाका, हा आमचा दंडक. गावची वडिलार्जित दोन गुंठे जमीन - विकून टाकली. लग्नातले कपडे - हे आजच हिनं बोहारणीला देऊन टाकले आणि पितळेचं घंगाळ घेतलं. कोटाला तर तुम्हाला सांगतो,एवढा हा - एवढा मंगेश - अं?

काटदरे - भोसका. कोटाला हो - देऊन टाकला कोट. मायामोह काही बाळगलं नाही. दान करावा तसा दिला, आता घंगाळ आलं, याला इलाज नाही. बोहारीणच ती - भिकारीण नव्हे.

मंगेश - (अर्थ फारसा ध्यानी न घेता आपल्याच नादात) हो - (खिडकीजवळची खुर्ची टेंबलाशी आणून ठेवतो)

काटदरे - आता शेंडीच आमची - अंहं बघू नका - या केसात आता दिसणार नाही तुम्हाला - पण वडील होते तोवर ठेवली होती. असेल काहीतरी सव्वाएक इंचाची. जास्तच, पण कमी नाही. वडील गेले आणि काढून टाकली. काढून टाकली म्हणजे केस वाढवले. एकच! शेंडी काढली काय आणि केस वाढवले काय - भावार्थ एकच.

मंगेश - तरी म्टटलं मी काय विसरलो - इस्त्रीचा टेबलक्लॉथ - टेबलक्लॉथ (कॉटवरून टेबलक्लॉथ उचलतो. शेल्फवरून फुलदाणी घेतो. फुलदाणी काटदरेच्या हाती देतो. स्वतः टेबलक्लॉथ टेबलावर पसरू लागतो)

काटदरे - भेंडेसाहेब -

मंगेश - अं? काय?

काटदरे - हँ - म्हणजे तसं काही नाही - पण म्हणजे आज हे आहे काय?

मंगेश - कुठं काय?

काटदरे - ही - हलवाहलवी -

मंगेश - मग?

काटदरे - सरकवासरकवी - लावालांवी -

मंगेश - काय? झालं काय?

काटदरे - कसली?

मंगेश - कसली?

काटदरे - हो. म्हणजे का?

मंगेश - खोली लावतोय मी.

काटदरे - ते समजलं. पण तुम्ही लावत नाही कधी खोली.

मंगेश - मग? आज लावतोय.

काटदरे - पण का भेंडेसाहेब?

मंगेश - मित्र यायचाय मुंबईहून रहायला माझा. अभ्यासासाठी पंधरा दिवस. (शेल्फवरची पुस्तके लावू लागतो.) सी. ए. ची परीक्षा आहे त्याची.

काटदरे - सी. ए.?

मंगेश - हो, सी. ए. - चार्टर्ड अकाउंटंटची परीक्षा

- **'कावळ्यांची शाळा'**

शब्दार्थ

मेव्हणी	-	बायकोची बहीण
नॅशनल प्रोग्रॅम	-	रेडिओवर चालणारा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम
दंडक	-	नियम
वडिलार्जित	-	वडिलांनी मिळवलेली
गुंठे	-	जमीन मोजण्याचे माप ४० गुंठे = १ एकर १ गुंठा - अंदाजे १००० चौरस फूट/ हेक्टेर
बोहारीण	-	जुने कपडे घेऊन भांडी, कपबशा इ. वस्तू देणारी बाई.
धंगाळ	-	आंघोळीसाठी वापरण्यात येणारं तांब्याचं किंवा पितळेचं गोल, पसरट भांडं.
भोसका	-	भोक, छिद्र
लावालावी	-	दोन अर्थ -' एक - वस्तू नीट लावून, व्यवस्थित मांडून ठेवणे. (पाठात पहिला अर्थ आहे) दोन - चहाडया सांगून भांडण लावणे.

सांस्कृतिक टिपा

१) **बोहारीण** - जुने कपडे घेऊन त्यांच्या मोबदल्यात भांडी किंवा काचेच्या कपबशा, बरण्या इ. विकण्याचा धंदा करणा-या बायका. हा धंदा बायकाच मुख्यतः करतात दुपारच्या वेळी डोक्यावर टोपलीत भांडी घेऊन दारोदार त्या आरोळी देत

जातात. सौदा पटवण्यात त्या फार हुशार असतात. हे जुने कपडे ठीकठाक करून जुन्या बाजारात विकून त्या पैसे मिळवतात.

२) शेंडीः ब्राह्मण मुलाची आठव्या वर्षी मुंज (व्रतबंध)होते तेव्हा डोक्यावर लांब केसांची शेंडी ठेवली जाते. पूर्वी वडील जिवंत असेपर्यंत सर्व केस कापून टाकणे अशुभ समजत. कारण आई किवा वडलांच्या मृत्यूनंतर मुलाला सर्व केस पूर्णपणे काढून क्षौर करावे लागते.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे ५ ते ६ ओळीत लिहा.

१ काटद-यांनी रेडिओ विकायचं का ठरवलं?

२ काटद-यांचा कोणता नियम होता? त्यांनी तो कसा पाळला?

३ मंगेश खोली का लावत होता? त्यानी काय केलं?

४ काटद-यांचा चौकसपणा कसा दिसून येतो?

५ निरुपयोगी वस्तू टाकतानाही काटदरे कोणती काळजी घेत?

प्रश्न २ ए. टिपा लिहा

१ 'कावळ्यांची शाळा' या उता-यातला विनोद

२ काटद-यांची व्यक्तिरेखा

३ काटद-यांचं - घर

प्रश्न ३ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ आमची ही - बायको - जिवंत रेडिओच तो.

२ फक्त किल्ल्या नाहीत आणि एरियल नको.

३ दिवसभर नॅशनल प्रोग्रॅम.

४ सापासून सा पर्यंत कुठला सूर येत नाही विचारा.

५ हार्मोनियमच आहे म्हणा ना घशात - बाजाची पेटी.

६ जी वस्तू उपयोगाची नाही ती टाका, हा आमचा दंडक.

७ मायामोह काही बाळगलं नाही - दान करावा तसा दिला.

८ आता घंगाळ आलं त्याला इलाज नाही.

९ बोहारीणच ती - भिकारीण नव्हे.

१० शेंडी काढली काय आणि केस वाढवले काय, भावार्थ एकच!

११ पण तुम्ही लावत नाही कधी खोली.

भाषाभ्यास

प्रश्न १ पुढील शब्दांचा अर्थ स्पष्ट करा -

बोहारीण, घंगाळ, मेव्हणी, वडिलार्जित, भोसका, लावालावी, सरकवासरकवी, हलवाहलवी, दंग, दंडक

प्रश्न २ पुढील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

किंमत येणे, रजा देणे, हात लावणे, त्यातल्या त्यात, तोंडाला खळ नसणे, दान करणे, कोरी मुद्रा, इलाज नसणे, खोली लावणे, जास्तच पण कमी नाही.

प्रश्न ३ हलवाहलवी, सरकवासरकवी, लावालावी ही नामे अनुक्रमे हलव, सरकव, लाव या क्रियापदांपासून बनली आहेत पुढे दिलेल्या क्रियापदांपासून तशी नामे बनवून त्यांचा वाक्यात उपयोग करा -

भांड, मार, ठोक, ओढ, लप, शिव, रड, फेक, पाड, ढकल, फोड, काढ, धाव, खेच, पळ.

प्रश्न ४ 'त्यातत्या त्यात ——— एवढंच पहायचं' अशा तऱ्हेची वाक्यं बनवा.

प्रश्न ५ पुढील वाक्ये अर्थ न बदलता निराळ्या पद्धतीनी लिहा.

१ रडण्याओरडण्यात रेडिओ ऐकू येतो कुणाला?

२ काय उपयोग त्या रेडिओचा?

३ आमची ही - बायको - जिवंत रेडिओच तो.

४ सापासून सापर्यंत कुठला सूर येत नाही विचारा.

५ तुम्ही लावत नाही कधी खोली.

प्रश्न ६ पुढील वाक्यांमधील अधोरेखित शब्दांचा वापर नेहमीच्या संभाषणात होत असतो तो नीट लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्यांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग कराः

१ खळ म्हणून नाही तोंडाला !

२ हार्मोनियमच आहे म्हणा ना - बाजाची पेटी !

३ आज म्हटलं तर आज देऊन टाकू.

४ कोटाला तर हा एवढा भोसका.

५ काढून टाकली म्हणजे केस वाढवले - एकच.

७ वडील होते तोवर ठेवली होती.

८ तरी म्हटलं काय विसरलो.

९ म्हणजे तसं काही नाही पण म्हणजे हे आहे काय?

१० जरा कॉटला हात लावा की!

पूरक लेखन/वाचन

प्रश्न १ आपल्या स्थितीबद्दल सतत तक्रारी करणे, दुस-यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणे आणि दुस-याच्या खाजगी गोष्टींची फाजील चौकशी करणे इ. मनुष्यस्वभावाचे विशेष या उता-यात दिसतात हे ध्यानात ठेवून पुढील संवाद लिहा.

१ एखाद्या घरी मुलगी पहायला येणार आहेतः. अशा घरातली मुलीची आई आणि शेजारीण.

२ नोकरीत वरिष्ठांबद्धल तक्रार करणारा एक आणि त्याचा मित्र.

३ नोकरीसाठी मुलाखतीला आलेले दोन उमेदवार एकमेकांना काय काय विचारले, नोकरी मिळण्याची शक्यता याविषयी एकमेकाचा अंदाज घेतात.

४ उता-यातत्या काटद-यांची बायको शेजारणीकडे तक्रारी करते आहे अशी कल्पना करून संवाद लिहा.

५ गंगाधर गाडगीळ यांची 'किडलेली माणसे' ही कथा वाचा.

६ तुमच्या भाषेत विनोदी नाटके आहेत का? असल्यास एका नाटकाचा थोडक्यात परिचय करून द्या.

धडा तिसरा

तो मी नव्हेच

लेखक - श्री. प्रल्हाद केशव अत्रे
(जन्म १८९८ मृत्यू १९६९)

परिचय

आचार्य प्र. के. अत्रे यांच्याबदल मराठी माणसाला फार प्रेम व अभिमान वाटतो. आपल्या प्रतिभेने त्यांनी गाजवले नाही असे कलेचे एकही क्षेत्र नसेल. शिक्षण, साहित्य, रंगभूमी, चित्रपट, वृत्तपत्र, राजकारण, वक्तृत्व या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला. १९४२ साली नाशिकला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या 'श्यामची आई' या चित्रपटाला राष्ट्रपतींचे पहिले सुवर्णपदक मिळाले होते. आपल्या हातात असलेल्या माध्यमातून लोकांना हसवणारा आणि हसवता हसवता अनेक वाङ्मयीन व सामाजिक ढोंगांवर प्रहार करणारा हा लेखक होता.

'तो मी नव्हेच' या त्यांच्या गाजलेल्या नाटकात त्यांनी असाच एक दंभस्फोट केला आहे.विवाह जुळवून देणाऱ्या संस्थेत सुनंदा दाते, तिचा भाऊ सुधीर, थोरली बहीण सुमती आणि तिचा नवरा अरविंद साने सुनंदाचे लग्न जुळवण्यासाठी जमले आहेत. अनेक मुलींशी लबाडीने लग्न करणारा दिवाकर दातार तिथे नवरा मुलगा म्हणून येतो. त्याच्या मोठया भावाचे, दाजीशास्त्री दातारांचेही रूप घेऊन तोच येतो. धाकटया भावाच्या उच्च शिक्षणासाठी वडिलार्जित इस्टेट गहाण ठेवावी लागली. ती सोडवायला पंधरा हजार रुपये वधू पक्षाने द्यावे अशी ते मागणी करतात.

तो मी नव्हेच

(सुनंदा आपल्या बहिणीला मिठी मारून एकदम रडायला लागते.)

सुनंदा - अक्का --

सुमती - असं काय करतेस बाबी? रडायला काय झालं?

सुनंदा - पंधरा हजार रुपये देऊन मला नाही लग्न करायचं! त्यापेक्षा मी जन्मभर कुवार राहीन.

गंगूताई - हे पहा, इतकं निराश होण्याचं काही कारण नाही. आपण त्यातून काहीतरी वाट काढू -

सुनंदा - (चिडून) कशी वाट काढणार? आम्ही काही जमीनदार किंवा इनामदार नव्हेत पंधरा हजार रुपये हुंडा द्यायला. एवढे पैसे आम्ही आणायचे कुठून? चो-या करायच्या का दरवडे घालायचे?

सुधीर पण हया गोष्टीचा तुला कुणी विचार करायला सांगितला आहे? बाबा आहेत, अक्का आहे, मी आहे, तू कशाला डोक्याला एवढा त्रास करून घेतेस?

सुनंदा लग्न माझं आहे, तुमचं नाही. आजपर्यंत माझ्या शिक्षणासाठी बाबांनी दहा हजार रुपये तरी खर्च केले असतील - आता माझ्या लग्नासाठी पंधरा हजार - नाही, पंधराशे रुपये तरी खर्च करायची ताकद आहे का? आपल्या दातावर किती मास आहे हे मला चांगलं ठाऊक आहे. मी काही कुक्कुलं बाळ नाही.

गंगूताई - तुमचं म्हणणं मला कळतं सुनंदाताई, पण त्यांनी तरी काय करायचं? त्यांच्या शिक्षणासाठी त्यांना वीस हजार रुपये खर्च करावे लागले आहेत हे तर काही खोटं नाही? अहो, विलायतेहून जाऊन आले आहेत ते -

सुनंदा - विलायतेच्या शिक्षणाची किंमत तुम्हाला असेल - आम्हाला नाही, आमचे आप्पासाहेबही विलायतेहून डिग्री घेऊन आले आहेत. त्यांनाही आठशे

रुपये पगार आहे. पण त्यांनी आमच्या वडिलां कडून एक रुपयासुद्धा हुंडा घेतला नाही अक्काशी लग्न करताना.

अरविंद - अग, पण बाबी, त्यावेळी मी नुसता बी.ई.होतो. विलायतेला जाऊन आलो नव्हतो.

सुनंदा - म्हणून काय झालं? विलायतेला जाऊन आले म्हणजे काय सोन्याची शिंगं उगवतात? आणि मी काही अडाणी नाही - चांगली बी.ए.आहे. माझ्या शिक्षणाला काहीच किंमत नाही की काय? दादा, अक्का, मी तुम्हाला निक्षून सांगते - हे लग्न मोडलं म्हणून समजा. माझ्या लग्नाच्या भानगडीत तुम्ही यापुढे पडू नका. मला काही स्वाभिमान आहे की नाही?

सुधीर - हा तुझ्या स्वाभिमानाचा प्रश्न नाही बाबी. हा बाबांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. हे तुझं लग्न मोडलं असं जर बाबांना समजलं तर एक क्षणभर ते जगणार नाहीत. काय वाटेल ते करून आपल्याला हे लग्न जमवलंच पाहिजे.

सुनंदा - काय वाटेल ते करून म्हणजे? आलं माझ्या लक्षात. येऊनजाऊन आपलं एक घर आहे. त्याचं तुम्ही वाटोळं करणार! म्हणजे विलायतेच्या शिक्षणासाठी त्यांनी आपलं घर गहाण टाकलं, त्याप्रमाणे माझ्या लग्नासाठी तुम्ही आपलं घर फुंकून टाकणार असंच ना? चल अक्का, मला नाही सहन होत हे. माझं डोकं अगदी फुटण्याची वेळ आली आहे.

(तीरासारखी जाते. तिच्यामागून सुमती जाते.)

- **'तो मी नव्हेच'**

शब्दार्थ

कुवार - कुमारी, अविवाहित

कुक्कुलं बाळ	-	अगदी लहान, अजाण
निक्षून	-	बजावून, निश्चितपणे, निर्णायक
जीवनमरणाचा प्रश्न	-	त्या प्रश्नावर जगणे किंवा मरणे अवलंबून आहे
वाटोळं	-	नाश, नुकसान.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ सुनंदा लग्न करायला नकार का देत होती?

२ सुनंदाच्या घरची आर्थिक स्थिती कशी होती?

३ हुंडा घेण्याचं समर्थन इतर माणसं कशी करत होती?

४ सुनंदाचं लग्न होणं कशासाठी जरुरीचं होतं? त्यासाठी काय करायची तिच्या घरच्यांची तयारी होती?

५ सुनंदा इतर उपवर मुलींपेक्षा स्वभावाने वेगळी कशी वाटते?

प्रश्न २ टिपा लिहा

१ सुनंदाच्या कुटुंबियांची अगतिकता

२ मध्यमवर्गीयांचे लग्नाविषयीचे प्रश्न

३ गंगूताई घोटाळे

४ स्त्रीचे समान हक्क

५ अत्र्यांची भाषाशैली.

प्रश्न ३ वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ त्यापेक्षा मी जन्मभर कुवार राहीन.

२ चो-या करायच्या का दरवडे घालायचे?

३ आपल्या दातावर किती मास आहे हे मला चांगलं ठाऊक आहे.
४ विलायतेच्या शिक्षणाची किंमत तुम्हाला असेल आम्हाला नाही.
५ विलायतेला जाऊन आले म्हणजे काय सोन्याची शिंगं उगवतात?
६ माझ्या शिक्षणाला काहीच किंमत नाही की काय?
७ काय वाटेल ते करून हे लग्न आपल्याला जमवलंच पाहिजे.
८ माझं डोकं अगदी फुटण्याची वेळ आली आहे.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

वाट काढणे, दातावर मास असणे, चो-या करायच्या का दरवडे घालायचे, कुक्कुलं बाळ, किंमत असणे, सोन्याची शिंगं उगवणे, वाटोळं करणे, प्रश्न असणे, निक्षून सांगणे, भानगडीत पडणे, काय वाटेल ते करून, फुंकून टाकणे, येऊनजाऊन.

प्रश्न ३ पुढील वाक्यं निराळ्या पद्धतीनी लिहा (साधी वाक्यं)

१ या गोष्टीचा तुला कुणी विचार करायला सांगितला आहे?
२ तू कशाला डोक्याला एवढा त्रास करून घेतेस?
३ पंधराशे रुपये तरी खर्च करायची ताकद आहे का आपली?
४ हे तर काही खोटं नाही?
५ माझ्या शिक्षणाला काहीच किंमत नाही की काय?
६ मला काही स्वाभिमान आहे की नाही?

प्रश्न ३ पुढील गोष्टी कोण करतं?

चो-या, दरवडे, घरफोडी, लूट, खून

प्रश्न ४ विरुद्ध अर्थाचे शब्द द्या

स्वाभिमानी, कुवार, निराश, अडाणी

प्रश्न ५ विशिष्ट शब्दावर जोर देण्यासाठी वाक्यातील शब्दांचा क्रम कसा बदलतो ते पुढील वाक्यांवरून समजून घ्या.

१ मला नाही लग्न करायचं - मला लग्न करायचं नाही.

२ आम्ही काही जमीनदार नाही हुंडा द्यायला. हुंडा द्यायला आम्ही काही जमीनदार नाही.

३ त्यांनी एक रुपयासुद्धा हुंडा घेतला नाही अक्काशी लग्न करताना! - अक्काशी लग्न करताना त्यांनी एक रुपयासुध्दा हुंडा घेतला नाही.

४ आणि मी काही अडाणी नाही - चांगली बी.ए. आहे. आणि मी चांगली बी. ए. आहे, अडाणी नाही. अशा पद्धतीनी पुढील वाक्यं पुन्हा लिहा.

१ ती तुमच्याबरोबर येणार नाही.
२ तुझी कामं करायला मी तुझा नोकर नाही.
३ तो चांगला शुद्धीवर आहे - बेशुद्ध नाही.
४ मला टाकून बोलताना तुला थोडंतरी वाईट वाटलं का?

प्रश्न ५ 'चांगली बी. ए. आहे' या वाक्यातला 'चांगली' चा वापर समजून घ्या. उदाः

१ चांगला सहा फूट उंच आहे तो.

२ चांगल्या चार मोठया खोल्या आहेत रहायला.

३ चांगले हजारभर रुपये दिले त्या मिक्सरला.

४ चांगलं तोळाभर सोनं लागलं अंगठीला. याप्रमाणे 'चांगला' वापरून स्वतंत्र वाक्यं बनवा.

प्रश्न ७ पुढील वाक्यं प्रश्नवाचक बनवा.

१ इतकं निराश होण्याचं काही कारण नाही.

२ आम्ही काही जमीनदार नव्हेत पंधरा हजार रुपये हुंडा द्यायला.

३ मी काही कुकुलं बाळ नाही.

४ त्यांनी आमच्या वडलांकडून एक रुपयासुद्धा हुंडा घेतला नाही.

५ तुझं लग्न मोडलं तर ते एक क्षणभर जगणार नाहीत.

प्रश्न ८ 'तरी' चे निरनिराळे उपयोग -

१ बाबांनी दहा हजार रुपये तरी खर्च केले असतील. (निदान, कमीतकमी)

२ पंधराशे रूपये तरी खर्च करायची ताकद आहे का? (एवढेसुद्धा)

३ पण त्यांनी तरी काय करावं? (नाइलाज)

४ तरी मी तुला बजावलं होतं (बजावून सुद्धा - -) अशी तुम्ही दहा वाक्यं करा.

प्रश्न ९ पुढील वाक्यं पूर्ण भूतकाळात आणि भविष्यकाळात लिहा.

१ त्यांना वीस हजार रुपये खर्च करावे लागले आहेत.

२ ते विलायतेहून जाऊन आले आहेत.

३ बाबांनी दहा हजार रुपये तरी खर्च केले आहेत.

प्रश्न१० पुढील व्यक्तींचे परस्परांशी काय नाते आहे सांगा

१ सुनंदा आणि सुधीर

२ सुधीर आणि अरविंद

३ बाबा आणि सुमती

४ सुमती आणि सुधीर

५ अरविंद आणि सुनंदा.

लेखन/पूरक वाचन

१ तुमच्याकडे मुलीचं लग्न ठरवण्याची पद्धत कशी आहे त्याची माहिती द्या

२ हुंड्याच्या दुष्परिणामांवर एक परिच्छेद लिहा.

३ तुमच्याकडे मुलगी सुनंदाप्रमाणे स्वतःचे विचार, मतं स्पष्टपणे सांगू शकते का? आपल्या लग्नाबाबत मुलीला मिळणा-या स्वातंत्र्याविषयी तुमची प्रतिक्रिया लिहा.

४ हुंडापद्धतीवर तुमच्या भाषेत कथा, कादंबरी किंवा नाटक लिहिले असल्यास त्यांची थोडक्यात माहिती द्या.

५ श्री. मामा वरेरकरांचे 'हाच मुलाचा बाप' आणि श्री. जयवंत दळवींचे 'पर्याय' ही नाटके वाचा.

धडा चौथा

सुंदर मी होणार

लेखक - पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे
(जन्म १९१५)

परिचय

पु. ल. देशपांडे हे मराठी साहित्यातले बहुरंगी व्यक्तिमत्व आहे. त्यांनी साहित्य, रंगभूमी, चित्रपट, संगीत इ. क्षेत्रात अपूर्व नावलौकिक मिळवला आहे. या बहुगुणी कलावंताने कलेच्या प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला. रंगभूमीवरील एकपात्री प्रयोग आणि चित्रपटांमधील भूमिका व संगीत दिग्दर्शन इ.नी त्यांना भरपूर कीर्ती मिळवून दिली. त्याहीपेक्षा अधिक लोकप्रियता त्यांना त्यांच्या साहित्याने मिळवून दिली. मराठीतले ते ख्यातनाम विनोदी लेखक आहेत. त्यांनी सुंदर प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रेही लिहिली आहेत. 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा' ही प्रवासवर्णने, 'व्यक्ती आणि वल्ली', 'गणगोत', 'गुण गाईन आवडी' ही व्यक्तिचित्रे, 'बटाटयाची चाळ', 'हसवणूक', 'खोगीरभरती' या विनोदी लेखनात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्व वैशिष्टये आढळतात. त्यांच्या सर्व लेखनावर विनोदाचा प्रभाव असला तरी जीवनावर प्रेम करणारा, जीवन सुंदर रीतीने जगावे यावर श्रद्धा असणारा हा लेखक आहे.

त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार (१९६५) मिळाला आहे. 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'अंमलदार', 'तीन पैशाचा तमाशा', 'ती फुलराणी' ही त्यांची अत्यंत लोकप्रिय नाटके.

सुंदर मी होणार

दीदी - माझं ऐकाल का संजय? मला तुम्ही काय म्हणता ते कळत का नाही? पण

माझ्यासारखी अपंग सोबतीण म्हणजे तुमच्या गळ्यातलं कायमचं लोढणं आहे. संजय, आयुष्याची गेली दहाबारा वर्षं मी वाट पाहिली होती ती मृत्यूची. तुम्ही याल हे स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं मला - तुमच्या कविता वाचून वेडी होत होते मी - आणि त्या वेडात काही चार ओळी लिहिल्या असतील मी - त्या दिवशी तुम्ही येऊन माझ्यासमोर उभे राहिलात त्यावेळी साक्षात मृत्युंजयच माझ्यापुढे उभा राहिल्यासारखं वाटलं मला. वास्तविक ते एकच दर्शन डोळ्यात साठवून मी तुम्हाला पुन्हा भेटायलाही नको होतं - पण तुम्ही पुन्हा आलात आणि माझं शरीर मोहरल्यासारखं झालं. तुम्हाला जा म्हणून सांगणं शक्यच झालं नाही मला - आज पुन्हा मी थकले - तुमच्या दर्शनानी नवचैतन्य आलं होतं ते गेल्यासारखं वाटलं. तुमच्या वाटेवरून मी बाजूला व्हायला हवं - पत्नी म्हणून तुमच्या आयुष्यात येण्यासारखं काही नाही माझ्यात. संजय, जा तुम्ही. आयुष्याचं घटिकापात्र बुडत आलं होतं तेवढयात तुम्ही आलात, आधार दिलात. मला पुन्हा नवी शक्ती आली. आज योगेश्वराचं दर्शन घेतलं. कल्याणीत ओंजळ भरली - काठावरची हिरवी रानं आणि हिरवी पानं पुन्हा एकदा डोळे भरून पाहिली मी - आणि याचसाठी केला होता अट्टाहास असं वाटायला लागलं मला - तुम्ही येऊ नका इथं. हा राजवाडा आहे. इथं कोणत्या वेळी काय होईल काही सांगता येत नाही.

संजय - त्याला मी कधीच भ्यालो नाही हेमा - खूप झगडा केला आहे मी आयुष्यात - कितीतरी कोंडवाडे फोडले आहेत मी. शाळेचा कोंडवाडा, घराचा कोंडवाडा, अनेक ठिकाणी झुंज घेतली आहे मी. आता वाटतं झुंजताना बरोबर कुणीतरी असावं.

दीदी - जरूर असावं - पण ते माझ्यासारखं दुबळं, अशक्त नव्हे -

संजय - दुबळं शरीर नसतं हेमा - मन असतं. क्रांती कधी पहिलवानांनी केलेली ऐकली नाही मी हेमा. एवढया एवढयाशा शरिराच्या दुबळ्या दिसणा-या महात्म्यांनी क्रांती केली - तुला मी जाऊ देणार नाही इंग्लंडला -

दीदी - म्हणजे काय करणार तुम्ही?

संजय - तुझ्याशी लग्न.

दीदी - मला विचार करायला तरी सवड द्या संजय.

संजय - हेमा, योगेश्वराच्या दर्शनाला गेली होतीस ना?

दीदी - हो -

संजय - जाताना काय घेऊन गेली होतीस?

दीदी - काही नाही - फक्त भक्तिभाव.

संजय - अगदी तशी - तशीच ये आणि भक्तिभाव ठेवशील तो माझ्यावर नव्हे, जीवनावर ठेव. आणि यापुढे मृत्यूची वाट पहायची भाषा चुकूनदेखील तोंडातून काढायची नाही. अशी मृत्यूची आपण का वाट पहायची असते? मृत्यू आपली वाट पहात उभा असतो - राहूदे बिचारा त्याची काळजी आपण कशाला करायची? आणि हेमा, असे हे पडदे ओढून प्रकाशाला का मज्जाव करतेस? (खिडक्या दारांवरचे पडदे उघडतो. आत प्रकाशाचा झोत येतो) असा सुंदर प्रकाश आत येऊ दे! प्रकाशाची भीती घुबडांना - गरुडांना नसते. माझा निर्णय मी तुला सांगितला. तुझा निर्णय अशा प्रकाशात बसून घे आणि तुला वाटेल तेव्हा सांग मला - जातो मी हेमा - पण त्यापूर्वी एकच विनंती आहे.

दीदी - विनंतीची भाषा कसली - - - काय सांगायचं आहे?

संजय - हा संग्रह नीट स्वीकारला नव्हतास तू - आता स्वीकारशील? (तिला दरबारी पद्धतीनी संग्रह देतो - ती स्वीकारते.) जाऊ मी?

दीदी - कुठे जाणार आता?

संजय - या वाडयाबाहेरच्या पिंपळाच्या पारावर दोन निर्वासित उभे आहेत माझी वाट पहात -

दीदी - निर्वासित? कोण निर्वासित?

संजय - एक बेबी आणि दुसरे डॉक्टर पटवर्धन. अच्छा - जातो - (झटकन निघून जातो.)

-'सुंदर मी होणार'

शब्दार्थ

लोढणं - गुरांच्या गळ्यातल्या दोराला बांधलेले लांब लाकूड त्यामुळे गुरांना चालताना, धावताना अडथळा होतो.

साक्षात - प्रत्यक्ष, मूर्त.

मृत्युंजय - मृत्यूला जिंकणारा, मृत्यूचा पराभव करणारा.

वास्तविक - खरं पहाता

घटिकापात्र - मुहूर्ताची वेळ अचूक समजावी म्हणून तळाशी लहान छिद्र असलेलं भांडं घंगाळात सोडतात. त्यात हळूहळू पाणी भरतं आणि नेमक्या वेळी ते पाण्यात बुडतं.

अट्टाहास - अपार कष्ट, एखादी इच्छा मनात धरून केलेले प्रयत्न.

कोंडवाडा - बेवारशी जनावरांना कोंडून ठेवण्याची जागा.

मज्जाव - एखादी गोष्ट करण्याला विरोध, बंदी.

निर्वासित - बेघर.

गळ्यातलं लोढणं - ज्याचा उपयोग काही नाही, उलट अडचण.

सांस्कृतिक टिपा

१) घटिकापात्र - जुन्या काळातलं अचूक वेळ मोजण्याचं साधन. एका पसरट

घंगाळात पाणी भरून ठेवतात. एका लहान भांड्याच्या तळाला भोक पाडून ते पाण्यात सोडतात. भोकातून पाणी शिरून ते भांडं बुडालं की ती वेळ लग्नाचा अचूक मुहूर्त असं समजतात. प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांची मुलगी लीलावती हिच्या लग्नाच्या वेळी घडलेली करुण कथा सर्वांना माहीत आहे. एखाद्याचं आयुष्य संपलं की 'घटका भरली' हा शब्द प्रयोग वापरतात. उदा. त्याची आता घटका भरली - म्हणजे मरण जवळ आलं. स्त्रीच्या प्रसूतीचा क्षण जवळ आला की हा वाक्‌प्रचार वापरला जातो. उदा; देवकीची तर घटका भरली होती आणि मुसळधार पाऊस कोसळत होता. घटिकापात्र या संकल्पनेतूनच 'घटका भरणे' हा वाक्‌प्रचार निघाला आहे.

२) 'याचसाठी केला होता अट्टाहास' संत तुकारामांच्या अभंगातली ही ओळ म्हणीसारखी वापरली जाते. तुकाराम सदेह वैकुंठाला गेले अशी लोककथा आहे. मृत्यूच्या वेळी त्यांनी अभंग रचला - 'याचसाठी केला होता अट्टाहास' शेवटचा दिस गोड व्हावा एखाद्या मोठया ध्येयासाठी आयुष्यभर खडतर तपश्चर्या केली असेल तर ही ओळ त्या ध्येयपूर्तीच्या क्षणी वापरतात.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा -

१ हेमाच्या आयुष्यात संजयमुळे कोणता बदल झाला?

२ हेमा संजयशी लग्न करायला का तयार नव्हती?

३ संजयनी तिची समजूत कशी काढली?

४ संजयच्या विचारात आशावाद कसा आहे?

प्रश्न २ टिपा लिहा.

१ हेमाच्या जीवनात झालेला बदल.

२ 'सुंदर मी होणार' या उता-यातला आशावादी संदेश.

३ प्रेमाचे सामर्थ्य.

४ हेमाचं कविमन.

५ संजयची व्यक्तिरेखा.

प्रश्न ३ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ माझ्यासारखी अपंग सोबतीण म्हणजे तुमच्या गळ्यातलं कायमचं लोढणं आहे.

२ आयुष्याची गेली दहाबारा वर्षं मी वाट पाहिली होती ती मृत्यूची.

३ साक्षात मृत्युंजयच माझ्यापुढे उभा राहिल्यासारखं वाटलं मला.

४ पत्नी म्हणून तुमच्या आयुष्यात येण्यासारखं काही नाही माझ्यात.

५ आयुष्याचं घटिकापात्र बुडत आलं होतं.

६ याचसाठी केला होता अट्टाहास असं वाटायला लागलं मला.

७ आयुष्यात कितीतरी कोंडवाडे फोडले आहेत मी.

८ दुबळं शरीर नसतं हेमा, मन असतं.

९ क्रांती कधी पहिलवानांनी केलेली ऐकली नाही मी.

१० प्रकाशाची भीती घुबडांमा - गरुडांना नसते.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा अर्थ सांगून तुमच्या वाक्यात उपयोग करा--

गळ्यातलं लोढणं	मोहरल्यासारखं होणे
वाटेवरून बाजूला होणे	याचसाठी केला होता अट्टाहास
डोळे भरून पहाणे	चुकूनदेखील
वाट पहाणे	स्वप्नातसुद्धा

मज्ञाव करणे	झगडा करणे
कोंडवाडे फोडणे	सवड देणे
वेडा/वेडी होणे	डोळ्यात साठवणे

प्रश्न २ डोळे भरून पहा, डोळ्यात साठव हे डोळ्यावरून आलेले वाक्प्रचार आहेत. असे आणखी पाच वाक्प्रचार शोधून त्यांचा वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ३ आपल्या आयुष्याची गेली दहाबारा वर्ष मी वाट पाहिली
होती ती मृत्यूची ! या वाक्यातील शब्दक्रमाप्रमाणे
मी प्रयत्न केला होता तो तुझ्यासाठी !
मी प्रेम केलं ते देशावर !
मला वाईट वाटतं ते या गोष्टीचं !
मला राग येतो तो तुझा !
लोकांना दया आली ती त्या लहान मुलीची ! ही वाक्यं आणि
त्यांची रचना नीट अभ्यासून अशी १० वाक्यं बनवा

प्रश्न ४ माझं शरीर मोहरल्यासारखं झालं
ते नवचैतन्य गेल्यासारखं वाटलं
पत्नी म्हणून तुमच्या आयुष्यात येण्यासारखं काही नाही माझ्यात.
या वाकथांतल्या अधोरेखित शब्दांची फोड करून·वाक्यं पुन्हा लिहा.

ती चुकूनदेखील रागानी बोलणार नाही.

मी चुकूनदेखील तुझ्या वाटेला जाणार नाही.

मी स्वप्नातदेखील असा विचार केला नाही.

तुम्ही याप्रमाणे पाच वाक्यं करा.

पूरक वाचन/लेखन

१ कवी गोविंद यांची 'सुंदर मी होणार' ही कविता वाचून तिचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

२ 'सुंदर मी होणार' हे नाटक वाचा. हेमा अशी दुबळी का झाली ते थोडक्यात लिहा.

३ पु.ल.देशपांडे यांच्या एखाद्या नाटकाचा प्रयोग पाहून तुमची प्रतिक्रिया थोडक्यात लिहा.

प्रश्न ५ माझ्यासारखी अपंग सोबतीण म्हणजे तुमच्या गळ्यातलं कायमचं लोढणं आहे

तुझ्यासारखा मित्र म्हणजे मला आधारच आहे.

भाक्रानानगलसारखी धरणं म्हणजे नवी तीर्थक्षेत्रंच आहेत.

काळाबाजारवाले म्हणजे देशाचे मारेकरीच आहेत.

अशी 'म्हणजे' चा वापर करून दहा वाक्यं लिहा

प्रश्न ६ खालील शब्दांचा अर्थ स्पष्ट करा

अपंग, घटिकापात्र, लोढणं, मोहरणे, अट्टाहास, कोंडवाडा, मज्ञाव

प्रश्न ७ विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा

अपंग, दुबळं, अशक्त, शक्य.

प्रश्न ८ कंसातल्या सूचनेप्रमाणे बदल करून लिहा.

१) हा संग्रह नीट स्वीकारला नव्हतास तू. (स्वीकार ऐवजी 'स्वीकार कर' वापरा)

२) मी तुम्हाला भेटायलाही नको होतं. (टाळणे वापरून अर्थ न बदलता होकारार्थी करा)

३) तुमच्या वाटेवरून बाजूला व्हायला हवं होतं मी. (अर्थ नबदलता नकारार्थी करा)

४) गेली दहाबारा वर्षं मी वाट पाहिली ती मृत्यूची. (मृत्यू ऐवजी 'मृत्यूशिवाय' शब्द वापरा.)

प्रश्न ९ स्वप्नातदेखील, चुकूनदेखील या शब्दांनंतर नेहमी नकारार्थी रचना येते हे लक्षात घ्या.

उदा: तो स्वप्नातदेखील असं वागणार नाही.

धडा पाचवा

गारंबीचा बापू

लेखक श्री. श्रीपाद नारायण पेंडसे
(जन्म १९१६)

परिचय

• श्री. ना. पेंडसे हे मराठीतले प्रसिद्ध कादंबरीकार आहेत कोकणातील रत्नागिरी जिल्हयातल्या हर्णै बंदर, दापोली या भागात त्यांचे बालपण गेले. कोकणच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीला त्यांच्या कादंब-यांमधे कादंबरीतील पात्रांइतकेच महत्त्व आहे. 'एल्गार', 'हद्दपार', 'हत्या', 'गारंबीचा बापू', 'यशोदा', 'लव्हाळी', 'रथचक्र', 'ऑक्टोपस' या त्यांच्या कादंब-या. यातील 'लव्हाळी'आणि 'ऑक्टोपस' सोडल्यास बाकी सर्व कोकणात घडतात. 'राजे मास्तर', 'गारंबीचा बापू', 'रथचक्र', 'यशोदा' ही कादंब-यांवर बेतलेली नाटके आहेत. कोकणातल्या कुटुंबांमधले माणसांचे परस्परसंबंध, विशेषतः स्त्रीपुरुष संबंधांचे चित्र त्यांच्या लेखनात प्रामुख्याने आढळते. 'गारंबीचा बापू' ही त्यांची सर्वात लोकप्रिय कादंबरी आहे.

अलिकडे त्यांनी 'तुंबाडचे खोत' ही महाकादंबरी लिहिली आहे. त्यांच्या 'रथचक्र'ला साहित्य अकादमीने (१९६३) गौरविले होते.

गारंबीचा बापू

(विठोबाचा तेरावा दिवस. वेळ दुपारची. राधा खोलीची आवराआवर करते आहे. बापू विठोबाची कळशी घेऊन बसला आहे.)

राधा - झालं सगळं व्यवस्थित?

बापू - (गुदमरलेल्या स्वरात) हो.

राधा - तुझं जेवण व्हायचंय ना?

बापू - नाही.

राधा - नाही कसं? मालक तुझी वाट पहाताहेत. जेवण तयार आहे. जेवून घे दोन घास.

बापू - माझं पोट भरलं राधा. हे पाहिलंस काय ते? लाडू. बुरशी आलेला.

राधा - कोणी दिला?

बापू - विठोबानं. अलिमेनच्या डब्यात मिळाला. केव्हा ठेवलान देव जाणे. (रडू लागतो.)

राधा - तू रडायचा थांब पाहू.

बापू - राधा, लहानपणी माझा पाय मुरगळला होता. पंधरा दिवस अंथरुणात होतो. माझी कोणती सेवा करायचं बाकी ठेवलंन विठोबानं? रात्री दोन दोन वाजेपर्यंत जागे, पाय रगडी, शेकी. कोणी सांगेल तो पाला सडयावर जाऊन आणी आणि चटणी करून लेप देई. आंघोळ घाली आणि हे सारं दिवसभर काम करून दमून आल्यावर. माझी नव्हती एवढी त्याची तडफड चालायची. माझा दुखरा पाय तासंतास मांडीवर घेऊन बसे. दर पाच मिनिटांनी विचारी, बापू दुखायचं कमी झालं? मी त्याला काहीच दिलं नाही गं. त्याच्याकडून घेतच राहिलो. आयुष्यभर ही गोष्ट मला खात राहील. मावशी, दिवाकर, विठोबा, तुमच्याकडे पाहिलं की, माझी मला लाज वाटायला लागते. काय केलं मी तुमच्याकरिता? का म्हणून तुम्ही माझ्यावर एवढं प्रेम करता? तुम्हाला कोणालाच मी काही दिलं नाही.

राधा - बापू, माणूस म्हणवून घ्यायला असावं लागतं ते सारं काही तुझ्याजवळ आहे. प्रसंग पडला तर स्वतःजवळची शेवटची पैसुद्धा देशील असा तुझ्यावर लोभ करणा-यांना विश्वास वाटतो. कोणी कोणावर उगीच जीव टाकत नाही. सारी स्वार्थापायी प्रेम करतात.

बापू - स्वार्थ? तुम्ही कसला स्वार्थ पाहिलात? अपेक्षासुद्धा केली नाहीत कसली.

राधा - आमचा स्वार्थ तर अगदी उघड आहे. स्वार्थ म्हटलं त्यात तुला हिणकस काय वाटतं? सा-या निसर्गातच स्वार्थ भरला आहे.

बापू - विठोबानं बिचा-यानं कसला स्वार्थ पाहिला?

राधा - मी पहाते तोच. प्रेम करणं हा माणसाचा धर्म आहे. ते त्याला करायला मिळालं नाही तर त्याची उपासमार होईल. पोटाच्या उपासमारीपेक्षा ही उपासमार वाईट.जगणं निरर्थक वाटायला लागतं ते हया उपासमारीमुळे.

बापू, - विठोबाची मी हीच उपासमार केली का? होय राधा, बिचा-याला निवांत प्रेमसुद्धा करू दिलं नाही. गेल्या महिनाभरात त्याला भेटायला गेलो नाही, म्हणून त्यानं जीव दिला. नोकरी करायला पुलावर आलो हे त्याला आवडलं नाही. काय बिचा-याची वासना राहिली आहे, देवजाणे.

राधा - कावळा शिवला नाही का?

बापू - नाही. चार तास वाट पाहिली. पिंडाभोवती कावळे नाचत होते, पण कोणी शिवायला तयार नाही.

'गारंबीचा बापू'

शब्दार्थ

१ कळशी - पाण्याची लहान घागर (तांब्याची किंवा पितळेची)

बुरशी	-	दुधाचे पदार्थ, मिठाई इ. बरेच दिवस पडून राहिल्यावर ते खराब होऊन त्यावर पांढरा थर येतो त्याला बुरशी म्हणतात.
सडा	-	डोंगरमाथ्यावरची सपाट जागा, पठार
लेप	-	थर
हिणकस	-	कमी, हलक्या दर्जाचे
वासना	-	इच्छा, अपेक्षा
पिंड	-	मृताच्या आत्म्याला नैवेद्य दाखवण्यासाठी दहीभाताचे गोळे करून ठेवतात. श्राद्ध, तेरावा दिवस इ. दिवशी हे पिंड करतात.

१ सांस्कृतिक टिपा

कावळा शिवणे - माणूस मेल्यानंतर बाराव्या दिवशी स्मशानात दहीभाताचे गोळे मृतात्म्याला नैवेद्य म्हणून ठेवतात. अंत्यसंस्कारातलाच हा एक भाग असतो. मेलेल्या माणसाची एखादी इच्छा अपुरी राहिली असेल तर त्याचा आत्मा मुक्त होत नाही, तो मागेच रहातो अशी समजूत आहे. अशावेळी या दहीभाताच्या पिंडाला कावळे अजिबात शिवत नाहीत. नातेवाईकांनी त्या मृतात्म्याची इच्छा ओळखून ती पूर्ण करण्याचे वचन दिले तर कावळा शिवतो. कावळा अजिबात शिवला नाही तर दर्भाचा कावळा करून त्याचा पिंडाला स्पर्श करतात. ज्याच्या पिंडाळा कावळा शिवत नाही तो अतृप्त आत्मा पिशाच्च होतो अशी समजूत आहे.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा

१ राधेकडे परत आला तेव्हा बापूची मनःस्थिती कशी होती?

२ बापूच्या आजारपणात विठोबाने त्याची कशी सेवा केली होती?

३ आपल्यावर प्रेम करणा-या माणसांबद्दल बापूला काय वाटतं?

४ प्रेम करावं असे बापूमधे कोणते गुण आहेत?

५ सर्वजण स्वार्थापायी प्रेम करतात, असं राधा का म्हणते?

६ विठोबाने कशामुळे जीव दिला असं बापूला वाटतं?

प्रश्न २ टिपा लिहा

१ विठोबा

२ राधेचा प्रेमाबद्दलचा दृष्टिकोण

३ तेरावा दिवस - कावळा शिवणे

४ बापूची व्यक्तिरेखा

५ राधेची व्यक्तिरेखा

प्रश्न ३ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा

१ माझी कोणती सेवा करायचं बाकी ठेवलंन विठोबानं?

२ मी त्याला काहीच दिलं नाही गं, त्याच्याकडून घेतच राहिलो.

३ आयुष्यभर ही गोष्ट मला खात राहील.

४ तुमच्याकडे पाहिलं की माझी मला लाज वाटायला लागते.

५ कोणी कोणावर उगीच जीव टाकत नाही.

६ सारी स्वार्थापायी प्रेम करतात.

७ प्रेम करणं हा माणसाचा धर्म आहे.

८ पोटाच्या उपासमारीपेक्षा ही उपासमार वाईट.

९ जगणं निरर्थक वाटायला लागतं ते ह्या उपासमारीमुळं.

१० काय बिचा-याची वासना राहिली आहे, देव जाणे.

११ पिंडाभोवती कावळे नाचत होते, पण कोणी शिवायला तयार नाही.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक् यचारांचा स्वतंत्र व़ाक्यात उपयोग करा.

बाकी ठेवणे, तडफड चालणे, एरवादी गोष्ट खात रहाणे, प्रसंग पडला तर, लोभ करणे, जीव टाकणे, च्था पाथी, देव जाणे, वासना रहाणे, जिवाला जीव देणे.

प्रश्न २ शब्दांचा अर्थ स्पष्ट करा.

सडथावर, बुरशी, कळशी, उघड, हिणकस, निवांत, वासना, पिंड.

प्रश्न ३ विरुध्द अर्थाचे शब्द द्या.

शेवटची, लोभ, उधड, निरर्थक, विस्वास, स्वार्थ, हिणकस.

प्रश्न ४ साधी वाक्ये बनवा.

१ आणि रे सारं काम करून दमून धरी आत्थावर.

२ केव्हा ठेवलान देवजाणे.

३ मासी कोगती सेवा करायचं बाकी ठेवलंन विठेबानं ?

४ काय केलं मी तुमच्याकरता ?

५ सूचनेप्रमाणे बदल करा -

अ) कोजी कोणावर उगीच जीव टाकत नाही. (होकारार्थो)

ब) पोटाच्या उपासमारीपेक्शा ही उपासमार वाईट. (नकारार्थो)

प्रश्न ५ माझी नव्हती एवढी त्याची तडफड चालायची ही वाक्यरचना नीट पहा. हेच वाक्यमाझ्यापेक्षा त्याची जास्त तडफड चालायची असेही लिहिता येते. पुढील वाक्ये बदलून वरील वाक्याप्रमाणे लिहा.

१ सख्ख्या भावापेक्षा त्यानी सावत्र भावावर जास्त प्रेम केलं.

२ आगीत घरापेक्षा त्यांना गोठयातल्या गुरांची जास्त काळजी वाटली.

३ ब्रिटिशांनी राजापेक्षा चर्चिल यांना अधिक मान दिला.

४ माझ्या जिवापेक्षा मला तुझ्या भावाची जास्त काळजी आहे.

५ एखाद्या अप्सरेपेक्षा ती सुंदर आहे.

प्रश्न ६ जेवून घे - जेव या अर्थी. आज्ञार्थाचा एक वेगळा प्रकार. अशीच जाऊन ये, पाहून ठेव, खाऊन टाक, वापरून बघ इ. रूपेही वापरतात या प्रकारात 'टाक' हे सहायक क्रियापद जास्त येते. जेवून घे प्रमाणेच खाऊन घे, आंघोळ करून घे, पाहून घे, नेसून घे, हात धुऊन घे इ. क्रियापदांचा वापरही 'घे'बरोबर होतो. या सर्वांची वाक्ये बनवा.

प्रश्न ७ रडायचा थांब - धातु+आयला+लाग अशा रूपातून एखादी क्रिया सुरू होते. उदाः सुनीता अभ्यास करायला लागली. उलट 'थांब' साठी मात्र धातु+आयचा हे रूप वापरावे लागते.

उदाः तो एकदम बोलायचा थांबला. मधेच ती वाढायची थांबली. धातु+आयला, आयचा वापरुन ५ - ५ वाक्ये बनवा.

प्रश्न ८ पुढील परिच्छेद रीतिभूतकाळाच्या दुसऱ्या दोन पद्धतीनी लिहा.

रात्री दोन दोन वाजेपर्यंत जागे, पाय रगडी, शेकी, कुणी सांगेल तो पाला सडयावर जाऊन आणी आणि चटणी करून लेप देई. आंघोळ घाली, माझा दुखरा पाय तासंतास मांडीवर घेऊन बसे. दर पाच मिनिटांनी विचारी, "दुखायच कमी झालं?"

प्रश्न ९) दुखरा हे विशेषण दुखणे धातूपासून बनले आहे. इथे 'णारा' प्रत्यय न लागता फक्त रा लागला आहे. अशी आणखी काही विशेषणं पहा-

हसरा चेहरा, कापरा हात, बोचरी थंडी, चावरे वारे इ.

याप्रमाणेच 'का' लागूनही विशेषणे बनतात.

भाजक्या शेंगा, फाटकी साडी, बोलकी बाहुली, मोजके लोक,
बसकं नाक इ.

या विशेषणांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा.

पूरक वाचन/लेखन

१) 'गारंबीचा बापू' ही कादंबरी मुळातून वाचा आणि बापू व राधा यांच्या व्यक्तित्वावर टिपण लिहा.

२) 'सर्वजण स्वार्थापायी प्रेम करतात' हा विचार तुम्हाला पटतो का? तुमचा अनुभव थोडक्यात लिहा.

३) ज्यांनी आपल्यावर निःस्वार्थ प्रेम केलं पण आपणमात्र त्यांची कदर केली नाही अशा तुमच्या आयुष्यातल्या एखाद्या घटनेचं वर्णन करा.

चार नाट्यउताऱ्यांवर प्रश्न

१ तुम्ही अभ्यासलेल्या नाटकांमधल्या उताऱ्यांच्या आधारे मराठी नाटकांविषयी एक निबंध लिहा.

२ राधेची प्रेमकल्पना आणि हेमाची प्रेमकल्पना यांची तुलना करा.

३ तेंडुलकर, अत्रे, पु.ल. देशपांडे आणि श्री.ना. पेडंसे या चार नाटककारांच्या भाषाशैलीचे विशेष सांगा.

धडा सहावा

मातीचा वास

लेखक. श्री. अच्युत बर्वे
(जन्म १९२७ मृत्यू १९८२)

परिचय

प्रसिद्ध मराठी कथाकार आणि कादंबरीकार. 'आंबटगोड', 'चंदनाचा उंबरठा', 'चांदण्याचा सुगंध', 'झोका', 'केवडयाची पानं', 'हॅंगओव्हर' इ. त्यांचे कथासंग्रह. 'लाखेचे मणी' या नावाचं त्यांचं नाटकही आहे. तथापि त्यांची विशेष कीर्ती कादंबरीकार म्हणूनच झाली. 'मातीचा वास' (१९६२) 'कॅलिडिओस्कोप' (१९७७) आणि 'सुखदा' (१९६१) या त्यांच्या कादंब-या अतिशय गाजल्या. मानवी मनाचे निरनिराळे पदर ते अतिशय बारकाईने उलगडून दाखवतात. त्यांची 'कॅलिडिओस्कोप'ही कादंबरी त्या दृष्टीने वाचण्याजोगी आहे. 'सुखदा' या अखेरच्या कादंबरीत त्यांनी आपल्या मूकबधिर मुलीला स्वतःच्या पायावर उभी करण्यासाठी दिलेला झगडा अतिशय हळुवारपणे रंगवला आहे.

'मातीचा वास' या स्त्रीपुरुषसंबंधावर आधारित कादंबरीत निसर्गाला महत्त्वाचे स्थान आहे.दापोलीचे वायदेवराव वकील. त्यांचा मुलगा मुकुंदा ही गोष्ट सांगतो आहे. त्यांच्या नव्या बंगल्यात एक बिऱ्हाड येणार आहे. ही मुलगी आईच्या ओळखीची असते. तिचा नवरा पोस्टात कारकून असतो. येणा-या बि-हाडाबद्दल घरात चर्चा चाललेली असते - मुलगी कशी आहे? चांगली आहे. चांगली म्हणजे कशी? अक्कूसारखी (मुकुंदाची लग्न झालेली बहीण) का? हा मुकुंदाचा प्रश्न. अक्कू बारीक आहे. वेणा (भावे) थोराड आहे. बालमनाचं कुतूहल असतं ती कशी असेल?

मातीचा वास

पाऊस पड़ेल असं आईला वाटत होतं आणि पाऊस पडणार नाही असं अण्णा ठामपणे सांगत होते. पावसाला सुरुवात व्हायची असली की त्याचा रागरंग दोनचार दिवस अगोदर दिसू लागतो.वा-याचीं नेहमीची दिशा बदलते आणि दक्षिणवारा सुटतो आकाशात ढग जमतात. थोडाफार गडगडाट होतो. पण वारा ढगांना पांगवून टाकतो. असं दोनचार दिवस चालतं. हळूहळू वा-याचा वेग मंदावत जातो. आकाशातले ढग मोठेमोठे आणि आधिकाधिक काळे होत जातात. पाऊस पडायचा झाला की त्याची पहिली खबर पशुपक्ष्यांना लागते. चिमण्यांचा थवा जमिनीवर उतरतो आणि आपले पंख धुळीत माखले तरी आता चिमण्यांना त्याची पर्वा नसते. बेडूक डराव डराव करून पावसाला हाक देतात. रात्रीच्या वेळी पाऊस आला तर तो वाट चुकेल हया भयानी काजवे लखलखू लागतात आणि झाडाझुडपांवर लखलखाट करून सोडतात. अशी सगळी तयारी झाली की एकमेकांचा विचार घेण्याकरता ढग जवळजवळ येतात आणि पहाता पहाता जमिनीवर छत्री धरतात आणि मग एखाद्या राजानी वाजतगाजत आणि रोषणाईच्या लखलखाटात यावं तसा ढगांच्या गडगडाटात आणि विजेच्या चमचमाटात वरुणराज जमिनीवर उतरतो. एकदा आला की गौरी गणपती जाईपर्यंत तळ ठोकून रहातो.

अण्णा हे सगळं सांगत आहेत तोच घराच्या दिशेनी बैलगाडीचा आवाज ऐकू येऊ लागला. आईनी विचारलं, 'घंटांचा आवाज ऐकू येतोय का हो?'

'कोण शहाणा हया वा-यातून गाडी हाकतोय कुणास ठाऊक! गाडीचा आवाज जवळ जवळ आला. चाकांचा खडखडाट स्पष्टपणे कानावर आला. लगबगीनी गजापाशी जाऊन बाहेर पहात आई म्हणाली "अहो, ती आलेली दिसतेय" आणि मग एकच धांदल उडाली.

तिला घेऊन येणारी बैलगाडी दाराशी येऊन उभी राहिली होती. गजातून बाहेर

पहात आई म्हणत होती, "अहो, ती आलेली दिसतेय". आईचे हे बोलणे ऐकून कुठाय, कुठाय करत मी एकदा दरवाजा उघडायला हवा होता. पण मला एकदम लाज वाटू लागली. वर्गात कुणी नवीन मुलगा आला की त्याला भेटताना वाटते तशी! तिला पहायला मी पुढे व्हायला हवे होते. पण पुढे होण्याऐवजी मी माघारी वळलो. एकदम जिन्याकडे धूम ठोकली.

'मातीचा वास'

शब्दार्थ

ठामपणे	-	निश्चितपणे
रागरंग	-	खुणा - चिन्ह
पांगवणे	-	पसरवून देणे, दूरदूर घालवणे (गर्दीसाठी हा शब्द वापरतात)
पर्वा	-	काळजी, फिकीर,
पहाता पहाता	-	अगदी थोडया वेळात.
धांदल	-	घाई, गडबड
धूम ठोकणे	-	पळून जाणे.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ पाऊस येण्यापूर्वी वारा आणि ढग यांच्यात कोणते बदल होतात?

२ पावसाची खबर कोणत्या पशुपक्ष्यांना लागते? पावसाच्या स्वागतासाठी ते काय करतात?

३ 'तिचं' आगमन कसं झालं?

४ मुलानी दार का उघडलं नाही?

५ या उता-यातल्या पावसाच्या वर्णनात कोणता वेगळेपणा आहे?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा

१ आपले पंख धुळीत माखले तरी आता चिमण्यांना त्याची पर्वा नसते.

२ रात्रीच्या वेळी पाऊस आला तर तो वाट चुकेल हया भयानी काजवे लखलखू लागतात.

३ सगळी तयारी झाली की एकमेकांचा विचार घेण्यासाठी ढग जवळ येतात.

४ कोण शहाणा हया वा-यातून गाडी हाकतोय कुणास ठाऊक!

५ पण पुढे होण्याऐवजी मी माघारी वळलो.

भाषाभ्यास

प्रश्न १ पुढील शब्दांचा अर्थ स्पष्ट करून वाक्यात उपयोग करा.

रागरंग, ठामपणे, थोडाफार, वाजत गाजत, माघारी लगबगीनी, माखणे.

प्रश्न २ मूळ क्रियापद देऊन खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा -

गडगडाट, चमचमाट, लखलखाट, खडखडाट

प्रश्न ३ खालील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा

पांगवून टाकणे,
खबर लागणे,
पर्वा असणे/ नसणे,
धांदल उडणे,
धुळीत माखणे,
लाज वाटणे

हाक देणे,
विचार घेणे,
तळ ठोकून रहाणे,
धूम ठोकणे,
पहाता पहाता,
कोण शहाणा

प्रश्न ४ पावसाला सुरुवात व्हायची असली की - ही वाक्यरचना समजून घ्या. जर पाऊस सुरू होणार असेल तर - असा त्याचा अर्थ आहे. उदाः-

१ पाहुणे यायचे असले की, दारासमोर कावळा ओरडतो.

२ पाऊस पडायचा असला की, त्याची खबर पशुपक्ष्यांना लागते.

३ लौकर उठायचं असलं की, मी गजर लावते.

४ सर्कस पहायची असली की, मुलं पटापट आवरून तयार होतात.

याप्रमाणे तुम्ही दहा वाक्यं तयार करा.

प्रश्न ५ वर्णनासाठी वापरलेली ही वाक्यरचना पहा - एखाद्या राजानी वाजत गाजत यावं तसा वरुणराज जमिनीवर उतरतो. हेच वाक्य जसा - तसा वापरून लिहा. अशी आणखी काही वाक्यं पहा -

१ एखादी हरिणी उडया मारत यावी तशी ती मुलगी आली.

२ एखाद्या राणीनी सिंहासनावर बसून हुकूम सोडावा तशी ती आज्ञा - देत होती.

३ पावसात भिजलेलं एखादं कुत्र्याचं पिल्लू थरथरावं तसा तो आपल्या साहेबापुढे कापत होता. अशा तहेची ५ - ७ वाक्यं तुम्ही बनवा.

प्रश्न ६ 'अण्णा हे सगळं सांगत आहेत तोच घराच्या दिशेनी बैलगाडीचा आवाज ऐकू येऊ लागला, हेच वाक्य निराळया पद्धतीनी लिहिता येते-

उदाः - अण्णा ---- सांगत आहेत इतक्यात- अण्णा --- सांगत असतानाच - पुढील वाक्यं तोच आणि इतक्यात वापरून पुन्हा लिहा.

१ आगगाडीत तो पाऊल ठेवत असतानाच गाडीनी वेग घेतला.

२ मी कुलूप लावत असतानाच पोस्टमन दारात उभा राहिला.

३ मांजर दुधाचं पातेलं सांडत असतानाच आई तिथे आली.

४ वाघ झेपावत असतानाच शिका-यानी गोळी झाडली.

प्रश्न ७ वा-याचा वेग मंदावत जातो. ढग अधिकाधिक काळे होत जातात या रचनेतून सावकाश होणारा बदल सूचित केला जातो. उदा:

१ गाडीची वेळ झाली की गर्दी वाढत जाते.

२ ऊन वाढतं तसे आंबे पिकत जातात.

३ वय होतं तसा उत्साह कमी होत जातो. अशी तुम्ही चार वाक्यं बनवा.

प्रश्न ८ पक्ष्यांचा थवा - अनेक पक्ष्यांच्या समूहासाठी थवा हा शब्द वापरतात. गुरांचा - जनावरांचा कळप, तारकांचा पुंज हेच विशिष्ट शब्द वापरतात. माणसांसाठी थवा, गट, जमाव, समूह, जत्था असे अनेक शब्द वापरले जातात. शब्दांचा हा विशिष्ट वापर समजून घ्या.

प्रश्न ९ मंदावणे - मंद ह्या विशेषणापासून मंद होणे या अर्थाचे क्रियापद बनले आहे. अशीच उंच, रोड, ओला, रुंद, जड, स्थिर या विशेषणांची क्रियापदे बनवून त्यांचा वाक्यात उपयोग करा.

प्रश्न१० मी दरवाजा उघडायला हवा होता. मी पुढे व्हायला हवे होते. ही वाक्ये पहा. धातू+आयला नंतर सकर्मक धातू असल्यास कर्माप्रमाणे श्हवा' चे रूप किंवा श्हवं' हे नपुं रूप वापरून होता मधून भूतकाळ; यातून पूर्वीची इच्छा, अपेक्षा व्यक्त होते. अशी तुम्ही पाच वाक्ये बनवा.

पूरक वाचन लेखन

१ 'मातीचा वास' ही कादंबरी वाचा अणि मातीच्या वासाचे त्या कादंबरीत काय स्थान आहे ते लिहा.

२ दुर्गा भागवत यांचे 'ऋतुचक्र' हे पुस्तक वाचून निरनिराळया ऋतूंच्या वर्णनातले बारकावे समजून घ्या.

३ रा. भि. जोशी यांचा 'महाबळेश्वर भिजरे आणि हसरे' हा लेख पावसाच्या वर्णनासाठी वाचा . या उता-यातील निसर्गवर्णनाप्रमाणे खालील विषयांवर वर्णनपर निबंध लिहा -

१ धुक्यातली पहाट

२ शरद ऋतूतली चांदणी रात्र

३ उन्हाळ्यातली संध्याकाळ

४ वळवाचा पाऊस (उन्हाळ्यातला वादळी पाऊस)

५ 'पक्ष्यांचे लक्ष थवे' ही महानोरांची कविता वाचा आणि तिचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

धडा सातवा

मीच हे सांगितलं पाहिजे

लेखिका. श्रीमती शीलवती श्रीधर. केतकर
(जन्म १८८७ मृत्यू १९३७)

परिचय

श्रीमती शीलवती श्रीधर केतकर हया ज्ञान-कोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर (ज. १८८४ - मृत्यू १९३७) यांच्या पत्नी. त्या मूळच्या ज्यू होत्या. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव कु. एडिथ कोहेन असे होते.

डॉ. केतकर विद्याभ्यासासाठी इंग्लंडला गेले असता लेखिकेशी त्यांचा परिचय झाला आणि पुढे भारतात आल्यावर विवाह झाला. शीलवतीबाईंना आपल्या पतीच्या पांडित्याचा फार अभिमान होता. त्यांची पतीवर, त्यांच्या कार्यावर अपार निष्ठा होती. भारतीय समाजाशी त्या पूर्णपणे एकरूप होऊन गेल्या होत्या. वीरा ही त्यांची दत्तक मुलगी. डॉ. केतकर प्रकांड पंडित असले तरी त्यांच्या कार्याची योग्य ती बूज राखली गेली नव्हती. त्यांच्या विक्षिप्त वागण्यामुळेही काही गैरसमज पसरले होते. अशावेळी 'मीच हे सांगितलं पाहिजे' हे आत्मवृत्त लिहून शीलवतीबाईंनी या पंडिताचे खरेखुरे व्यक्तित्व लोकांसमोर मांडले. श्रीमती केतकर उकृष्ट भाषांतरकर्त्या मानल्या जातात.

मीच हे सांगितलं पाहिजे

१

एकदा असं झालं! डॉ. केतकर चाळिशीच्या आसपास होते, त्यावेळचा हा प्रसंग आहे. त्या दिवशी त्यांचा वाढदिवस होता. त्यांच्या वयाच्या वर्षांइतक्या मेणबत्त्या पेटवून

आम्ही केकभोवती उभ्या केल्या. मेणबत्त्यांचा झगझगीत प्रकाश सभोवती पसरला होता. आम्हाला वाटलं, डॉक्टरांचा सदा आनंदित दिसणारा चेहरा या प्रकाशात अधिकच उजळून निघालेला आम्हाला पहायला मिळेल. पण आम्हाला जे दिसलं ते भयंकर होतं. वाढदिवसाच्या आनंदाची छटा तर चेह-यावर नव्हतीच. उलट कसल्यातरी गूढ भीतीनी त्यांचा चेहरा ग्रासलेला दिसला. वाढदिवसासारख्या आनंदाच्या प्रसंगी डॉक्टरांचा तो भयकंपित चेहरा पाहून आम्हाला मोठाच धक्का बसला. निश्चयी स्वरात डॉक्टरांनी सांगितलं, "वाढदिवसाच्या प्रसंगी पुन्हा हा प्रकार करू नका". हे त्यांचे उद्‌गार ऐकून आम्हाला आमची चूक ताबडतोप कळून आली. मेणबत्त्यांच्या प्रकाशानी आसमंत उजळून निघालेला होता. पण हे सौंदर्य पाहून आनंदित होण्याऐवजी आपल्या आयुष्यातली एवढी वर्षं निघून गेली या दुःखद जाणिवेनीच डॉक्टर खिन्न झाले होते. वाढदिवसाच्या या आनंददायक प्रसंगावर अर्थातच विरजण पडलं. आमचा आनंद पळून गेला आणि सर्वत्र खिन्नता पसरली. केकमधली गोडी नाहीशी झाली.

२

यानंतरचे दिवस मात्र एखाद्या भयानक स्वप्नाच्या आठवणींसारखे मला अंधुक आठवतात.यानंतर जे काही घडलं ते सारं खरं होतं का? की तो सारा आभासच होता? मला अजून असं वाटतं की तसं काही घडलंच नसावं आमच्या मुलीला मात्र त्या काळातल्या घटना अगदी स्पष्टपणे आठवतात. ती त्यावेळी अकरा वर्षांची होती. आज ती ऐन उमेदीतली गृहिणी आहे.

केतकर ससून हॉस्पिटलमधे दाखल झाल्यानंतरचे ते दहा दिवस! भयंकर! अगदी भयंकर!निराशेनी आणि भीतीनी आमची मनं ग्रासून गेली होती. आणि मावळणारा एकेक दिवस त्यात अधिकच भर घालून जात होता. आमचा धीर सुटत चालला होता. आयुष्यात कधी नव्हे इतकं वैफल्य आणि असहायता आम्ही अनुभवत होतो. दैवानी आम्हाला अगदी कोंडीत पकडलं होतं. आम्ही स्वतःला आणि एकमेकांना धीर देत होतो. पण त्यातला पोकळपणा आमचा आम्हाला समजत होता. आम्ही आणि डॉक्टर एकमेकांना

आनंदी राखण्याचा प्रयत्न करत होतो. पण तो साराच प्रयत्न अगदी कृत्रिम आणि केविलवाणा वाटत होता. नाटकातल्या पात्रांनी ठरवून दिलेले शब्द बोलावेत तसा!

३

यानंतर जे काही घडलं तेही एखाद्या भयानक स्वप्नासारखं माझ्या आठवणीत राहिलेलं आहे.घरून शव हलवलं आणि मार्गावर साहित्य परिषदेच्या सभागृहात लोकांना अंत्यदर्शन घेता यावं म्हणून थोडा वेळ ठेवण्यात आलं. त्यानंतर अंत्ययात्रा निघाली. दफनाच्या जागी येऊन पोचलो तेव्हा मोठा जनसमुदाय आलेला दिसला. मला हुंदके आवरत नव्हते. एक तरुण मुलगीही दुःखावेगानी रडत होती.ती पुढे आली आणि माझ्या गळ्यात पडली. एक गृहस्थ आले. त्यांचे डोळे डबडबले होते. 'ताई' म्हणून त्यांनी मला मिठी मारली. आमच्या कुटुंबाचे ते चांगले मित्र होते. माझं मन सुन्न झालं होतं. समोर चाललेलं सारं दिसत होतं, पण कशाचाच बोध होत नव्हता 'शांतीः शांतिः शांतिः' एवढे शब्द कानावर पडले आणि आम्ही घरी परत आलो. आम्ही म्हणजे मी आणि माझी मुलं. घर म्हटलं खरं! पण आता कसचं घर? ते आता घर राहिलं नव्हतं. आता उरल्या केवळ चार भिंती. डॉक्टर गेले आणि त्यांच्याबरोबरच घर गेलं.

-'मीच हे सांगितलं पाहिजे'

शब्दार्थ

उजळणे	-	आधिक तेजस्वी, प्रकाशमान दिसणे.
ग्रासलेला	-	गिळून टाकलेला, घेरलेला.
भयकंपित	-	भीतीने थरथरणारा.
आसमंत	-	भोवतीची जागा, परिसर.

अंधुक	-	अस्पष्ट, पुसट.
विरजण	-	दुधाचे दही बनवताना दुधात थोडेसे दही किंवा ताक मिसळतात त्याला विरजण म्हणतात.विरजण पडले की दूध दूध रहात नाही, आंबट दही होते तसे आनंदाच्या प्रसंगी एखादी वाईट गोष्ट घडली की आनंद संपून जातो. म्हणून आनंदावर, उत्साहावर विरजण पडले असा वाक्प्रचार आला.
ऐन उमेदीतली	-	ज्या काळात (विशेषतः तारुण्यात) माणसाचे कर्तृत्व पूर्णपणे व्यक्त होते.
वैफल्य	-	निराशा
असहायता	-	हताशपणा - कुणाचीही मदत नाही अशी स्थिती
कोंडीत पकडणे	-	ज्यातून सुटका करून घेणे शक्य नाही अशा रीतीने पकडणे.
केविलवाणा	-	दया यावी असा.
डबडबलेले डोळे	-	अश्रूंनी काठोकाठ भरलेले डोळे.
सुन्न	-	संवेदनाहीन, बधिर

सांस्कृतिक टिपा

१) वाढदिवस - जन्मदिवस. या दिवशी सर्वजण त्या व्यक्तीचे अभिनंदन करतात. काही भेटवस्तू देतात. लहान मुलांचे वाढदिवस त्यांच्या मित्रमंडळींना बोलावून मजेत साजरे करतात. त्या दिवशी खांबाची पूजा करतात. त्या व्यक्तीला ओवाळतात. जेवायला त्याच्या आवडीचे पक्वान्न करतात. मोठेपणी साठावा, पंच्यात्तरावा आणि शंभरावा - वाढदिवस विशेष महत्त्वाचे असतात. ऐंशीवा वाढदिवस सहस्त्र चंद्रदर्शनाचा विधी करून साजरा करतात. प्रसिद्ध व्यक्तींचे वाढदिवस सार्वजनिक समारंभात सत्कार करून साजरे करतात.

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ केतकरांच्या वाढदिवसाच्या तयारीत तुम्हाला कोणता वेगळेणा दिसतो?

२ वाढदिवसाची तयारी पाहून केतकरांची झालेली प्रतिक्रिया सामान्य माणसांहून वेगळी कशी होती?

३ केतकरांच्या अखेरच्या आजारपणाला शीलवती बाईंनी कसं तोंड दिलं?

४ केतकरांच्या मृत्यूचा निरनिराळ्या माणसांवर काय परिणम झाला?

५ केतकरांच्या सुखदुःखाशी शीलवतीबाई पूर्ण एकरूप झाल्या होत्या हे कोणकोणत्या प्रसंगातून व्यक्त होते?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा

१ उलट कसल्यातरी गूढ भीतीनी त्यांचा चेहरा ग्रासलेला दिसला.

२ वाढदिवसाच्या प्रसंगी पुन्हा हा प्रकार करू नका.

३ वाढदिवसाच्या आनंददायक प्रसंगावर अर्थातच विरजण पडलं.

४ केकमधली गोडी नाहीशी झाली.

५ आयुष्यात कधी नव्हे इतकं वैफल्य आणि असहायता आम्ही अनुभवत होतो.

६ दैवानी आम्हाला अगदी कोंडीत पकडलं होतं.

७ नाटकातल्या पात्रांनी ठरवून दिलेले शब्द बोलावेत तसा -

८ घरी म्हटलं खरं! पण आता कसचं घर?

९ ते आता घर राहिलं नव्हतं.

१० डॉक्टर गेले आणि त्यांच्याबरोबरच घर गेलं.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा

उजळून निघणे भर घालणे

धक्का बसणे	धीर सुटणे/ देणे
चूक कळून येणे	कोंडीत पकडणे
विरजण पडणे	गळ्यात पडणे
ऐन उमेदीतली	ग्रासून जाणे, मन सुन्न होणे.

प्रश्न २ विरुद्ध अर्थाचे शब्द द्या

आनंदित	स्पष्टपणे	अंधुक	उजळून
उमेदीतली	सदा(नेहमी)	खिन्न	वैफल्य
पोकळपणा	कृत्रिम.		

प्रश्न ३ 'चाळिशी' हा वय सांगण्यासाठी वापरला जाणारा विशिष्ट शब्द आहे. चाळिशीनंतर लागणारा चष्मा चाळिशी याच नावानी ओळखला जातो. याप्रमाणे विशी, पंचविशी, तिशी, पन्नाशी, साठी, सत्तरी, नव्वदी आणि शंभरी हे शब्द वापरले जातात.

प्रश्न ४ झगझगीत प्रमाणे लखलखीत, चमचमीत, मिळमिळीत, टळटळीत, सडसडीत इ. विशेषणांचा एक प्रकार आहे. या विशेषणांचा वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ५ 'ग्रासणे' हे क्रियापद फक्त चिंता, भीती, दुःख, नैराश्य इ. भावनांसाठीच वापरले जाते. ते आनंद, उत्साह यासाठी वापरत नाहीत हे ध्यानात ठेवा. दिलेले शब्द ग्रास बरोबर वापरून वाक्यं तयार करा.

प्रश्न ६ निश्चयी - निश्चय या नामापासून बनलेले विशेषण. याप्रमाणे पुढील शब्दांची विशेषणे बनवा -

विजय, गुलाब, मेहनत, इमान, विचार, स्वार्थ, परोपकार, अपयश, विलास, उद्योग. त्या विशेषणांचा वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ७ स्पष्टपणे - स्पष्ट या विशेषणापासून बनलेले क्रियाविशेषण. पुढील शब्दांची अशी रूपे बनवून वाक्ये तयार करा.

रागीट, निर्दय, ठाम, निश्चित, गंभीर, उदार.

प्रश्न ८ पोकळपणा - पोकळ या विशेषणापासून भाववाचक नाम इंग्रजीतील हिंदी 'पन' सारखा हा प्रत्यय आहे . याप्रमाणे खो टा - खो टे पणा, वाईट - वाईटपणा, भला - भलेपणा, चांगला - चांगुलपणा अशी नामे क्वचित थोडाफार बदल होऊन बनतात.

प्रश्न ९ सूचनेप्रमाणे बदल करून लिहा

१ आयुष्यात कधी नव्हे इतकं वैफल्य आम्ही अनुभवत होतो. ('कधीच' वापरा)

२ मला अजून असं वाटतं की तसं काही घडलंच नसावं. ('वाट' ऐवजी 'विश्वास बस' वापरा)

३ त्यांच्या वयाच्या वर्षांइतक्या मेणबत्या पेटवून आम्ही केकभोवती उभ्या केल्या होत्या. (जितका - तितका वापरा)

४ आनंदाची छटा चेह-यावर नव्हतीच उलट कसल्यातरी गूढ भीतीनी त्यांचा चेहरा ग्रासलेला दिसला. ('ऐवजी' वापरा)

५ पुढील वाक्यांमधून 'ऐवजी' काढून ती वाक्ये वरीलप्रमाणे लिहा.

१ त्यानी पैसे देण्याऐवजी शिव्याच दिल्या.

२ सासूला मदत करण्याऐवजी ती त्रासच द्यायला लागली.

३ कोर्टात न्याय मिळण्याऐवजी शिक्षाच झाली.

४ हे सौंदर्य पाहून आनंदित होण्याऐवजी डॉक्टर खिन्न झाले होते.

पूरक वाचन/ लेखन

१ जन्माने ब्रिटिश असलेल्या शीलवतीबाईंनी डॉ. केतकरांशी विवाह केला. त्यांच्या 'मीच हे सांगितलं पाहिजे' या आत्मवृत्तात त्यांनी केतकरांच्या बौद्धिक जीवनाचे, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे सुंदर चित्र रेखाटले आहे. हे आत्मवृत्त मुळातून वाचा.

२ श्रीमती लक्ष्मीबाई टिळकांनी कवी रेव्हरंड टिळकांचे असेच चित्र 'स्मृतिचित्रे' या आत्मवृत्तात रंगवलेआहे. श्रीमती रमाबाई रानडयांच्या 'आमच्या आयुष्यातील आठवणीत' न्या. रानडयांचे थोर व्यक्तित्व प्रकट होते. थोर व्यक्तींच्या पत्नींनी लिहिलेली ही आत्मवृत्तो मराठीत त्यांच्या जिवंत शैलीमुळे अत्यंत प्रसिद्ध आहेत. ती मुळातून वाचा आणि अशा आत्मवृतांविषयी एक टिपण तयार करा.

३ तुमच्या भाषेत स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मवृत्तांची माहिती द्या.

धडा आठवा

प्रेमाची रीत

लेखिका डॉ. श्रीमती इरावती दिनकर कर्वे
(जन्म १९०५ मृत्यू १९७०)

परिचय

इरावती कर्वे या समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्राच्या विद्वान अभ्यासक. शास्त्रीय संशोधनपर लिखाण त्यांनी केलेच, पण संशोधन करताना आलेल्या अनेक अनुभवांवर ललित निबंध आणि चिंतनपर निबंध लिहून त्यांनी उत्कृष्ट साहित्यनिर्मिती केली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शास्त्रज्ञ, कविमन आणि गृहिणी यांचे सुंदर मिश्रण होते. अतिप्राचीन काळापासून ते आजपर्यंतचा दीर्घ काळ आणि भारतातल्या आदिवासींच्या जंगलांपासून परदेशापर्यंत पसरलेला विशाल प्रदेश असा त्यांच्या अनुभवांचा विस्तारच अतिशय मोठा आहे. सामान्यतः कोणत्याही लेखकाला येऊ शकणार नाहीत असे अनुभव त्यांना आले. हे अनुभव घेताना त्यांचे संस्कारी आणि संवेदनशील मन सतत जागे होते. अत्यंत सोप्या, अनौपचारिक भाषेत लिहिलेले त्यांचे ललित निबंध वाचकाचे जीवन समृद्ध करतात. 'परिपूर्ती', 'भोवरा', 'गंगाजळ'हे त्यांचे ललित निबंधांचे संग्रह. त्यांनी महाभारतावर लिहिलेल्या 'युगान्त' या चिंतनपर ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार (१९६८) मिळाला होता.

प्रेमाची रीत

"तुला जर माझ्या मुक्याचा इतका तिटकारा वाटत असेल तर परत नाही हो घेणार! दुसरी एखादी असती तर तुझ्याशी बोललीसुद्धा नसती. पण मला तुझ्या नक्याबद्दल माया वाटते ना!"

म्हातारी का संतापली मला समजेचना! माझं लग्न व्हायच्या आधी माझा नवरा जर्मनीत असताना त्यानी जोडलेल्या माणसांपैकी ती होती. तो तिला 'आजी' म्हणे. तिनी त्याला जर्मन शिकवलं. त्याला परदेशात तिचं घर म्हणजे एक आसराच होता. पुढे मी जर्मनीत गेल्यावर त्याची बायको म्हणून तिनी एखाद्या आप्ताप्रमाणे माझं स्वागत केलं. चार ठिकाणी हिंडून चांगल्या कुटुंबात मला बि-हाड बघून दिलं. बर्लिनच्या विश्वविद्यालयातील दोनचार अध्यापकांना भेटून माझं नाव नोंदवलं. मी जरी कितीही कामात असले तरी पंधरा दिवसांतून एका शनिवारी संध्याकाळी तिच्याकडे जायचे व जेवून परत यायचे किंवा तिच्याकडेच रहायचे असा माझा क्रम असे. आजही मी नेहमीप्रमाणे घंटा वाजवल्यावर तिनी दार उघडून मोठया प्रेमानी माझं स्वागत केलं व नंतर संतापानी ती वरील वाक्य बोलली. म्हातारी म्हणजे एक लहानशी नाजूक नाजूक बाहुलीच होती जणू! तिचे पांढरेशुभ्र केस, गोरागोरा वर्ण, किंचित सुरकुतलेलं तोंड, तिचा नीटनेटका श्रीमंती पोशाख, मागच्या पिढीचा नमुना म्हणून संग्रहालयात ठेवण्याजोगी होती ती. मी स्नेहभरानी तिच्या खांद्यावर हात ठेवला व आश्चर्यानी विचारलं, "पण आजी, मी केलं तरी काय? तुला रागवायला झालं तरी काय?"

"म्हणे रागवायला काय झालं! तू आल्या दिवसापासून मी पहाते आहे. तुझा मुका घेतला की तू ताबडतोप गाल पुसून टाकतेस इतकी का तुला घाण वाटते? का तू ब्राह्मण म्हणून तुला विटाळ होतो?"

मी चकित झाले. "खरंच का मी गाल पुसून टाकत होते? मग ही क्रिया अगदी मला नकळत होत असली पाहिजे. मी जाणूनबुजून नव्हते ग तसं करत". मी थोडी थांबले व पुढे म्हणाले, "किनई, आमच्यात अशी चाल नाही. नकळत अपराध झाला. तुझा अपमान करणं माझ्या स्वप्नात सुद्धा येणार नाही हो. त्यातून तू तर नव-याची आजी. म्हणजे तुला केवढा मान द्यायला पाहिजे!"

म्हातारीचं एवढयावर समाधान झालं. ती चौकस होती व वाचणारीही होती. हिंदू रीतिरिवाज तिला थोडेथोडे माहीत होते. आम्ही हातात हात अडकवून घरात

जात असताना तिनी विचारलं, "काय ग, तुझ्या सासूनी तुझा मुका घेतला तर काय करतेस ग?" तिच्या प्रश्नानी मला हसूच लोटलं. मी म्हटलं," माझी सासू तर मुका घेणार नाहीच पण माझी आईसुद्धा एवढया मोठया लेकीचा मुका घेणार नाही"

आता चकित होण्याची तिची पाळी होती!

'परिपूर्ति'

शब्दार्थ

तिटकारा	-	घृणा, तिरस्कार
आसरा	-	आश्रय, आधार, निवारा
आप्त	-	नातेवाईक
बि-हाड	-	रहाण्यासाठी जागा, बायकामुलांसह जागा घेऊन रहाणे, भाडं देऊनं रहाणे इ. अर्थ.
विटाळ	-	उच्च वर्णाच्या लोकांना अस्पृश्यांनी स्पर्श केला तर ते चालत नाही. या निषेधाला विटाळ म्हणतात.
जाणूनबुजून	-	मुद्दाम, कळत असूनही
चाल	-	पद्धत, रीत
चौकस	-	पुष्कळ माहिती मिळण्याची उत्सुकता असणारे.
लेक	-	मुलगी (कन्या या अर्थी)

'चाल' चे चार अर्थ आहेत

१ चाल	-	क्रियापद (प्रत्यक्ष कर्ता) To walk
२ चाल	-	अप्रत्यक्ष कर्ता - प्रत्यक्ष कर्ता can accept मला दही चालेल.

३ चाल - नाम Tune of the song - धून

४ चाल - नाम Custom, tradition, रिवाज

सांस्कृतिक टिपा -

१) **विटाळ होणे** - ब्राह्मणाला नीच जातीच्या माणसाचा स्पर्श झाला तर त्याला विटाळ होतो. म्हणजे त्याचे पावित्र्य भ्रष्ट होतं अशी समजूत आहे. अस्पृश्याची नुसती सावली जरी ब्राह्मणाच्या अंगावर पडली तरी त्याला विटाळ होतो. पूजेसाठी किंवा खास स्वैपाकासाठी सोवळं (रेशमी वस्त्र) नेसलेल्या व्यक्तीला सोवळं न नेसलेल्या कुटुंबियाचा जरी स्पर्श झाला तरी विटाळ होतो. याशिवाय मासिक पाळीतल्या स्त्रीला, दहा दिवस पर्यंत बाळंतिणीला किंवा मृताच्या शरिराला स्पर्श झाला तर विटाळ होतो असं मानतात. विटाळाच्या या कल्पना जुन्या काळात जास्त तीव्र होत्या, आता नाहीत.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा

१ जर्मन म्हातारी आणि लेखिका यांचं काय नातं होतं?

२ परदेशात जर्मन म्हातारीचा लेखिकेला कोणकोणत्या गोष्टीत उपयोग झाला?

३ लेखिकेने केलेल्या म्हातारीच्या वर्णनात वैशिष्ट्यपूर्ण असे तुम्हाला काय आढळते?

४ म्हातारी लेखिकेवर का रागावली?

५ लेखिकेनी म्हातारीचा राग कसा घालवला?

६ जर्मन म्हातारी चकित होण्याचे कारण काय?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा

१ दुसरी एखादी असती तर तुझ्याशी बोललीसुद्धा नसती.

२ माझा नवरा जर्मनीत असताना त्यानी जोडलेल्या माणसांपैकी ती होती.

३ म्हातारी म्हणजे एक लहानशी नाजूक नाजूक बाहुलीच होती जणू.

४ मागच्या पिढीचा नमुना म्हणून संग्रहालयात ठेवण्याजोगी होती ती.

५ का तू ब्राह्मण म्हणून तुला विटाळ होतो?

६ तुझा अपमान करणं माझ्या स्वप्नातसुद्धा येणार नाही हो!

७ आता चकित होण्याची तिची पाळी होती.

भाषाभ्यास

प्रश्न १ खालील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

तिटकारा वाटणे	बि-हाड थाटणे
माया वाटणे	पाळी असणे
माणसं जोडणे	हसू लोटणे
जाणूनबुजून	ठेवण्याजोगी
मान देणे	विटाळ होणे.

प्रश्न २ पुढील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

बि-हाड, आप्त, जणू, म्हणे, चकित, नकळत, किनई, चाल, आसरा.

प्रश्न ३ दुसरी एखादी असती तर तुझ्याशी बोलली सुद्धा नसती. हेच वाक्य दुसरा, दुसरे, दुस-या हे शब्द वापरून लिहा. 'असता तर' वापरून पाच वाक्यं लिहा.

प्रश्न ४ 'म्हातारी का संतापली मला समजेचना' - समजेचना चा अर्थ समजत नव्हतं - समजलं नाही असा होतो. खालील वाक्ये या रचनेप्रमाणे बदलून लिहा.

१ समोरच्या टोपीवाल्यामुळे मला सिनेमा दिसलाच नाही.

२ दिवसभर काम केलं तरी संपलंच नाही.

३ त्याची किती समजूत घातली तरी तो ऐकतच नाही.

४ सुधानी बाहुली मागितली पण मीना देतच नाही.

५ बाईंनी खूप प्रश्न विचारले पण तो तोंड उघडतच नाही.

प्रश्न ५ त्यानी जोडलेल्या माणसांपैकी ती होती. माणसं जोडणे या वाक्प्रचाराचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी ही वाक्ये पहा -

१ नवीन गावात चार माणसं जोडावी लागतात. केव्हाही त्यांची गरज पडते.

२ माझी आई सर्वांशी मिळूनमिसळून वागे. माणसं जोडण्याची कला तिला उत्तम येत होती.

३ जोडलेला पैसा बरोबर नेता येत नाही.

४ जोडूनिया धन उत्तम वेव्हारे उदास विचारे वेच करी.

प्रश्न ६ इतकी का तुला घाण वाटते?

का तू ब्राह्मण म्हणून तुला विटाळ होतो?

खरंच का मी गाल पुसून टाकत होते?

वरील प्रश्नात प्रश्नवाचक 'का' वाक्याच्या शेवटी न येता निरनिराळ्या जागी आले आहे. संभाषणातल्या भाषेचे हे वेगळे रूप लक्षात घेऊन अशी १० वाक्ये बनवा.

प्रश्न ७ ठेवण्याजोगी - ठेवावी अशी, ठेवण्यासाठी योग्य असा अर्थ

१ तुला देण्याजोगं माझ्याजवळ काही नाही.

२ इतका काही पहाण्याजोगा नाही सिनेमा.

३ राजाची राणी होण्याजोगी ती मुलगी आहे.

४ रोज वापरण्याजोग्या साडया हव्यात मला.

५ शंभरजणांना दाखवण्याजोगं काय आहे त्या फोटोत? वरील वाक्यात 'जोगा' लावलेली रूपे वर दिल्याप्रमाणे फोड करून लिहा. 'जोगा' वापरून ५ स्वतंत्र वाक्यं करा.

प्रश्न ८ सूचनेप्रमाणे बदलून लिहा.

१ त्याला परदेशात तिचं घर म्हणजे आसराच होता. (म्हणजे ऐवजी जणू वापरा)

२ मी जाणूनबुजून नव्हते ग तसं करत (नकळत वापरा)

प्रश्न ९ त्यातून तू तर नव-याची आंजी मग ———— याप्रमाणे पुढील वाक्ये पूर्ण करा ————

१ त्यातून तुम्ही तर सख्खे भाऊ ————

२ त्यातून तो तर प्रत्यक्ष राजा ————

३ त्यातून ती तर पोटची मुलगी ————

प्रश्न१० माझी सासूतर मुका घेणार नाहीच पण माझी आई सुद्धा———— नाही. हेच वाक्य 'माझी सासू, इतकंच काय, माझी आईसुद्धा माझा मुका घेणार नाही.' असेही लिहिता येते. खालील वाक्ये त्याप्रमाणे बदलून लिहा.

१ अर्धं राज्य, इतकंच काय सुईच्या टोकावर मावेल एवढीही जमीन मिळणार नाही.

२ मी इथं रहाणार नाहीच इतकंच काय तोंडही दाखवणार नाही.

३ साधं पत्र, इतकंच काय तोंडी निरोपही पाठवला नाहीस.

पूरक वाचन/ लेखन

१ इरावती कर्वे यांचे 'परिपूर्ती' व 'भोवरा' हे लेखसंग्रह वाचा.

२ जर्मन आणि भारतीय रीतिरिवाज वेगळे असल्यामुळे कसे घोटाळे होतात ते तुम्ही पाहिलंत.

रीतिरिवाज प्रांत, देश, धर्म, जात इ. प्रमाणे बदलतात. महाराष्ट्रात तुम्हाला काय वेगळे वाटले याविषयी लिहा.

३ एखादा परदेशी माणूस तुमच्याकडे आला असताना जे घोटाळे झाले असतील त्याचे वर्णन करा.

४ जर्मन म्हातारी लेखिकेच्या घरी पाहुणी आली आहे अशी कल्पना करून त्या कुटुंबातल्या प्रसंगावर एक छोटा नाटयप्रवेश लिहा.

५ इरावतीबाईंची स्त्रीसुलभ भाषा आणि या उता-यात व्यक्त झालेले त्यांचे व्यक्तित्व यावर टिपण लिहा.

धडा नववा

पायाशुद्ध मराठी

लेखक डॉ. नारायण गोविंद कालेलकर
(जन्म १९०६ - मृत्यू १९८९)

परिचय

डॉ.ना.गो.कालेलकर हे मराठीतील सुप्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ, फ्रान्समधे डॉ. झ्यूल ब्लोक यांच्याकडे मराठी भाषाविषयक संशोधनाला, अभ्यासाला त्यांनी सुरुवात केली. ते फ्रेंच आणि पाली भाषांचे जाणकार होते. बौद्धवाङ्मयाचाही त्यांनी अभ्यास केला. 'ध्वनिविचार', 'भाषा, इतिहास व भूगोल', 'भाषा आणि संस्कृती' हे त्यांचे भाषाशास्त्रविषयक ग्रंथलेखन. भाषाशास्त्राच्या संशोधनात समाजाचा विचार सतत केला पहिजे हा त्यांचा आग्रह होता. भाषाशास्त्रात त्यांनी बोलींना प्रतिष्ठा मिळवून दिली. परिभाषा स्वाभाविक आणि समाजाभिमुख असली पाहिजे यावर त्यांचा विशेष जोर असे, शास्त्रीय लेखनातला अचूकपणा, नेमकेपणा आणि विवेचन स्वच्छपणे मांडू शकणारी स्पष्ट पण सोपी भाषा हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी भाषाशास्त्रातली गहन प्रमेये अत्यंत सुबोध भाषेत मांडून मराठीत प्रथमच सामान्य जनांपर्यंत पोचवली. त्यांच्या 'भाषा इतिहास व भूगोल' या ग्रंथाला १९६७ साली साहित्य अकादमीने गौरविले होते.

पायाशुद्ध मराठी

समाजाच्या वरच्या थरातही मराठीपेक्षा संस्कृतकडे अधिक ओढा असतो आणि संस्कृतातही लोकांना न समजणा-या, त्यांना बुचकळ्यात पाडणा-या शब्दांकडे असतो.

बहुतेक वर्तमानपत्रातल्या अग्रलेखांची हीच गत. संस्कृत शब्दांना मराठी प्रत्यय लावले किंवा इंग्रजी शब्दांचे सामान्य माणसाला न समजणारे संस्कृत प्रतिशब्द मराठीत घुसडले म्हणजे का मराठी समृद्ध होणार आहे? ज्या शब्दांचे अर्थ समजायला मूळ इंग्रजी शब्द माहीत असावा लागतो त्यांचा उपयोग काय? आणि इंग्रजी न येणा-या किंवा बेताबातानीच समजणा-या वाचकांची वाट काय? शिवाय एका अर्थाचा तोच तो शब्द एकसारखा वापरण्यात ब-याच लोकांना कमीपणा वाटतो. त्यामुळे भाषेनी दिलेले शब्द वापरून संपले की, कल्पनेने निर्माण केलेले शब्द ते वापरायला लागतात. एका अर्थाच्या असंख्य शब्दांनी शब्दसंग्रह फुगीर दिसला तरी कल्पना व्यक्त करायला आवश्यक अशा शब्दांचे दारिद्र्य त्यांनी नाहीसे होत नाही. उणीव आहे ती अशा शब्दांची आणि चांगल्या विचारांची. मुलांचा शब्दसंग्रह केवळ अमरकोश पाठ करून वाढणार नाही. जीवनातल्या जितक्या अधिक गोष्टींचा आणि वस्तूंचा त्याला परिचय होईल त्यानी तो वाढणार आहे. कमळाला असणारे पन्नास प्रतिशब्द माहीत असण्यापेक्षा पन्नास इतर फुलांची नावे माहीत असणे ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे.

शालेय शिक्षणातल्या साहित्यात विवेचन दाखवले जाते ते ख-या जीवनापासून किती दूर असते!रामभाऊंकडे श्रीखंडपुरी केली होती किंवा शामभटजींनी एका बैठकीत बुंदीचे पन्नास लाडू फस्त केले असे वाचायला मिळेल. पण रामजी पाटलाकडे झिंग्याचा रस्सा केला होता किंवा म्हादबा मो-याकडे मुर्गीपुलावचा बेत होता असे जर कोणी लिहिले तर त्याला पाठय- पुस्तकात जागा मिळणे पूर्ण अशक्य आहे. एवढेच काय, पण कोण कसे बोलतो याप्रमाणेच कोण काय खातो यावरही माणसाचा शुद्धाशुद्धपणा आपल्या समाजात अवलंबून असतो. बहुसंख्य शाकाहारी मुलांच्या आणि ब्राहमण मास्तरांच्या वर्गात मांसाहारी जातींच्या मुलांची कित्येकदा अतिशय कुचंबणा होते ही गोष्ट बहुतेकांना ठाऊक असेल. अशा रीतीनी ज्या ज्या भाषेवर जातीची छाप आहे, ज्या भाषेला बहुजन समाजाच्या जीवनाची तोंडओळखसुद्धा नाही ती भाषा पायाशुद्ध म्हणता येणार नाही. बोलीला जवळची आणि जीवनाचे प्रतिबिंब दाखवणारी भाषा किंवा पोटभाषा हीच शिक्षणाच्या प्रारंभी माध्यम म्हणून वापरली गेली पाहिजे. त्याचप्रमाणे ज्या शिक्षण-संस्थांत समाजाच्या सर्व थरातली मुले येतात तिथे उच्चनीचत्वाची,

शुद्धाशुद्धतेची खुळचट कल्पना जाऊन समाजाच्या बहुविध जीवनाचे दर्शन घडवणारी भाषा आली पाहिजे तरच भाषेचे शिक्षण पायाशुद्ध आहे असे म्हणता येईल.

आपल्याकडच्या क्रमिक पुस्तकात हा पायाशुद्धपणा नाही. किंवा असला तर तो कमीकमी होत चालला आहे. आपल्याकडच्या पुस्तकांवरून मराठी शिकून ती बोलण्याचा जर परकीय माणसानी प्रयत्न केला तर त्याचे हसे होते. इतकी बोली लेखनापासून दुरावली आहे. ह्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे तावडतोब लक्ष देऊन योग्य ती उपाययोजना करण्याचा काळ आता आला आहे.

-'भाषा आणि संस्कृती'

शब्दार्थ -

ओढा	-	आकर्षण, प्रेम. दुसरा अर्थ नाला stream of water
बुचकळ्यात पडणे	-	गोंधळून जाणे
गत	-	गती - अवस्था
घुसडणे	-	मधेच जबरदस्तीनी घालणे, घुसवणे
(ची) वाट काय?	-	सोय काय? What about that?
कुचंबणा	-	मनाची अवघडलेली स्थिती. मोकळेपणा न वाटणे.
खुळचट	-	मूर्खपणाच्या
झिंगे	-	कोलंबी, Prowns माशांचा एक प्रकार.
फुगीर	-	फुगलेला - आकाराने मोठा

सांस्कृतिक टिपा

१ कोण काय खातो यावर माणासाचा शुद्धाशुद्धपणा अवलंबून असतो --- सर्वसाधारणपणे शाकाहारी माणसं मांसाहारी माणसांना अशुद्ध, अस्वच्छ समजतात. शाकाहारी लोकांमधेही कांदालसूण न खाणारे स्वतःला अतिशुद्ध, श्रेष्ठ समजतात. महाराष्ट्रात रस्त्यात उभे राहून खाणे उत्तरेइतके शिष्टसंमत नाही. टेबलावर जेवणे, खाली बसून जेवणे यातही सामाजिक दृष्टीनी फरक केला जातो. चमच्यानी खाणा-याच्या दृष्टीने हातात भाकरी घेऊन जेवणारा शेतकरी किंवा गाडीवान खालच्या दर्जाचे असतात. असे बरेच भेदाभेद आहेत. तुमच्या प्रांतात असे भेद आहेत का? असल्यास त्यांची माहिती द्या.

२ कोण कसे बोलतो यावरही शुद्धतेच्या, उच्चनीचतेच्या कल्पना उभ्या रहातात. तुम्ही पुण्याची भाषा ऐकलीत. प्राध्यापक, कंडक्टर, आचारी, रिक्षावाला, दुकानदार, हमाल यांच्या बोलण्यात तुम्हाला काय फरक दिसला? पुणे शहरातली भाषा आणि इतरत्र खेडयातली भाषा यातला फरक तुमच्या ध्यानात आला का?

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी कोणते चुकीचे मार्ग स्वीकारले जातात?

२ मुलांची भाषा वाढवण्यासाठी काय केले पाहिजे?

३ आजच्या पाठयपुस्तकांमधे कोणते दोष आहेत?

४ भाषेचे शिक्षण पायाशुद्ध होण्यासाठी काय केले पाहिजे?

५ या भाषाविषयक उता-यात लेखकाने कोणते सामाजिक विचार मांडले आहेत?

प्रश्न खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ ज्या शब्दांचे अर्थ समजायला मूळ इंग्रजी शब्द माहीत असावा लागतो त्यांचा उपयोग काय?

२ मुलांचा शब्दसंग्रह केवळ अमरकोश पाठ करून वाढणार नाही.

३ कमळाला असणारे पन्नास प्रतिशब्द माहीत असण्यापेक्षा पन्नास इतर फुलांची नावे माहीत असणे ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे.

४ कोण कसे बोलतो त्याप्रमाणेच कोण काय खातो यावरही माणसाचा शुद्धाशुद्धपणा आपल्या समाजात अवलंबून असतो.

५ ज्या भाषेला बहुजन समाजाची तोंडओळखसुद्धा नाही ती भाषा पायाशुद्ध म्हणता येणार नाही.

६ इतकी बोली लेखनापासून दुरावली आहे.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

ओढा असणे	फस्त करणे
बुचकळ्यात पडणे	बेत असणे
हीच गत	कुचंबणा होणे
वाट काय?	छाप असणे
तोंडओळख असणे	हसे होणे
एवढेच काय	

प्रश्न २ साधी वाक्ये बनवा

१ संस्कृत प्रतिशब्द मराठीत घुसडले म्हणजे का मराठी समृद्ध होणार आहे?

२ ज्या शब्दांचे अर्थ समजायला मूळ इंग्रजी शब्द माहीत असावा लागतो त्यांचा उपयोग काय?

प्रश्न ३ उणीव आहे ती अशा शब्दांची आणि चांगल्या विचारांची. हेच वाक्य 'अशा शब्दांची आणि चांगल्या विचारांची उणीव आहे' असे लिहिले

तर त्याचा परिणाम कमी होतो. पुढील वाक्ये 'उणीव आहे' वापरून लिहा.

१ देशात प्रामाणिक कार्यकर्ते कमी आहेत.

२ शेतक-यांजवळ शेतीची आधुनिक साधने नाहीत.

३ तो बुद्धिमान आहे फक्त भाषा शिकण्यासाठी लागणारी मेहनत तो घेत नाही.

४ चित्रपटात अभिनयच फारसा नव्हता.

पूरक लेखन/वाचन

१ तुमच्या मातृभाषेत असलेल्या भाषेच्या पाठयपुस्तकांविषयी माहिती द्या.

२ तुमच्या शाळांमधून चालणारे भाषाशिक्षण पायाशुद्ध आहे असे तुम्हाला वाटते का?

३ अनावश्यक ठिकाणी संस्कृत शब्द वापरण्याच्या हव्यासाची काही उदाहरणे लिहा.

४ पर्यावरण सहलीत तुम्ही एखादी बोली ऐकली असेल तुम्हाला कुठेकुठे फरक वाटला?

५ या उता-यात कोणते विचार तुम्हाला नवे वाटले? ते तुम्हाला पटले का?

धडा दहावा

बलुतं

लेखक - श्री. दगडू मारुती उर्फ दया पवार
जन्म १९३५ - मृत्यू १९९७

परिचय

दगडू मारुती ऊर्फ दया पवार हे प्रसिद्ध दलित साहित्यिक, कवी. महार या अस्पृश्य जातीत त्यांचा जन्म झाला. खेडयात या अस्पृश्यांच्या वाट्याला येणारे आयुष्य आणि मुंबईच्या अशाच वस्तीतले म्हणजे 'कावाखान्यातल्या' जीवन त्यांनी 'बलुतं' या आपल्या आत्मवृत्तात वर्णन केले आहे. आजपर्यंत साहित्यात कधीच न आलेले गावच्या वेशी (सीमे) बाहेरचे जग या लेखनातून प्रथम लोकांपुढे आले. दलितांच्या जीवनातील वेदना आणि विद्रोह साहित्यरूपात प्रथम मांडणा-या लेखकांमधे दया पवार महत्त्वाचे आहेत. समाजाशी या लेखकाने दिलेला झगडा विचार करायला लावील असा आहे. 'बस्त्याच्या' पद्धतीतून दलित समाजाच्या वेगळ्या राहणीची आपल्याला ओळख होते.

बलुतं

त्या काळी महार मंडळीत लग्नाचा बस्ता बांधणं हा मजेशीर प्रकार. नवरा नवरीचे दोन्ही बाजूंचे नातेवाईक, गावची मंडळी असे सारे जमून बस्ता बांधायला जात. बस्ता बांधणं म्हणजे नवरानवरीला कपडे घेणं हे महत्त्वाचं. सारी मंडळी दुकानापुढं कोंडाळी करून उभी रहात. त्यात दहावीस मंडळी कपडयाची पारख करायला दुकानात.

त्यात एकदोन स्त्रिया हमखास असत.दुकानवाल्याला याची चांगली कल्पना असे. दोन्ही बाजू अशा वेळी एकमेकांना खिंडीत गाठत. दुस-या पार्टीनं ज्या कपडयाला हात लावला असेल तो कपडा घ्यावा लागे. हयावर चिक्कार भांडाभांडी होई. कधीकधी लग्नही मोडे. दुकानदार आपल्या किंमतीला अडून बसे. बस्ता बांधला, म्हणजे दुकानदार मोठया दिलदारवृतीनं सर्वांना चहापाणी करी. चहाचे पैसे दुकानदारानं आधीच किंमतीत काढून घेतले आहेत याची जाणीव मात्र बस्ता बांधणा-यांना नसायची. दादर, म्हातारपाखाडी किंवा डोंगरी अशा विभागात बस्ता बांधण्याचा कार्यक्रम रंगे. बस्ता काखोटीला मारून दोन्हीही पार्ट्या मग एखाद्या बगीच्यात जाऊन बसत. हलवायाच्या दुकानातून लाडू आणले जात आणि त्यांची वाटणी बगीच्यातच सर्वांना व्हायची. कुणी गाववाला आला नसेल तर त्याचे लाडू घरी पोचवले जात. असा हा बस्ता.

माझ्या बस्त्याची आठवण होते, तेव्हा माझ्या अंगावर आजही सरसरून काटा फुटतो.बस्ता बांधण्यापूर्वीच वादाला तोंड फुटलं. माझ्या बाजूनं माझे काही सुशिक्षित मित्र होते. सदाशिव हा प्रमुख. त्याचं म्हणणं असं, की नवरामुलगा शिकलेला आहे, तेव्हा त्याला मुलीकडच्या मंडळींनी सूट घ्यायला हवा. गंमत म्हणजे मुलीकडच्या बाजूनं माझे मावसचुलतेच बोलत. त्यांनी आमची मागणी फेटाळून लावली. "आम्ही धोतर, कोट, पागोटं, जोडा असे जुन्या पद्धतीचे कपडे घेऊ" हा त्यांचा अट्टाहास. आमच्यावतीनं मुलीला भारी किंमतीचा शालू घेतलेला असतो "मुलीच्या कपडयांना जो खर्च आला त्याच्या निम्म्या किंमतीत मुलाचे कपडे करू" हा त्यांचा आग्रह. ही परंपरा चालत आलेली.भांडण शिगेला पेटतं. मीही मागं हटण्यास तयार नसतो. दुकानापुढं एकच कालवा वाढत चाललेला.आम्ही आकडेमोड करून दाखवत असतो की, 'तुम्ही जे कपडे घेणार आहात, तेवढयाच पैशात सूट बसणार आहे'. मुलीकडची मंडळी म्हणण्यापेक्षा माझेच चुलते ऐकायला तयार नसतात. आता पुढे काय होणार म्हणून काही सचिंत झालेले. तितक्यात बाबांचा रागाचा पारा वरवर सरकतो. ते कडाडतात. तोंडाला येतील त्या शिव्या बकू लागतात. माझ्या लक्षात येणार नाही एवढया चपळाईनं ते माझ्या

गालावर पाच बोटं उठवतात. क्षणभर काय होतंय हेच मला कळत नाही. मग मी बेफाम होतो. 'लग्न मोडलं असं' मी जाहीर करून टाकतो. केवळ मुलीचा बस्ता घेऊनच सारी त्या रात्री घरी परततात.

त्या रात्री मला नवल वाटलं ते माझ्या होणा-या सास-यांचं. त्यांनी भांडणात मुळीच भाग घेतला नाही. माझी बाजूही घेतली नाही. जे होतंय ते ब-यासाठीच होतंय असं तर त्यांना वाटत नसावं ना?रात्रभर झोप येऊ शकली नाही. सारखी कूस बदलत असतो. माझ्या स्वभावात गंमतीदार विरोधाभास आहे. त्याची प्रचीती पुढील दोनतीन दिवसांत आली. कावाखान्यात सन्नाटा पसरलेला. कुणी माझ्याशी बोलत नसतं. लग्न मोडलं असंच सारे गृहीत धरतात. आपला रागाचा पारा हळूहळू निवळत चाललेला.सईच्या आयुष्याचं पुढे काय? आपल्याशी तिचं लग्न जमलंय हे सा-या परगण्याला माहीत. मग उद्या तिच्याशी कोण लग्न करणार? नाही नाही ते विचार मनात धुमसत असतात. सई हातची चालली म्हणूनही मनात धाकधूक होत असते. तिच्या सौंदर्यानं म्हणजे ख-या अर्थानं झपाटलेला. नेमका कोणता विचार प्रबळ झाला, हे आज सांगता येणार नाही. पण मी खालच्या मानेने जाऊन होणा-या सास-यांची भेट घेतली. "मला हवा तो सौदा मंजूर आहे. तुम्हाला आवडतील ते कपडे घ्या. नाही घेतले तरी चालतील. मी आहे त्या कपडयांनीच बोहल्यावर उभा राहीन". बहुधा सास-याला आपल्या मुलीच्या सौंदर्याचा अभिमान असावा. पोरगं ताणून धरलं तर रस्त्यावर येईल, असंही बहुधा त्यांच्या अनुभवी नजरेला वाटत असावं. अर्थात हयावेळी सर्व मंडळींनी मिळून मला सूट घेतला. त्यांचं हे परिवर्तन कसं झालं, हे मला सांगता येणार नाही. लग्नात सुटात आपण कसे रुबाबदार दिसू, याचंच चित्र मनापुढं तरळत होतं. नाहीतरी आयुष्यात सूट वापरण्याचा पहिलाच प्रसंग होता. आनंद नसता झाला तरच नवल !

- 'बलुतं'

शब्दार्थ -

बस्ता	-	नवरानवरीचे कपडे - लग्नाच्या कपड्यांची खरेदी .
कोंडाळं	-	गोल, गटागटाने उभे रहाणे.
खिंडीत गाठणे	-	अडचणीत टाकणे. खिंड - दोन उंच पर्वतातला अरुंद मार्ग. खैबरखिंड, पावनखिंड.
अडून बसणे	-	आग्रह न सोडणे
तोंड फुटणे	-	सुरुवात होणे (वाद, भांडण, युद्धाला)
शिगेला पेटणे	-	चरमसीमेला जाणे. टोकाला जाणे. माप धान्यानी वर टोकापर्यंत भरतात त्याला शीग भरून असं म्हणतात सपाट - level आणि शीग.
कालवा	-	आरडाओरडा. आवाजांचा संमिश्र गोंधळ.
रागाचा पारा	-	रागाचं प्रमाण. पारा - Mericury पारा तपमान दाखवतो त्यावरून वाक्प्रचार
परगणा	-	प्रांत, विभाग.
धाकधूक	-	शंका, भीती
ताणून धरणे	-	तडजोड नाकारणे
सन्नाटा	-	शांतता.
तरळणे	-	मनापुढे - डोळ्यांपुढे दृश्य दिसणे
हमखास	-	निश्चित
चिक्कार	-	फार, पुण्कळ

सांस्कृतिक टिपा

१ बलुतं - खेडयामधे सुतार, चांभार, न्हावी, लोहार, महार यांना कामं वाटून दिलेली असतात. वर्षभर त्यांनी सर्वांची ती ती कामं करायची आणि शेतात पीक तयार झालं की सुगीच्या वेळी खळ्यावर जायचं. वर्षभराच्या कामाचा मोबदला म्हणून शेतकरी त्यांना धान्य देतात. त्याला बलुतं म्हणतात. खेडयातला सगळा अर्थव्यवहार या बारा बलुतेदारांच्या व्यवस्थेवर चालतो. लेखकानी आपल्या आत्मवृत्ताला 'बलुतं' म्हटलं आहे कारण यात वर्णन केलेले सर्व अनुभव या समाजानेच त्याच्या पदरात घातलेले आहेत.

२ बोहलं - विवाहवेदी. जिथे प्रत्यक्ष लग्नविधी होतो ती मांडवातली थोडी उंच जागा. इथे नवरानवरी, लग्न लावणारे भटजी वगैरे असतात. लग्नात पूजा, होम इ. बोहल्यावरच होतात. लग्न लागताना बोहोल्यावर नवरानवरी पाटावर उभी असतात. बोहोल्यावर चुन्याने रंगवलेली आणि हळदीकुंकवाचे पट्टे काढून सुशोभित केलेली मातीची भांडी (मंगल कलश) एकावर एक रचून मांडलेली असतात.तिथे गणपतीचं चित्र असतं.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ बस्ता बांधणे म्हणजे काय?

२ लाग्नाची ही खरेदी कशाप्रकारे चालत होती?

३ नव-याच्या पोशाखाबद्दल कोणते मतभेद होते?

४ लेखकाने लग्न मोडल्याचा त्याच्या सास-यावर काय परिणाम झाला? त्याची अनुभवी वृत्ती कशावरून समजते?

५ लेखकाच्या मनात विरोधाभास कसा झाला?

६ शेवटी लेखकाला सूट मिळाला का? त्या सुटामागे मान किती आणि अपमान किती?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ दोन्ही बाजू अशावेळी एकमेकांना खिंडीत गाठत.

२ बस्ता बांधला, म्हणजे दुकानदार मोठया दिलदार वृत्तीनी सर्वांना चहापाणी करी.

३ कुणी आला नसेल तर त्याचे लाडू घरी पोचवले जात.

४ बस्ता बांधण्यापूर्वीच वादाला तोंड फुटले.

५ आम्ही धोतर, कोट, पागोटं, जोडा - असे जुन्या पद्धतीचे कपडे घेऊ.

६ तितक्यात बाबांच्या रागाचा पारा वरवर सरकतो.

७ जे होतंय ते ब-याचसाठी होतंय असं तर त्यांना वाटत नसावं ना.

८ माझ्या स्वभावातच गंमतीदार विरोधाभास आहे.

९ सईच्या आयुष्याचं पुढे काय?

१० मी आहे त्या कपडयांनीच बोहल्यावर उभा राहीन.

११ पोरगं ताणून धरलं तर रस्त्यावर येईल.

१२ नाहीतरी आयुष्यात सूट वापरण्याचा पहिलाच प्रसंग होता.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

कोंडाळं करणे	पारख करणे
खिंडीत गाठणे	अडून बसणे
अंगावर काटा फुटणे	वादाला तोंड फुटणे
फेटाळून लावणे	शिगेला पेटणे
रागाचा पारा वर सरकणे	बाजू घेणे
कूस बदलणे	धाकधूक होणे
ताणून धरणे	रस्त्यावर येणे

प्रश्न २ मजेशीर - मजेदार या शब्दाचे वेगळे रूप. मजा या शब्दाला 'शीर' प्रत्यय लावून बनलेले विशेषण. याप्रमाणे हवेशीर, वक्तशीर, फायदेशीर, किफायतशीर, पद्धतशीर इ. शब्द बनतात. त्यांचा वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ३ लाडू आणले जात, पोचवले जात ही रचना पहा. लाडू आणत, पोचवत या रीतिभूतकाळाची ही कर्मणी रचना आहे. यात कर्त्याला 'कडून' प्रत्यय लागतो. पण साधारणपणे हा कर्ता अध्याहृत असतो. उदा - राजाच्या स्वागतासाठी गुढया उभारल्या जात. घरोघरी सडे घातले जात. इ. अशी दहा वाक्यं बनवा.

पूरक वाचन/लेखन

१) तुम्ही अभ्यासलेला 'तो मी नव्हेच' हा उतारा आणि 'बलुतं' यांची तुलना करा.

२) तुमच्या प्रांतात दलित साहित्य लिहिले गेले आहे का?

३) तुमच्या प्रांतातल्या अस्पृश्यांच्या जीवनाविषयी तुम्हाला काय माहिती आहे?

४) तुम्ही दया पवार यांची मुलाखत घेताहात अशी कल्पना करून ती मुलाखत थोडक्यात लिहा.

५) या उता-यावरून तुम्हाला महार समाजाच्या चालीरीतींबद्दल काय माहिती मिळाली?

धडा अकरावा

उपरा

ले. श्री. लक्ष्मण बापू माने
(जन्म १९४८)

परिचय

लक्ष्मण माने हे प्रसिद्ध दलित साहित्यिक आणि, सामाजिक कार्यकर्ते आहेत. कैकाडी ह्या भटक्या जमातीत त्यांचा जन्म झाला. गाढवावर सामान लादून या जमातीचे लोक गावोगाव भटकत असतात. पोट भरेल एवढा धंदा नाही म्हणून चो-या करतात. गुन्हेगार जमातींमधे त्यांचा समावेश होतो. ज्यांना नागर संस्कृतीचा स्पर्शही नाही असे हे गावाच्या वेशी - बाहेरचे भटके लोक. अशा जमातीतून शिकून सवरून मोठा झालेला लक्ष्मण माने हा पहिला कैकाडी.कळायला लागल्यापासून नोकरी मिळवून संसार मांडेपर्यंतचा लक्ष्मण माने यांचा प्रवास विलक्षण आहे. 'उपरा' या त्यांच्या आत्मकथनाला साहित्य अकादमी (१९८०) आणि फोर्ड फाउंडेशन या संस्थांनी गौरविले आहे. आपल्यासारख्याच अप्रगत जातींतल्या लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी ते प्रत्यक्ष समाजकार्यही करतात. अशा लोकांच्या वेदना 'बंद दरवाजा' मधून त्यांनी व्यक्त केल्या.

उपरा

एका दिशी बा घरी आला. साळंची येळ झाली व्हती. बानं हाताला धरलं. पाटी, पुस्तक, पेन्सल दिली.... साळंत घिऊन गेला. कुरकूर चालली होती पण शाळा कशाला म्हनत्यात माहीत हुतं.त्यात गावातली शाळा. मास्तरबी वळकीचा, गावातलाच.

आकुबा मास्तर सा-या गावाला माहीत. काही नवं वाटत नव्हतं. हातपाय बांदल्यावानी वाटायचं. पर सारी माझ्या वर्गातली पोरं माझ्या सिनंची, माझ्याहून लहानच. मीच टोनगा दिसायचो. माझ्या एवढातली पोरं तिसरी चौथीच्या वर्गात असल्याली..तवा बानं साळंत नाव घातलं. मास्तरनं इच्यारलं,

"वय काय?"

बा म्हनला,

"कुनास ठावं. असंल आठ - दहा वर्साचा. गांधीबाबा गेला, त्या सालचा",

"जन्म कुठं झाला?" मास्तरनं इचारलं.

बा म्हनला,

"आकुबा, आता कंचं गाव सांगू? कोकणात ह्याच्यावेळी ती बाळात झाली ते गाव आठवत न्हाय". .....मंग मास्तर म्हनला, "निरगुडीच लिवतो."

बा व्हय म्हनला.

"आता शांळत रोज आलं पायजे शाळा चुकवू नगं." मास्तर म्हनत हुता.

शाळा सुरू झाली. रोज शाळेत जायाचो. शाळा सुटली की हुंदडायचो. गावच्या गावंदरीलाच मळं हुतं. मळ्यात जायाचो. कुणाच्या पपया काड, कुणाची केळ मोड, आसं दिस मावळसतोवर चालायचं. मार खायाचारू......... शिव्या खायाच्या ...."कुत्र्याच्या जल्माला रया असती, पर तुझ्या जल्माला रया न्हाय" आई कावली की असंच कायकाय म्हनायची.

कोकणात जमंल तसं शाळंत जात व्हतो. बा मास्तंरच्या हातापाया पडायचा, मी चार दिस साळंत जायाचो. कोकणी भाषा न्यारी, समजायची न्हाय, बा कावायचा.

घरात कज्या नको म्हनून मी शाळंत जायाचो. तशी हिकडली मास्तरं न्हाइत. बा गाववाल्यांनला वळकायचा तसा ह्यो आपला मुलुक म्हणायचा. मास्तरला टोपली, कुडुक, कणगी, उपन्या तशाच द्याचा. मी शाळंत बसत व्हतो.

बगता बगत शिमगा जवळ आला. तसं बानं सुगी आवारली. बिराडं गाडवावर घातली आन् निरगुडी गाठली. आकुबा मास्तरनं बाजारकराच्या कडनं निरोप दिला व्हता, लक्षाची परीक्षा आलीया. बापूला सांगा - बानं निरूपाला झेललं हुतं.

गावची शाळा, पोरं, मास्तर सारी वळकीची. त्यानं बुजत न्हवतो आन् आता मास्तरचं भ्या मोडलं हुतं. महिना दीड महिना निरगुडीला शाळंत गेलो आन् एका दिशी आकुबा मास्तरनं पयलीची परीक्षा घीतली. मला लिव्हायला, वाचायला येत नव्हतं. एकदोन कसंतरी काढलं आसंल. आपुन काय पास व्हनार न्हाय आसं वाटत व्हतं. पर चैतीच्या जत्रंच्या आदीच बा चावडीवरनं घरी आला. मला उचलून घेतलं. बा आसं कधी वागायचा न्हाय. त्यानं मला काकंला उचलून घेतलं आन सरळ घरात देवाम्होरं निवून उतरावलं त्यानं हात जोडलं. गुलाल लावला. काय व्हतंय समजत न्हवतं. बा देवाम्होरं रडत व्हता. त्याच्या डोळ्यांनला धारा लागल्या व्हत्या. मला काय समजत न्हवतं पन बा रडतुया म्हून मीबी रडाय लागलू. आम्ही बापल्याक रडतुया बघून बारकी पोरं बी रडाय लागली. आई घरात न्हवती, न्हायतर तीबी रडली असती. बानं पोरांच्याकडे बघितलं. पोरं रडाय लागल्याती हे ध्येनात आल्यावरून त्यांच्यावर खेकसला,

"आरं कुनी मेलं व्हय, रांडंच्यांनो, रडताया ते?"

माझं रडनं थांबलं व्हतंच. बा म्हनला.

"आरं, माझा ह्यो वाग पास झाला पास!" म्हनत त्यानं पुन्हा मला काकंला घेतला. गालाचा मुका घेतला. आन् सारा दिस भेटंल त्याला सांगत सुटला 'माजा वाग पास झालाय'....पास! आरं वरीसभर म्हेनत घितलिया'.

आईनंतर मला दिवसभर नजरंम्होरं ठिवला व्हता. च्याआयला दिवाळीलाबी कुणी लाड करीत न्हवतं. सा-या दिसाचा मानकरी व्हतो. मनात गुदगुल्या होत व्हत्या. मलातर कायबी येत न्हवतं. पन मला वाटाय लागलं, आपुन आता मास्तर होनार. आपुन आभ्यास करायला व्हवा. म्हून सा-या भिती नुसत्या रेगोटयांनी भरवून टाकल्या व्हत्या.

- 'उपरा'

शब्दार्थ

कुरकूर	-	नाराजी
सिनंची	-	शरीराने बरोबरीची. प्रमाणभाषेत 'चणी' ची वापरतात.
हुंदडणे	-	मनमुराद हिंडणे.
टोनगा	-	आडदांड वाढलेला. टोणगा हा शब्द रेडयाला वापरतात.
गावंदरी	-	गावाजवळची नदीच्या उताराची जागा.
मळा	-	फळं - भाजीपाल्याचं शेत
रया	-	शोभा, मान, प्रतिष्ठा
कावणे	-	रागावणे
हातापाया पडणे	-	विनंती करणे
न्यारी	-	निराळी
कज्ञा	-	भांडण
मुलुक	-	प्रदेश

कुडूक	-	बांबूच्या पट्टयांपासून बनवलेली कोंबडया झाकायची टोपली.
कणगी	-	धान्य साठवण्यासाठी बांबूचे बनवलेले पिंप.
उपन्या	-	मळणीनंतर धान्य वा-यावर धरण्यासाठी केलेली सुपं.
शिमगा	-	होळी
बुजणे	-	घाबरणे
खेकासणे	-	रागाने, ओरडणे
काक	-	काख, कुक्षी
कडेवर	-	कमरेवर
नजरंम्होरं	-	नजरेसमोर.

सांस्कृतिक टिपा

१ उपरा - उपरा म्हणजे बाहेरचा, परका. घरातल्या माणसांमधे बोलताना घराबाहेरचा, नात्याचा नसलेला माणूस उपरा. गावाच्या संदर्भात त्या गावचा नसलेला तो उपरा. लेखक भटक्या जमातीतला आहे. ज्यांना कुठल्याही गावात स्थान नाही, ज्यांना आपले असे गाव, प्रदेश सांगता येत नाही; ज्यांची वस्तीच गावाबाहेर असते अशी ही जमात. गाव, शहर यांच्यातला कुठलाच समाज त्यांना आपला मानत नाही. असा समाजाला परका असलेला माणूस म्हणून लेखक स्वतःला उपरा म्हणवून घेतो.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ शाळेत जाताना लक्ष्याची मनः स्थिती कशी होती?

२ लक्ष्याचं नाव घालताना कोणत्या अडचणी आल्या? तो भटक्या जमातीचा आहे हे कशावरून स्पष्ट होते?

३ लेखकाची आई त्याच्यावर का रागवत असे?

४ मुलाच्या शिक्षणासाठी लेखकाच्या वडलांनी काय केले?

५ मुलगा पास झाल्यावर लेखकाच्या वडलांची काय प्रतिक्रिया झाली?

६ एक शिक्षक ह्या नात्याने हा उतारा वाचून तुम्हाला काय वाटते?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ पण शाळा कशाला म्हंत्यात ते माहीत हुतं.

२ मीच टोनगा दिसायचो.

३ गांधीबाबा गेला त्या सालचा.

४ कोकणात ह्याच्यावेळी ती बाळात झाली ते गाव आठवत न्हाय.

५ कुत्र्याच्या जत्माला रया असती, पर तुझ्या जत्माला रया न्हाय.

६ घरात कञ्या नको म्हणून मी शाळंत जायाचो.

७ आन् आता मास्तरचं भ्या मोडलं व्हतं.

८ त्याच्या डोळ्यांनला धारा लागल्या हुत्या.

९ आरं, माझा ह्यो वाग पास झालाय, पास.

१० सा-या दिसाचा मानकरी व्हतो.

११ पन मला वाटाय लागलं, आपुन आता मास्तर होनार.

भाषाभ्यास

प्रश्न १ खालील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

कुरकूर चालणे — हातापाया पडणे

हातपाय बांधल्यासारखं वाटणे — निरोप झेलणे

भीती मोडणे — डोळ्यांना धारा लागणे

नजरेसमोर ठेवणे | मानकरी असणे
मनात गुदगुल्या होणे | बघता बघता

प्रश्न २ खलील शब्दांना प्रमाण भाषेतले शब्द द्या.
दिशी, बा, साळंची, येळ, व्हती, पेनसल, म्हनत्यात, हुतं, मास्तरबी, वळकीची, बांदल्यावानी, सिनंची, असल्याली, इचारलं, तवा, म्हनला, कुनास ठावं, आसंल, कंचं, बाळात, न्हाय, मंग, लिवतो, व्हय, पायजे, नगं, हुता, हुतं, मावळस्तोवर, जल्माला, न्यारी, म्हनून, न्हाइत, ह्यो, बगता बगता, आन, आलीया, भ्या, व्हतं, पयलीची, लिव्हायला, आपून, व्हनार न्हाय, काकंला, देवाम्होरं, व्हतंय, डोळ्यांनला, रडतुया, रडाय लागलू, आल्याबरूबर, आरं, कुनी, वाग, वरीसभर, म्हेनत, कायबी, व्हवा, म्हून, रेगोट्यांनी, एवढांतली.

प्रश्न ३ अर्थ न बदलता वाक्यं बदलून लिहा.
१ आईनं तर मला दिवसभर नजरेम्होरं ठिवला व्हता. (नकारार्थी करा)
२ दिवाळीलाबी कुनी लाड करत नव्हतं (होकारार्थी)
३ मीच टोनगा दिसायचो. (टोनगाऐवजी 'बरोबरीचा' शब्द वापरा)
४ कुत्र्याच्या जल्माला रया असती, पर तुज्या जल्माला रया न्हाय. (कुत्र्याइतकी हा शब्द वापरा)
५ आन आता मास्तरचं भ्या मोडलं हुतं. (नकारार्थी)
६ आई घरात न्हवती, न्हायतर तीबी रडली असती. ('असती. तर' - वापरा.)
७ सारा दिस भेटंल त्याला सांगत सुटला. (जो तो वापरा)

पूरक वाचन/लेखन

१ 'उपरा' आणि 'बलुतं' ही पुस्तकं वाचा आणि त्यावर एक निबंध लिहा.

२ उपरा हा उतारा ग्रामीण भाषेत आहे. हा उतारा तुम्ही प्रमाण - भाषेत लिहा.

३ ज्याच्या घरात शिक्षणाचा गंधही नाही अशा तुमच्या एखाद्या विद्यार्थ्याची शिकण्याची तळमळ, त्याचे प्रयत्न याविषयी तुमचे अनुभव थोडक्यात लिहा.

धडा बारावा

सारे प्रवासी घडीचे

लेखक - श्री. जयवंत दळवी
(जन्म १९२५ - मृत्यू १९९५)

परिचय

जयवंत दळवी हे मराठीतले अग्रणी नाटककार आणि कादंबरीकार आहेत. कथा, प्रवासवर्णन, विनोदी लेखनातही त्यांनी यश मिळवले आहे. 'ठणठणपाळ' या टोपणनावाने त्यांनी केलेले साहित्यक्षेत्रावरील विनोदी लेखन अतिशय लोकप्रिय झाले आहे. त्यांचा विनोद तर्जेदार, निरोगी आणि विचार करायला लावणारा असतो. त्यांच्या सर्वच लेखनामागची प्रेरणा आहे मानवी मनाचा शोध. मनुष्यस्वभावातल्या गुंतागुंतीचे अतिशय सूक्ष्मपणे केलेले चित्रण हा त्यांच्या नाटकांचा आणि कादंब-यांचा विशेष आहे. 'बॅरिस्टर', 'महासागर', 'संध्याछाया', 'दुर्गी', 'सूर्यास्त', 'पुरुष' इ. त्यांच्या गाजलेल्या नाटकांमधून याचा प्रत्यय योतो सामाजिक समस्या, राजकीय भ्रष्टाचार यांचे भेदक चित्र त्यांनी काही नाटकांमधून मांडले. 'सारे प्रवासी घडीचे' हे त्यांचे विनोदी पुस्तक कोकणातल्या त्यांच्या गावातले बालपणीचे चित्र रंगवते. त्यातली सर्वच व्यक्तिचित्रे अतिशय जिवंत आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

सारे प्रवासी घडीचे

माझ्या सबंध जीवनात नरूइतका जिवाभावाचा दुसरा मित्र मला कोणी नव्हता. या घटकेलाही मला शाळेची आठवण आली की प्रथम नरूची आठवण येते. नरूचे चित्र डोळ्यापुढे उभे रहाते.

नरू कुळवाडयाच्या कुळात जन्माला आला होता, तरी तो बामणाच्या पोरासारखा दिसायचा.गोरागोमटा, तरतरीत लांब नाक. निमुळता आणि हसतमुख चेहरा. आपल्या पांढ-या टोपीखालून आपली शेंडी नेहमी बाहेर लोंबत ठेवायचा. आम्ही अनेकदा चेष्टेने त्याची शेंडी ओढत असू. पण तो कधी हटला नाही. "शेंडी आसा तर ती लोकांक दिसुक नुको?" असे तो विचारायचा. तेही त्याचे खरेच होते. शेंडी आहेच तर ती लोकांना दिसायला नको?

अगदी प्रथमपासून नरू आणि मी वर्गात शेजारी शेजारी बसत असू. आम्ही अधून मधून बोलत असू. म्हणून पावटे मास्तरांनी आमच्या जागा बदलून टाकल्या होत्या. पण पावटे मास्तर जाताच आम्ही आमचे गोणपाट पुन्हा एकमेकांस जोडले. आम्ही दोघेही पुन्हा पुन्हा नापास होत असू म्हणूनही असेल कदाचित, पण आमची दोघांची मैत्री दीर्घकाळ टिकून राहिली होती. सुरुवातीपासून अखेरपर्यंत ती टिकून राहिली. अनेकदा माझ्याच गोणपाटावर चक्क आपले नाव घालून तो माझा गोणपाट आपल्या मालकीचा करून टाकत असे. आणि मी तक्रार केली की, भात जास्त जेव, म्हणजे तांदूळ संपतील आणि गोणपाट रिकामा होईल, असा तो मला सल्ला देत असे.

अभ्यासात आमची दोघांची तुलना केली तर नरूच्या मानाने मी थोडा अधिक हुशार होतो. त्यामुळे परीक्षेच्या वेळी बगळ्यासारखी मान उंच करून माझ्या खांद्यावरून जे काही माझ्या पाटीवर दिसेल ते आपल्या पाटीवर उतरून तो वेळ मारून नेत असे. निकाल लागला की आम्ही दोघेही नापास होत असू आणि मग "तुझा बगून काढला म्हणून मी नापास झालंय" असे म्हणत आपल्या अपयशाचे खापर तो माझ्या डोक्यावर फोडीति असे आणि तरीही आमची गाढ मैत्री अखेरपर्यंत अबाधित राहिली आहे.

अभ्यासात फारसे लक्ष त्याने घातले नाही. खरे म्हणजे तो चौकस बुध्दीचा होता. पण त्याच्या चौकस बुध्दीला वळण देणारा कुणी भेटला नाही. ही कुळवाडयाची पोरे शिकून शिकणार काय? चार बुके शिकतील आणि शाळा सोडून घरी बसतील, असेच मास्तर गृहीत धरीत असत. आणि अनेकदा तसे होत असे. नरूनेही पुढे तसेच केले.

अभ्यासात त्याने कधी लक्ष घातलेच तर त्याचे शंकेखोर मन सर्वांच्या पुढे धावत असे. एकदा 'शिवाजी महाराजांचे बालपण' या विषयावर दहा ओळी लिहिण्याचे काम आमच्या नशिबी आले.शिवाजी महाराज घोडयावर कसे बसत असत, तरवार कसे चालवीत असत, मावळ्यांना शस्त्रे चालवण्याचे शिक्षण कसे देत असत आणि किल्ले कसे बांधीत असत याची चित्रे आम्ही डोळ्यासमोर घोळविली. वयाने आमच्याएवढा लहान, पण भरगच्च दाढीमिशी असलेला आणि रत्नखचित टोप मस्तकी घातलेला बालशिवाजी आमच्या नजरेसमोर आला. त्याच्या बहादुरीचे वर्णन दहा ओळीति पूर्ण करण्यासाठी मी पाटीवर पेन्सील टेकविली मात्र - आणि दबलेल्या आवाजात नरू माझ्या कानात पुटपुटला "शिवाजी बालपणातच म्हाराज कसो झालो?"

त्याच्या शंकेने मला हसू आले. पण हसण्यात वेळ दवडणे शक्य नव्हते. म्हणून मावळे, ढाल-तलवारी, किल्ले, घोडे या सर्वांना मी दिमतीला धरले. पण नरूचा निबंध मात्र थेट वेगळा झाला.- 'शिवाजी लहानपणी भयंकर खोडकर होता. तो गुरे घेऊन डोंगरावर जात असे. काजूच्या झाडावरचे बोंडू तोडून खात असे. दुस-याच्या झाडावर दगड मारून कै-या पाडीत असे. उन्हातान्हात भटकल्यामुळे रात्री खूप, खोकत असे आणि मग आई त्याला शिव्या घालत असे'.... अशाप्रकारे आपलेच बालपण लिहिल्यासारखे तो शिवाजीचे बालपण लिहून मोकळा झाला. आणि त्याबद्दल त्याने अमृते मास्तरांकडून सपाटून मारही खाल्ला. "भामटा शिवाजी महाराजांबद्दल अनादराने लिहितो," असे म्हणून अमृते मास्तरांनी त्याचे डोके दगडावर दगड आपटावा तसे भिंतीवर आपटले होते. आणि भिंतीला पाठ टेकून उभे र्‍हाण्याची खुर्चीची सजा दिली होती.

"हिंदुपदपादशाहीचे शिवाजी महाराजांनी संरक्षण केले याचे तुला काहीच कसे नाही?" असेही त्यांनी नरूला विचारले होते.

पण त्याबद्दल नरूला कधीच पश्चात्ताप झाला नव्हता. आपण जे लिहिले त्यापेक्षा बालपणात निराळे असे शिवाजीने काही केले असेल असे त्याला कधीच वाटले नाही. आता मी हा विचार करतो, तेव्हा मलाही त्याचे म्हणणे पटू लागते. शिवाजी दहा

वर्षांचा असताना त्याने खरोखरच दुसरे काय केले असेल? - पण सत्य लिहून नेरूने तेवढा मार खाल्ला.

- 'सारे प्रवासी घडीचे'

शब्दार्थ -

जिव्हाभावाचा	-	अतिशय जवळचा, प्रिय
घटका	-	वेळ
तरतरीत	-	धारदार
चक्क	-	उघडपणे
कुळवाडी	-	कोकणातली एक श्रमिक जात. शेती, मोलमजुरी करून ते आपलं पोट भरतात.
गोणपाट	-	रिकामं पोतं.
च्या मानाने	-	च्या तुलनेत
वेळ मारून नेणे	-	त्या त्या वेळेची गरज कशीतरी भागवणे
खापर फोडणे	-	दोष देणे
अबाधित	-	अखंड, हानी न होता
शंकेखोर	-	शंका काढणारे
नशिबी येणे	-	नाइलाजाने करावे लागणे.
मावळे	-	शिवाजीचे डोंगरी मित्र - नंतर सैनिक
वेळ दवडणे	-	वेळ फुकट घालवणे
दिमतीला धरणे	-	मदत घेणे, कामाला लावणे

बोंडू	-	काजूच्याय बीवरचे पिवळे, केशरी गोड फळ.
मोकळा होणे	-	करून संपवणे
सपाटून	-	भरपूर
खुर्चीची सजा	-	आधाराशिवाय, खुर्चीत बसल्याप्रमाणे ताठ पाठ ठेवून बसणे ही शिक्षा.
हिंदुपदपादशाही	-	हिंदूंचे साम्राज्य

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ नरूचे थोडक्यात वर्णन करा

२ नरूच्या स्वभावातल्या गंमती कोणत्या बाबतीत दिसून येतात?

३ नरूला चौकस बुद्धीचा फायदा झाला का?

४ 'शिवाजी महाराजांचे बालपण' या विषयावर इतर मुलांच्या कल्पना काय होत्या?

५ नरूने शिवाजी महाराजांच्या बाळपणाविषयी काय लिहिले?

६ नरूच्या निबंधावर शिक्षकांची प्रतिक्रिया काय झाली?

७ चूक शिक्षकांची होती की नरूची ? लेखकाला काय वाटते?

८ शिक्षणपद्धतीतल्या कोणत्या दोषावर या उता-यात प्रकाश टाकला आहे?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ शेंडी आसा तर मग ती लोकांक दिसुक नुको?

२ भात जास्त खा म्हणजे तांदूळ संपतील आणि गोणपाट रिकामा होईल.

३ तुझा बगून काढला म्हणून मी नापास झालंय.

४ ही कुळवाडयाची पोरे शिकून शिकणार काय?

५ शिवाजी बालपणातच म्हाराज कसो झालो?

६ भामटा, शिवाजी महाराजांबद्धल अनादराने लिहितो.

७ हिंदुपदपादशाहीचे शिवाजी महाराजांनी संरक्षण केले याचे तुला काहीच कसे नाही?

८ पण सत्य लिहून नरूने तेवढा मार खाल्ला.

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

जिवाभावाचा	वेळ मारून नेणे	सल्ला देणे
खापर फोडणे	तकार करणे	अबाधित रहाणे
च्या मानाने	लक्ष घालणे	गृहीत धरणे
नशिबी येणे	वेळ दवडणे	दिमतीला धरणे

प्रश्न २ कंसातल्या सूचनेप्रमाणे बदल करून लिहा.

१ नरूइतका जिवाभावाचा मित्र मला दुसरा कोणी नव्हता.
(अर्थ न बदलता होकारार्थी)

२ नरू कुळवाडयाच्या घरात जन्माला आला होता तरी बामणाच्या पोरासारखा दिसायचा.
(अधोरेखित शब्दांच्या जागी एक शब्द वापरा)

३ नरूच्या मानाने मी थोडा अधिक हुषार होतो.
(अर्थ न बदलता नकारार्थी)

४ अभ्यासात फारसे लक्ष त्याने घातले नाही.
(दुर्लक्ष शब्द वापरा)

५ शिवाजी दहा वर्षांचा असताना त्याने खरोखरच दुसरे काय केले असेल? (प्रश्न काढा)

प्रश्न ३ पुढील वाक्ये प्रमाण मराठीत लिहा.

१ शेंडी आसा तर ती लोकांक दिसुक नुको?

२ तुझा बगून काढला म्हणून मी नापास झलंय.

३ शिवाजी बालपणातच म्हाराज कसो झालो?

प्रश्न ४ 'म्हणूनही असेल कदाचित....' ही रचना पहा. हेच वाक्य असेही लिहिता येईल -

१ कदाचित आम्ही दोघेही पुन्हा पुन्हा नापास होत असू. म्हणूनही आमची मैत्री दीर्घकाळ टिकून राहिली असेल.

२ आम्ही दोघेही ———— असू म्हणूनच आमची मैत्री ———— टिकून राहिली असणे शक्य आहे.

प्रश्न ५ अभ्यासात त्याने कधी लक्ष घातलेच तर .... या रचनेत एक नकार गृहीत धरला आहे. नरू अभ्यासात लक्षत घालत नसे. घातलेच तर त्याचे मन सर्वांच्या पुढे धावत असे पुढील वाक्यांची अशी दोन वाक्यं बनवा.

१ तो कधी बाजारात गेलाच तर नेमका पिशवी विसरेल.

२ तिनी कधी स्वैपाक केलाच तर तो वेळेवर होणार नाही .

३ त्या कधी कोणाशी बोलल्याच तर हमखास टोचून बोलतील.

४ मी कधी दिल्लीला आलेच तर तुला भेटल्याशिवाय रहाणार नाही.

५ ते कधी गावाला गेलेच तर मुक्काम कुठेही करणार नाहीत.

प्रश्न ६ हिंदुपदपादशाहीचे शिवाजी महाराजांनी संरक्षण केले याचे तुला काहीच कसे नाही? याचा अर्थ याबद्दल तुला कृतज्ञता किंवा आदर

कसा वाटत नाही? तुला अशी जाणीव असायला हवी पण ती नाही कशी? उदा:-

१ आई इतके कष्ट करते याचं तुला काहीच कसं नाही?

२ तुमच्यासाठी त्यांनी एवढा त्याग केला याचं तुम्हाला काहीच कसं नाही?

३ त्यांनी पाहुण्यांचा एवढा आदर सत्कार केला याचं त्यांना काहीच कसं नाही?
कोणत्या प्रसंगी ही रचना वापरतात ते समजून घेऊन अशी पाच वाक्ये बनवा.

प्रश्न ७ शंकेखोर - शंका काढणारा 'शंका' नामापासून विशेषण.

याप्रमाणे चहाडखोर, दरोडेखोर, चेष्टेखोर, दिवाळखोर, घुसखोर, चुगलखोर, हल्लेखोर या शब्दांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. तसेच खोडकर म्हणजे खोडया करणारा याप्रमाणे खेळकर, हितकर, पथ्यकर, रुचकर, सोयिस्कर या शब्दांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ८ 'सपाटून' हे क्रियाविशेषण विशिष्ट ठिकाणीच वापरतात. भूक लागणे, जेवणे, काम करणे, दमणे, मार देणे/खाणे, पराभव होणे, ताप येणे इ. क्रियापदांबरोवर त्याचा उपयोग केला जातो. भरपूर या अर्थाने त्याचा सर्वत्र वापर करू नये. उदाः तिनी सपाटून कपडे धुतले - असं म्हणत नाहीत.

पूरक वाचन/ लेखन

१ 'सारे प्रवासी घडीचे' आणि 'श्यामची आई' ही पुस्तके वाचा. दोन्हीत कोकणातल्या शालेय जीवनाचे वर्णन आहे. तुम्ही त्यावर एक टिपण लिहा.

२ प्रश्नांच्या उत्तरांबद्दल, विशेषतः निबंधाबद्दल शिक्षकांच्याच ठोकळेबाज अपेक्षा असतात. तुमचा याबद्दलचा अनुभव थोडक्यात लिहा.

३ स्वतंत्र बुद्धीचा, चौकस असा तुमचा एखादा विद्यार्थी असल्यास त्याची माहिती द्या.

धडा तेरावा
वेठीच्या आसाचा फेरा

लेखिका - श्रीमती गोदावरी परुळेकर
(जन्म १९०८ - मृत्यू १९९)

परिचय

श्रीमती गोदावरी शामराव परुळेकर या प्रसिद्ध कम्युनिस्ट कार्यकर्त्या. आपले पती कॉ. शामराव परुळेकर यांच्यासह त्यांनी समाजकार्याला सुरुवात केली. ठाणे जिल्ह्यातल्या वारली या आदिवासी जमातीत त्यांनी पुष्कळ वर्षे कार्य केले. जमीनदारांनी वेठाबिगारीने या आदिवासींची भयंकर पिळवणूक चालवली होती. अशा आदिवासींमधे माणूस म्हणून जगण्याचा आपल्याला अधिकार आहे' ही भावना त्यांनी रुजवली आणि त्यांना अन्यायाविरुद्ध प्रतिकाराला उभे केले. या कार्यातले अनुभव गोदावरीबाईंनी 'जेव्हा माणूस जागा होतो' या आत्मकथनातून व्यक्त केले. हे कार्य करत असताना गोदावरीबाई प्रस्थापितांविरुद्ध निर्भयपणे उभ्या होत्या आणि आदिवासींमधे आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी न कंटाळता प्रयत्न करत होत्या. एका अर्थाने त्यांना या दोन आघाडयांवर संघर्ष करावा लागला. त्यांच्या या आत्मकथनाला साहित्य अकादमीचा पुरस्कार (१९७२) मिळाला आहे. या पुस्तकामुळेच आदिवासींच्या भयंकर जीवनाची लोकांना कल्पना आली.

वेठीच्या आसाचा फेरा

बार्डीत जमीनमालकाचे आवार होते. शेतकरी कुळांपैकी काहींनी जाऊन रोज वेठीने काम करुन दिले पाहिजे, असा जमीन मालकाचा दंडक होता. प्रत्येकाची हजेरी बरोबर लक्षात यावी यासाठी एक लोखंडी गज शेतक-यांच्याकडे दिला होता. त्याला

शेतकरी 'वेठीचा आस' म्हणत. ज्याच्या घरी तो आस असेल तेथील सा-या माणसांनी आवारात जाऊन हुकूम होईल ते काम वेठीने खपून करून द्यायचे असे. काम संपवून घरी परत आल्यावर रात्री तो आस दुस-या शेतक-याकडे द्यायचा असे. आस घरी आला की तेथील माणसांनी दुस-या दिवशी सकाळपासून संध्याकाळपर्यंत वेठीने काम करायचे. अशा तेहेने तो 'आस', बारा महिने एकीकडून दुसरीकडे फिरत राही.

पिढयानपिढया हे वारली अशा त-हेने वेठीने काम करत आले होते. आज आस आपल्याकडे येणार, उद्या आपली पाळी येणार, हे त्यांना सवयीने माहीत असे. हंगामामधे सा-यांनाच शेतावर जाऊन शेतीची व इतर कामे विनामूल्य करावी लागत असत.

मी बार्डीला ज्या शेतकत्थाच्या घरात मुक्काम केला होता त्याच्या घरी वेठीचा आस पोचला होता. घरातल्या सा-यांना वेठीला जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. मी पोचले त्यावेळी बरीच संध्याकाळ झाली होती. जवळपास बाईमाणूस दिसेना. मी विचारले", काय रे, घरात बाईमाणूस नाही काय? तुझी म्हातारी (बायको) कुठे आहे?" बापलेकांनी अर्थपूर्ण नजरेने एकमेकांकडे पाहिले. काहीतरी भानगड आहे एवढे मी ताडले, पण काय ते नीट समजेना. मी घरात गेले तो एका कोप-यात एक बाई तापाने कण्हत पडलेली होती. मला पाहून ती उठण्याचा प्रयत्न करू लागली. "तुला बरं नाही, तू स्वस्थ पड" असे सांगून मी बाहेर येणार तो ती बाई रडू लागली. वेठीच्या आसाने हुकूम दिल्यामुळे कुटुंबातील सा-यांनी कामावर जायला पाहिजे होते. बाईला ताप होता म्हणून ती कामावर गेली नाही. बाई कामावर गेली नाही हे कळल्याबरोबर जमीनमालक खवळले. मुकादमाला बाईच्या खोपटात पाठवले. मुकादम शिव्या देत घरात शिरले. बाईला दोन शिव्या हासडून तिच्या पाठीत दोन बुक्के मारून, आरडा ओरड करीत तिला घराच्या बाहेर खेचली. मुकादमाची व बाईची झटापट झाली.मुकादम त्या खोपटात माळ्यावर चढले. तिथे जे थोडे भात वगैरे होते ते काढून फिसकटून टाकले.बाई एकीकडे रडत आरडत गयावया करीत असतानाच तिला ओढीत-ताणीत आवारात नेली. तिथे शेटने "ढोंग करते. काम करावयास नको. मोफत खायला पाहिजे" म्हणून शिव्या घातल्या मारून मुटकून कामाला लावली. बाईच्या अंगात ताप होता. ती घेरी येऊन

पडली तेव्हा तिच्या नव-याला तिला घरी नेण्यास सांगितले. तिला घरी सोडून तो परत गेला. नाहीतर मार खावा लागला असता. अशा परिस्थितीतच मी तेथे पोचले म्हणून मला पाहिल्याबरोबर त्या बाईला उमाळा आला व रडू कोसळले. गावातले लोक चिडले होते. आपापसात कुजबुजले होते. परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नव्हता. त्यामुळे सारे समजून उमजून पेटल्या अंतःकरणाने पुन्हा खाली मान घालून काम करीत होते.

झाडांवर आंबे दिसायला लागले की फळांवर देखरेख करण्यासाठी जमीनमालक रखवालदार ठेवीत असत. आपला डोळा चुकवून दगड मारून पाडलेले आंबे कोणाला नेता येऊ नयेत, म्हणून आंब्याभोवती काट्यांचा ढीग पसरीत. रुपजीला कैरी खायची इच्छा आवरेना. आजूबाजूला कोणी नाही अशा समजुतीने पाडाला आलेला एक आंबा पाडून तो खाऊ लागला. रखवालदार एकदम पुढे आला. रुपजीला गुद्दा मारून, त्याच्या बखोटीला धरून शेटसमोर नेला. पुरावा म्हणून तो आंबाही शेटपुढे ठेवला. शेटने रूपजीला आंबाडीच्या वाखाचा दोर वळायला सांगितले. नंतर शेट व रखवालदार रूपजीला घेऊन ज्या आंब्याच्या झाडाचा आंबा त्याने पाडला होता तेथे गेले व त्या दोराने त्याला झाडाला बांधून पाठ फुटेपर्यंत पाठीवर सपासप फटके मारले. मार खाताना तो गुरासारखा ओरडत होता पण मदतीला जायची कोणाची हिंमत नव्हती. शेटचे मन निर्ढावलेले. त्याच्यावर रडण्याभाकण्याचा काही परिणाम झाला नाही. त्या काळात बहुतेक जमीनदार - सावकारांच्या ओटयांवर चाबूक असत.

वारल्यांनी जरा हूं की चूं केले की ते त्यांना चाबकाचा प्रसाद देत. ओटयावर अडकवून ठेवलेले चाबूक म्हणजे वारल्यांना त्यांच्या गुलामगिरीचा तेवता इषारा होता. वारली सांगत 'सावकार कुटी', तो शब्द यथार्थ होता म्हणचे सावकारांचा मार म्हणचे कुटणेच होते. सकारण अकारण वारल्यांची मारकूट करणे, त्यांना कोंडून मारणे हे सावकारांच्या इतके अंगवळणी पडले होते की घराचे अंगण, सोपा साफ करून घेणे हे जसे नित्याचे आवश्यक काम समजले जाई, तसेच वारल्यांना चाबकाचे फटके मारणे, शिव्या देणे, हे नित्याचे आवश्यक काम समजले जाई. माणसांनी माणसाची नित्य मारकूट

करण्यात असंस्कृतपणा आहे, मारणा-याचा अधः पात आहे, याची अस्पष्ट जाणीवसुद्धा जमीनमालकांना नव्हती. "साल्यांना मारलंच पाहिजे" असे म्हणून आपल्या रुबाबाचे ते एक लक्षण समजत असत. या मारकुटीपेक्षाही इतर जालीम अनन्वित छळ करण्याच्या क्लृप्त्या जमीनदार वर्गाने आपल्या सुपीक डोक्यातून काढल्या होत्या.

एका शेतक-याच्या शेतीची हद्द मालकाला बदलून हवी होती. कुळाची जमीन काढून घेऊन मालकाची जमीन वाढवून हवी होती. शेतकरी कबूल होईना. मालकाने त्याला आवारात बोलवले.

त्याची शेंडी त्याच्या पायाच्या आंगठयाला बांधली. (त्याकाळात बहुतेक वारली शेंडया ठेवीत असत) तो वाकल्यावर त्याच्या पाठीवर फटके मारले. शेंडी बांधून मारहाण सुरू झाली की आदिवासी जीव मुठीत धरून शरण येत. मालक सांगेल ते कबूल करून सुटकेची याचना करीत. हा शेतकरी कबूल झाला, तेव्हा "कसा सीधा आला! पुन्हा असं काही करशील तर जीवच घेईन!" असे बजावून त्या आदिवासीला सोडून दिले.

एका आदिवासीने कामाला जायचे नाकारल्यामुळे त्याला झाडाला उलटा टांगून खाली मिरच्या पेटवून मिरच्यांची धुरी दिली. नाकातोंडात धूर जाऊन तो गुदमरून गेला. एकीकडे मिरच्यांची धुरी पेटवून दुसरीकडे त्याच्या पाठीवर फटके मारण्यास सुरुवात केली. असहय वेदनांमुळे तो गयावया करू लागला तेव्हा त्याला सोडून दिले.

- 'जेव्हा माणूस जागा होतो'

शब्दार्थ

वेठ	वेठबिगार - पगार किंवा रजेसारखी कसलीही सवलत न देता दिवसभर काम करवून घेणे (बिन पगारी मजुरी)

		यावरूनच वेठीला धरणे म्हणजे जबरदस्तीने काम करून घेणे हा वाक्‌प्रचार आला आहे.
कूळ	-	जमीनदाराच्या शेतात काम करणारे शेतकरी. शेत पिकवून देण्याच्या मोबदल्यात त्यांना धान्याचा वाटा मिळतो.
दंडक	-	नियम
गत्यंतर नसणे	-	दुसरा उपाय/ मार्ग नाही असे.
आसख	-	गज.
ताडणे	-	अंदाज करंणे, ओळखणे.
कण्हत	-	वेदना सहन न झाल्यामुळे तोंडातून आपोआप बारीक आवाज येत रहातो त्याला कण्हणे म्हणतात.
मारूनमुटकून	-	जबरदस्तीने
घेरी	-	चक्कर, बेशुद्धावस्था
उमाळा	-	भावना आवरता न येणे
पाडाला आलेला	-	झाडावर पिकलेला
अंबाडीचा वाख	-	एकप्रकारची वनस्पती. ती पाण्यात भिजवून, कुटून, धाग्यांचा दोर बनवतात
हूं की चूं न करणे	-	विरोधासाठी तोंडातून जराही आवाज न करणे.
तेवता	-	पेटता, जागता.
अंगवळणी पडणे	-	सवय होणे
मिरच्यांची धुरी	-	आगीत मिरच्या टाकून त्याचा धूर नाकातोंडात जाईल असे करणे.
गयावया करणे	-	आर्जव, विनंती, याचना करणे.

सांस्कृतिक टिपा

१ वेठाबिगार - बिगार म्हणजे मजूर. वेठबिगार म्हणजे कामाबद्दल पगार न घेता पिढया न पिढया काम करवून घेण्याची पद्धत. यात रजा वगैरे सवलती नसतात. कुणाला ते काम चुकवता येत नाही.किती श्रमाचे काम करायचे यालाही बंधन नाही. कधीकाळी घेतलेल्या कर्जाची फेड म्हणून बापानंतर मुलगाही वेठीने काम करतो. वेठबिगार आता कायद्याने बंद केली आहे.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ 'वेठीच्या आसाचा फेरा'म्हणजे काय?

२ बार्डीला शेतक-याच्या घरात लेखिकेला काय आढळले?

३ बाई कामावर गेली नाही म्हणून सावकाराने काय केले?

४ बाईला मार खावा लागला याचा इतरांवर काय परिणाम झाला?

५ रूपजीला कोणती शिक्षा झाली? का?

६ सावकार कुटी म्हणजे काय?

७ शेतक-याने जमीन द्यावी म्हणून सावकाराने काय केले होते?

८ कामावर न गेलेल्या आदिवासीला सावकाराने कोणती शिक्षा दिली?

९ सावकार आदिवासींना कसे छळत असत?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ त्याला शेतकरी 'वेठीचा आस' म्हणत.

२ तुझी 'म्हातारी' कुठे आहे?

३ ढोंग करते. काम करायला नको. मोफत खायला पाहिजे.

४ मार खाताना तो गुरासारखा ओरडत होता, पण मदतीला जायची कोणाची हिंमत नव्हती.

५ ओटयावर अडकवून ठेवलेले चाबूक म्हणचे वारल्यांना त्यांच्या गुलामगिरीचा तेवता इशारा होता.

६ वारली सांगत 'सावकार कुटी' तो शब्द यथार्थ होता.

७ माणसांनी माणसाची नित्य मारकूट करण्यात असंस्कृतपणा आहे, मारणा-याचा अधःपात आहे याची अस्पष्ट जाणीवसुद्धा जमीन मालकांना नव्हती.

८ "कसा सीधा आला. पुन्हा असं करशील तर जीवच घेईन!"

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

दंडक असणे,	उमाळा येणे,	गत्यंतर नसणे,
पेटत्या अंतःकरणाने,	शिव्या हासडणे,	डोळा चुकवून,
झटापट होणे,	हूं की चूं न करणे,	गयावया करणे,
अंगवळणी पडणे,	ढोंग करणे,	कबूल होणे,
मारून मुटकून,	जीव मुठीत धरून शरण येणे,	धुरी देणे.

प्रश्न २ हुकूम होईल ते काम वेठीने खपून करून द्यायचे असे. रात्री तो आस दुस-या शेतक-याकडे द्यायचा असे. ही वाक्यरचना लक्षात घ्या. हा नुसता रीति भूतकाळ, नाही. त्यात एखादा नियम, रूढी, पद्धत सांगण्यासाठी 'असे' च्या पूर्वी धातु+आयचा रूप आले आहे.

उदा:-

खेडयात शिक्षकानेच पोस्टमास्तरचे काम करायचे असे. लग्नाच्या पंगतीत

पुरुषांनी वाढायचे असे. रामोश्यांनी पिकाचं रक्षण करायचं असेः हीच वाक्यं ———— शेतक-यांना हुकूम होईल ———— करावं लागे, 'आस ———— द्यावा लागे' अशीही लिहिता येतात. हंगामामधे सा-यांनाच शेतीची व इतर कामे विनामूल्य करावी लागत (हे वाक्य धातु+आयचा अस वापरून लिहा.)

प्रश्न ३ घरातल्या सा-यांना वेठीला जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. गत्यंतर शब्द वापरताना जोडावे लागणारे प्रत्यय अधोरेखित शब्दांवरून लक्षात घ्या

उदा:-

१ सुनंदाच्या वडलांना हुंडा देण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

२ रमेशला पैशांसाठी दुस-यापुढे हात पसरण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अशी ५ वाक्यं लिहा.

प्रश्न ४ वेठीच्या आसाने हुकूम दिल्यामुळे कुटुंबातील सा-यांनी कामावर जायला पाहिजे होते.. ही वाक्यरचना पहा.

१ तू चांगला अभ्यास करायला पाहिजे होतास.

२ आपण आधीच तिकिटं काढायला पाहिजे होती.

३ तुम्ही त्याला रागवायला नको होते. अशी होकारार्थी आणि नकारार्थी दोन दोन वाक्ये लिहा.

प्रश्न ५ शिव्या या नामाला दिल्या, घातल्या, हासडल्या अशी निरनिराळी क्रियापदे तीव्रतेप्रमाणे लागतात. या उता-यात ती तीन्ही आली आहेत.

प्रश्न ६ पिढयान पिढया हे वारली ———— काम करत आले होते या वाक्यातली 'करत आले होते' ही रचना लक्षात घ्या. पुष्कळ वर्षं, पिढया एखादी गोष्ट चालते तेव्हा या त-हेची वाक्यरचना करतात.

१ पेशवे दरवर्षी ब्राहमणांना दक्षणा देत आले होते.
२ शिंदे आणि होळकर हे सरदार आपसात भांडत आले होते.
३ प्रत्येक दस-याला राजाच आपल्या शस्त्रांची पूजा करत आला आहे.
४ शेतकरी मृगनक्षत्राआधी शेत नांगरत आले आहेत. अशी तुम्ही पाच वाक्यं तयार करा.

पूरक लेखन वाचन

१ 'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक वाचा.
२ तुमच्या प्रांतातल्या वेठबिगारीची माहिती द्या.
३ वेठबिगारी नष्ट करण्यासाठी तुमच्या प्रांतात ज्यांनी संघर्ष केला त्यांची माहिती द्या.

धडा चौदावा

पंढरीचा विठोबा

लेखिका - श्रीमती दुर्गा भागवत
(जन्म १९१०)

परिचय

श्रीमती दुर्गा भागवत या मराठीतल्या विद्वान संशोधक, सामाजिक कार्यकर्त्या आणि विचारवंत लेखिका आहेत. त्यांनी बौद्धवाङ्मय, लोकसाहित्य यांचा सखोल अभ्यास केला आहे. महाभारतावर 'व्यासपर्व' हे वेगळ्या संवेदनशील दृष्टीतून त्यांनी लिहिलेले पुस्तक. अभ्यासपूर्ण लेखनाबरोबरच सूक्ष्म संवेदनशील ललित निबंधही त्यांनी लिहिले. 'ऋतुचक्र', 'भावमुद्रा' 'पैस' इ. संग्रहांतून व्यक्त होणा-या त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचा ठसा आपल्या मनावर उमटतो. त्यांच्या लेखनात कवितेची तरलता आणि शोधनिबंधांचा ठोसपणा असतो. प्राचीन साहित्य, समाजशास्त्र इत्यादींच्या अभ्यासामुळे त्यांच्या लिखाणाला विशाल पट लाभतो. 'पैस' या त्यांच्या ललित निबंधसंग्रहाला साहित्य अकादमीने (१८६९) गौरविले होते. कठोर नीतिमूल्यांचा आग्रह धरणा-या दुर्गाबाईंना साहित्य जगतात मोठा मान आहे.

पंढरीचा विठोबा

पंढरीचा नि प्रत्येक मराठी माणसाचा आंतरीक दुवा कुठे ना कुठेतरी जुळलेला असतोच. कारण पंढरी म्हटली की, तिच्यात सावळे सगुण ब्रहम सामावते. विश्वास असो अगर नसो, वारकरी पंथाच्या समत्वाबद्दल प्रत्येक माणसाला आतून मायाच नव्हे

तर ओढ असते. प्रत्येक माणसाला आपल्या कुटुंबाबद्दल, पूर्वजांबद्दल जे उपजत आकर्षण असते तेच आकर्षण पंढरपुराबद्दल आढळते.

भीमेच्या तीरावर पंढरपूर नि पंढपुरात विठोबाचे देऊळ आहे. महाराष्ट्राच्या अध्यात्माची ही सर्वश्रेष्ठ पेठ आहे. भीमा ऊर्फ भीमरथी नदी ही महाभारताच्या काळापासून एक पवित्र नदी म्हणून गणली गेली आहे. पण पंढरपूर नि तिथला पांडुरंगमात्र पुष्कळ नंतरचा आहे. पण नंतरचा आहे म्हणूनच आधीच्या दैवतांच्या संप्रदायातला सारा गोडवा, सारे वैराग्य नि सारा भोळा भाक्तिभाव इथल्या वारकरी संप्रदायात भरलेला आहे. इतका की, जे जे इतर कुठल्याही संप्रदायात आहे ते सारे काही पंढरीच्या संप्रदायात आहे. पण पंढरीत आहे ते मात्र इतर कुठे आढळेलच असा संभव नाही.मुख्य म्हणजे पंढरीच्या पूजेअर्चेत बडिवार नाही. राजा - रंक असा भेद नाही. जात नाही, पात नाही, स्त्री-पुरुष असा भेदभाव नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकीकरणाची उत्कृष्ट प्रथा जर कुठे अद्यापही उत्स्फूर्तपणे टिकून असेल, तर ती या पंढरीतच. ज्ञानेश्वराने म्हटले आहे की, 'जळो वरचिल झळाळ'. त्याचा प्रत्यय याठिकाणी डोळस माणसाला आल्यावाचून रहात नाही. बाहेरच्या भपक्याचा तिटकारा मराठी संतांना होता. साधेपणानेच भक्तीला त्यांनी अती शोभा आणली. तोच तो मूर्तिमंत साध्या वत्सलतेचा आविष्कार म्हणजे पंढरीचा पांडुरंग. विठ्ठल हा लेकुरवाळा आहे, कुटुंब - वत्सलतेच्या पाशांनी बांधलेला आहे. भक्ताला पूर्ण जखडलेला देव कुठे असेल तर हा पुंडलिकाच्या विटेवर, कमरेवर हात ठेवून युगानुयुगे भक्तांची वाट पहाणारा विठ्ठलच, अशी भाविकांची श्रद्धा आहे. म्हणून विठ्ठल विठाबाई झाला, पांडुरंग झाला. दुस-या पुरुष देवाला सहसा कुठेही माउलीच्या रूपाने हाक मारताना आढळत नाही. महादेव, बालाजी, कृष्ण - सारे बाप आहेत, प्रियकर आहेत, पती आहेत, भाऊ आहेत पण विठ्ठलमात्र विठू होतो तसाच तो विठाबाई पण होतो.

कर्नाटक आणि आंध्र या भागात लिंगायत संप्रदायामुळे वैष्णव आणि शैव या दोन संप्रदायांत कडक वैर निर्माण झालेले आढळते. विठ्ठलाच्या संप्रदायात तसे होत नाही. याचे कारण काय? कारण असे की, विठ्ठल हा विष्णुरूप आहे त्याप्रमाणे शिवरूपदेखील आहे.

विठ्ठलाच्या कथेत शिव आणि विष्णू यांचे ऐक्य झालेले आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्र त्याप्रमाणेच आंध्र यांच्या एकात्म संस्कृतीचे पूर्ण प्रतीक म्हणजेच पंढरीचा विठोबा. या तीन प्रांतांत भाषाभिन्नता असूनही त्यांची संस्कृती एक आहे. संस्कृतीचे एकात्म्य या तिन्ही भागांतल्या डोंगराळ ग्रामविभागातल्या गोपसंस्कृतीतून स्फुरलेले आहे. विठ्ठल कानडा आहे. तो गवळी आहे. काळी घोंगडी पांघरतो. राही - रुक्मिणी त्याच्या दोन बायका. राही किंवा राधा इतरत्र कृष्णाची प्रेयसी असते, महाराष्ट्रातमात्र ती त्याची बायको झाली आहे. पण विठ्ठलाची खरी राणी रुक्मिणी. पण तरीही हा काही तिच्यात गुरफटलेला नवरा नाही. दोघांची देवळे पंढरपुरात वेगळी.

एक दिवस अचानक पंढरपूरला जाण्याचा योग आला. अर्ध्या तासाचीच तेथे वस्ती झाली.विटेवरच्या पांडुरंगाचे दर्शन घेतले. भक्तीचा उमाळा नव्हता. दुःखही नव्हते. मन अगदी स्तब्ध झाले होते. असे निराकार ते क्वचितच होते. आम्ही पंढरपुराहून परतलो. चंद्रभागेने येताना साद घातली होती तशीच जातानाही घातली. ओळख कायम झाली. गावाच्या शिवेवर आम्ही आलो. एक काळा, प्रौढ धनगर, डोईवर मुंडासे घातलेला, समोरून येत होता. त्याला गावात जायचे होते. बरोबर चार शेळ्या. त्याचा रंग काळ्या पाषाणाचा, तुकतुकीत काळा. मान आखूड, खांदे व छाती भरदार, दंड पिळदार. काळ्या चेह-यावर मिशा हरवल्या होत्या. डोळे लहान पण लालूस आणि चमकदार. बांधा आखूड. त्याचे पाय जाड, खांबासारखे, पण पूर्ण जिवंत. जिथे पडतील तिथे रोवले जातील आणि रोवले जातील तिथे रुजतील असे वाटले. थेट विटेवरच्या विठोबाचे मानवी ध्यान ऐहिकातून चालले होते. आजवर तुकारामाने या अक्षरशः कुरूप मूर्तीला 'सुंदर ते ध्यान' असे का म्हटले ते मला कळले नव्हते, परंतु आता थोडा उमज पडला. तो असा की, सजीव तेच स्वाभाविक असते आणि स्वाभाविक तेच खरे सुंदर असते. आणि ते सौंदर्य उमगायला तुकारामासारखेच साधे आणि निष्पाप कविमन लागते. ते ध्यान पाहिले आणि तुंबलेले मन मोकळे झाले. काळ्या मातीवर हुकूमत चालवणारा काळा पाषाण सजीव झाला होता. तो मानवमूर्ती झाला होता. तोच देवमूर्ती झाला होता.पंढरीच्या विठोबाचे व माझे पिढयांचे आंतरिक नाते नव्याने उजळले.

- 'पैस'

शब्दार्थ

दुवा	-	दोन भागांना जोडणारा भाग - सांधा
बडिवार	-	खोटा किंवा पोकळ मोठेपणा, आडंबर
झळाळ	-	चमक, चकाकी
डोळस	-	डोळे असलेला. 'आंधळा' च्या विरुद्ध. इथे अर्थ जाणतेपणाने पहाणारा.
भपका	-	भडक थाटमाट
लेकुरवाळा	-	मुलंबाळं असलेला
गुरफटलेला	-	गुंतून पडलेला
स्तब्ध	-	शांत, स्थिर
साद घालणे	-	हाक देणे, बोलवणे
ऐहिकातून	-	या जगातून
मुंडासे	-	डोक्याला (मुंडी) बांधलेले पागोटे
उमज पड्णे	-	बोध होणे, समजणे
उमगायला	-	कळायला
तुंबलेले	-	न वहाता साचून राहिलेले
आंतरिक	-	मनाचे, अंतःकरणाचे.

सांस्कृतिक टिपा

१ लेकुरवाळा विठ्ठल हे वर्णन जनाबाईच्या अभंगात आहे. आईबाप आपल्या लहान मुलांना कडेखांद्यावर घेऊन, हाताला धरून नेत असतात तसा विठ्ठल संतांसह असतो असे हे वर्णन ---

विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा

निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर
गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जीवा बरोबरी
बंका कडियेवरी । नामा करांगुली धरी
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा.

२ कानडा विठ्ठल - विठ्ठल हे महाराष्ट्रीयांचं प्रिय दैवत मूळ कर्नाटकातून आलं आहे. ज्ञानेश्वर म्हणतात -

कानडा वो विठ्ठलु । करणाटकु
तेणे मज लावियेला । वेधु

३ रुक्मिणीचं वेगळं देऊळ - पंढरपूरच्या देवळात रुक्मिणीची मूर्ती विठ्ठलाच्या शेजारी नाही. विठ्ठलाकडे सतत त्याचे भक्त येतात. म्हणून त्याला भक्तांमधेच राहू द्यायचं रुक्मिणीनी ठरवलं. ती रुसून विठ्ठलाकडे पाठ करून मागच्या बाजूला दुस-या देवळात राहिली अशी समजूत आहे. 'राही' आली म्हणून रुक्मिणी रुसली असेही 'पंढरी महात्म्या-त सांगितले आहे. या संबंधात धनगरांची लोककथा वेगळी आहे. 'पैस' पुस्तकात ती मुळातून वाचा.

शिवरूप आणि विष्णुरूप विठ्ठल - वारकरी पंथ नाथ संप्रदायाशी जोडल्यामुळे हे ऐक्य आहे.

मुकुंद मुरारी प्रद्युम्न केशवा / तूचि सदाशिवा शांतरूपा.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ पंढरीचे आणि मराठी माणसाचे कसे नाते आहे?

२ इतर कुठल्याही संप्रदायात आहे ते सर्व पंढरीच्या संप्रदायात आहे असे लेखिका का म्हणते?

३ 'पंढरीत आहे ते इतर कुठे आढळत नाही' स्पष्ट करा.

४ पंढरीच्या पांडुरंगाचे वेगळेपण कशात आहे?

५ विठोबा महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र यांच्या सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक कसा आहे?

६ लेखिकेला दिसलेल्या धनगरात आणि विठोबाच्या मूर्तीत काय साम्य आहे?

७ तुकारामांनी वर्णन केलेल्या विठ्ठलाच्या सुंदरतेचा अनुभव लेखिकेला कसा आला?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ महाराष्ट्राच्या अध्यात्माची ही सर्वश्रेष्ठ पेठ आहे.

२ पण पंढरीत आहे ते मात्र इतर कुठे आढळेलच असा संभव नाही.

३ बाहेरच्या भपक्याचा तिटकारा मराठी संतांना होता.

४ विठ्ठल हा लेकुरवाळा आहे.

५ पण विठ्ठल मात्र विठू होतो तसाच तो विठाबाई पण होतो.

६ पण तरीही हा काही तिच्यात गुरफटलेला नवरा नाही.

७ थेट विटेवरच्या विठोबाचे मानवी ध्यान ऐहिकातून चालले होते.

८ सजीव तेच स्वाभाविक असते आणि स्वाभाविक तेच खरे सुंदर असते.

९ पंढरीच्या विठोबाचे व माझे पिढ्यांचे आंतरिक नाते नव्याने उजळले.

भाषाभ्यास

प्रश्न १ खालील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

आंतरिक दुवा, ओढ असणे, गणली जाणे, प्रत्यय येणे, तिटकारा असणे, साद घालणे, उमज पडणे, योग येणे.

प्रश्न २ खालील शब्दांचा अर्थ सांगा.

सावळे - सगुण, बडिवार, झळाळ, डोळस, तिटकारा, मुंडासे, लेकुरवाळा, कुटुंबवत्सल, माउली, गुरफटलेला, शिवेवर, तुंबलेले.

प्रश्न ३ पंढरी म्हटली की, तिच्यात सावळे - सगुण ब्रह्म साकारते. जेव्हा एखाद्या गोष्टीबरोबर दुसरी आठवण बांधली जाते तेव्हा अशी वाक्यरचना करतात. उदा:-

१ आग्रा म्हटलं की, ताजमहाल डोळ्यांसमोर उभा रहातो.

२ मे महिना म्हटला की, आंबे, गर्दी, पाहुणे आठवतात.

३ अंदमान म्हटलं की, मराठी माणसाला सावरकरच आठवतात.
अशी पाच वाक्ये करा.

प्रश्न ४ प्रत्येक माणसाला आतून मायाच नव्हे तर ओढ असते. याचा अर्थ नुसती मायाच असते असे नाही तर ओढ असते. (मायेबरोबर ओढही असते) उदा:-

१ भाषा शिकायची तर नुसतं भाषेबद्दल प्रेमच नाही तर चिकाटीही हवी.

२ सैनिकाजवळ शौर्यच नव्हे तर सावधपणाही हवा.

३ घर सजवायला पैसाच नव्हे तर हौसही पाहिजे. अशी वाक्ये बनवा.

प्रश्न ५ भीमा ही महाभारत काळापासून एक पवित्र नदी म्हणून गणली गेली आहे. हेच वाक्य १ भीमा ———— एक पवित्र नदी म्हणून ओळखली जाते २ भीमेची गणना ———— पवित्र नद्यांमधे होते, अशा पद्धतीनेही लिहिता येईल. पुढील वाक्ये पहिल्या दोन प्रकारांनी लिहा.

१ पं नेहरूंची गणना जगातल्या शांतिदूतांमधे होते.

२ जगातल्या प्राचीन संस्कृतींमधे भारत, चीन, ईजिप्त या देशांची गणना होते.

३ पेले, बियॉर्न बोर्ग, बुबका, ब्रॅडमन यांची गणना क्रीडा जगतातल्या अव्वल खेळाडूंमधे होते.

प्रश्न ६ 'त्याचा प्रत्यय या ठिकाणी आल्यावाचून रहात नाही' हे वाक्य अर्थ न बदलता होकारार्थी करा.

प्रश्न ७ भक्ताला पूर्णपणे जखडलेला देव कुठे असेल तर हा पुंडलिकाच्या विटेवर. 'कुठे असेल तर' ही रचना समजून घ्या. याचा अर्थ फक्त पुंडलिकाच्या विटेवरच भक्ताला पूर्णपणे जखडलेला देव आहे. या वाक्याला अधिक वजन येण्यासाठी त्याची रचना वरीलप्रमाणे केली आहे.

उदा:- १ अजूनही माणुसकी कुठे शिल्लक असेल तर ती खेडयात.

२ मन शांत करणारे संगीत कुठे असेल तर ते अभिजात भारतीय संगीतच.

३ पृथ्वीवर स्वर्ग कुठे असेल तर तो (काश्मीर) इथेच!
हे जहांगीर बादशहाचे वचन प्रसिद्ध आहे. अशी पाच वाक्ये करा.

स्वाध्याय

१ 'विठोबा माझा बॉयफ्रेंड' हा इरावती कर्वे यांनी लिहिलेला ललित निबंध वाचा.

२ तुमच्या प्रांतातल्या महत्त्वाच्या दैवताची माहिती देणारा निबंध लिहा.

पाठ पंधरावा

शालेय मराठी आणि झोपड पट्टी

लेखिका - डॉ. श्रीमती विजया चिटणीस
(जन्म १९३७ - मृत्यू १९८४)

परिचय

डॉ. विजया चिटणीस या भाषाशास्त्राअंतर्गत उपयोजित भाषाशास्त्र या शाखेच्या अभ्यासू संशोधक. मराठी भाषा परदेशी आणि परप्रांतीय लोकांना शिकवण्याचे आधुनिक तंत्र त्यांनी विकसित केले. यासाठी 'An Intensive Course in Marathi' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. 'खानदेशी' हा खानदेशी बोलीचे भाषाशास्त्रीय विवरण करणारा ग्रंथही त्यांनी लिहिला आहे. पश्चिम विभागीय भाषाकेंद्र या संस्थेच्या पहिल्या प्राचार्या म्हणून काम करत असताना त्यांनी अनेक संशोधन प्रकल्प हाती घेतले होते. त्यात मुंबईतील झोपडपट्ट्यांमधे रहाणा-या शालेय विद्यार्थ्यांची भाषिक पहाणी हा एक प्रकल्प होता. ज्यांची बोली प्रमाणभाषेपेक्षा म्हणजे शालेय भाषेपेक्षा वेगळी आहे अशा विद्यार्थ्यांच्या भाषाशिक्षणाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे, असे त्यांना या पहाणीत दिसून आले. त्यांच्या अहवालातून पुढील उतारा घेण्यात आला आहे.

शालेय मराठी आणि झोपडपट्टी

आधुनिक युगातली 'झोपडपट्टी' हे एक संपूर्ण नवे जग आहे आणि हया नव्या जगाबरोबर प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक नव्या समस्या उद्‌भवल्या आहेत. झोपडपट्ट्यांमधली काही मुले शाळेत येतात ती केवळ त्यांना तेथे थोडेफार खायला

मिळते, क्वचित दूध मिळते म्हणून. काही मुलांच्या घरचे वातावरण हे शाळेच्या वातावरणापेक्षा अगदीच भिन्न असते. शाळेत शिक्षक मुलांना शिकवत असतात, "शिव्या कोणाला देऊ नका". पण झोपडपट्टीतला हा छोटा मुलगा घरीदारी काय ऐकत असतो? काय पहात असतो? शिवाय बरीचशी शैक्षणिक दृष्ट्या प्रथम पिढीतली मुले चौथ्या इयत्तेनंतर शाळा सोडून देऊन आपल्या आईबापांना पैसे कमवण्यात मदत करायला सुरुवात करतात.त्यांना तसे करण्यावाचून इलाजच नसतो. शिक्षकांनाही ते माहीत असते. त्यामुळे साहजिकच अशा मुलांना शिकवण्यात त्यांना काही रस नसतो. काही मुले तशाही परिस्थितीत शाळा चालू ठेवतात, पण ती घरी गेल्याबरोबर अभ्यास बाजूला ठेवून आपल्या आईबापांना मदत करायला लागतात. आणि हे अगदी स्वाभाविकही आहे. पण अशा मुलांना घरी अभ्यासाला वेळ मिळणे जवळजवळ अशक्यच असते. सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांच्या स्वतःच्या अशा काही अडचणी असतात. त्यामुळे ती मुले शाळेत वेळेवर येऊ शकत नाहीत. आणि शिक्षकांना ह्या मुलांच्या अडचणी माहीत असल्यामुळे तेही ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात. ह्याचा परिणाम शाळेच्या एकूण सर्वच शैक्षणिक कार्यक्रमावर होतो. शिक्षकांकडून दिले जाणारे उपयुक्त असे शिक्षण वेळापत्रकावर दाखवल्या गेलेल्या कार्यक्रमापेक्षा कितीतरी कमी होते. शिक्षकांना वर्षासाठी नेमून दिलेला अभ्यासक्रम संपवण्यासाठी अटीतटीने झगडावे लागते. एखाद्या मुलाने समजा अभ्यासात जरा जास्त रस दाखवलाच, तर "शिकून कुठे साहेब व्हायला निघालास" असे बोलून त्याचे अशिक्षित आई-बाप त्याला नाउमेद करतात. "पुरं झालं तुझं शिकणं! आता पोटाला काहीतरी मिळवायला लागा" अशा त-हेची बोलणी त्याला वरचेवर ऐकायला लागतात.

ह्याच्या नेमके उलट चित्र आपल्याला सुशिक्षित कुटुंबातून दिसेल. तिथे आपल्याला केवळ मुलांमधेच नाही तर आई-वडिलांमधेही अतिरेकी स्पर्धा आढळून येते. मुलांचे आई-वडील, विशेषतः त्यांच्या सुशिक्षित आया, त्यांच्याबरोबर अभ्यासाला बसतात आणि त्यांच्या अभ्यासात त्यांना मार्गदर्शन करत असतात. आई-वडिलांचा उत्साह

कित्येकदा इतका असतो की, त्यांच्या मुलाला मिळालेल्या सर्वोच्च मार्कांचे श्रेय मुलाकडे जाते की त्या मुलाच्या सुशिक्षित आईच्या प्रेरणेला आणि परिश्रमांना जाते, असा प्रश्न मला पडतो.

अशा त-हेच्या सोयी, झोपडपट्टी भागातून आलेल्या एखाद्या बुद्धिमान मुलाला मिळवून देता येतील का? त्या तशा मिळवून देता आल्या तर या मुलांची शैक्षणिक प्रगती पुष्कळच अधिक होईल.

आपल्या सर्वांच्या मनात एका गोष्टीविषयी बिलकुल संदेह नाही. आणि ती गोष्ट म्हणजे शिक्षण ही एक सामाजिक गरज आहे. पण सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊनच आपल्याला शैक्षणिक कार्यक्रम ठरवला पाहिजे. अल्पसंख्य किंवा झोपडपट्टीतल्या मुलांना शिकवता येण्यासारखे विषय किती व कोणते यापेक्षा त्यांच्यासाठी जास्तीत जास्त काय करता येईल हे लक्षात घेऊन त्यांचा अभ्यासक्रम आखणे हे जास्त महत्त्वाचे व न्याय्य ठरेल. उदा० कामाठीपुरा विभागातल्या झोपडपट्टीतून आलेल्या मुलाच्या भाषेचा प्रश्न लक्षात घ्या. हया मुलाची मातृभाषा कोणती? त्याच्या कुटुंबात कोणकोण लोक आहेत? त्याचे शेजारी कोण आहेत? तो कोणत्या परिस्थितीत रहातो आहे? त्याचे वडील कोणती भाषा बोलतात? त्याच्या आईच्या भाषेचे काय? ती कोणती भाषा बोलते? त्याच्या आईबापांशिवाय मूल आपल्या अवती भोवतीच्या मुलांमधेही मिसळत असते, आणि त्याला त्याच्याभोवती बोलल्या जाणा-या भाषेशी (किंवा भाषांशी) जुळवून घ्यावे लागते. या भाषा कोणत्या?

अशा प्रकारच्या प्रश्नांच्या आधारे हया मुलांच्या भाषेचा शोध घेता येतो. आणि तो घेणे सर्वच झोपडपट्ट्यांमधे सुरू करणे आवश्यकही आहे. अशाप्रकारची माहिती गोळा करून, मूल भोवतालच्या ज्या विविध भाषा ऐकत असते त्यांतून कोणत्या भाषेला विशेष प्राधान्य देते ते दाखवून दिले पाहिजे. मुलांच्या भाषिक सवयींवर जोर दिला पाहिजे. ज्या भाषेला मूल विशेष प्राधान्य देते त्या भाषेचा शोध घेणे ही एक

सामाजिक-सांस्कृतिक जबाबदारी होऊन बसते. अशा मुलांना वर्गाकडे आकर्षित करायचे असेल तर त्या मुलांच्या उच्चारणाच्या सवयी, त्यांच्या भाषेचे व्याकरण तसेच त्यांचा शब्दसंग्रह हया सर्व गोष्टींचा त्याच्या शाळेच्या सुरुवातीच्या काळात आपण मान राखला पाहिजे.आपल्या भाषिक सवयी आणि आपली भाषा ही मुलाच्या भाषेपेक्षा श्रेष्ठ आहे ही समजूत शिक्षकांनी बाजूला सारली पाहिजे.

प्राथमिक शाळेत भाषा हा अभ्यास-विषय नसून सर्वप्रथम ते मुलांना ज्ञानग्रहण करायला आवश्यक असे एक माध्यम आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. जोपर्यंत असे माध्यम हे मुलाच्या नेहमीच्या सवयीतल्या भाषेपेक्षा वेगळे असते, तोपर्यंत ते 'विषय' होऊ शकते. अशा प्रकारे माध्यम, प्रमाण भाषा-हा प्रारंभी एक अभ्यासविषय होऊ शकतो. जेव्हा आपण इतर मुलांप्रमाणे झोपडपट्टीतल्या मुलांनाही त्याची 'मातृभाषा' शिकवतो असे म्हणतो तेव्हा आपण खरोखर आपल्या शालेय कार्यक्रमात स्वीकारल्या गेलेल्या प्रमाण मराठी भाषेचा विचार करीत असतो, पण वास्तवात ती त्या मुलाची मातृभाषा नसते.

अशा प्रकारे प्रमाण भाषा शिकवण्याचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा दोन बोलींमधल्या अंतराचा मुद्दा फार महत्त्वाचा ठरतो. कोळी बोली आणि प्रमाण मराठी यांमधले अंतर फार मोठे आहे. तर व-हाडी बोली व प्रमाण मराठी यांतले अंतर त्यामानाने कमी आहे. शिक्षकाच्या लक्षात हा मुद्दा न आल्यामुळे त्यांना अशा मुलांची भाषा फारच अशुध्द आहे असे वाटण्याचा संभव असतो. कोळी किंवा खानदेशी मुलांच्या मनात न्यूनगंड निर्माण होईल अशा त-हेने शिक्षकांनी या अंतराकडे पाहू नये. त्या मुलांना असे वाटता कामा नये की वर्गातली काही मुले ही आपल्यापेक्षा 'चांगले' बोलतात, हया मुलांचे बोलणे प्रमाण बोलीच्या जवळचे आहे, आपले चुकीचे आहे, ही भावना त्यांच्या इतर विषयांच्या अभ्यासातल्या प्रगतीतसुद्धा अडथळे निर्माण करण्याची शक्यता असते. कारण हया विषयांचे माध्यमसुद्धा प्रमाण बोलीच असते.

एखादी भाषा शिकवणे म्हणजे विद्यार्थ्यांनी ग्रहण केलेल्या कोणत्याही विषयाचे ज्ञान दुस-याला समजेल अशा प्रकारे त्याला त्या भाषेत व्यक्त करता येणे किंवा त्या भाषेतील आधिकाधिक ज्ञान ग्रहण करायला त्याला समर्थ बनवणे.

भाषा शिकण्यामागचे हे उद्दिष्ट आपण कसे साध्य करणार आहोत? खानदेशी किंवा कोळी बोली बोलणा-यांच्या जन्मजात भाषिक सवयींना धक्का न लावता प्रमाणभाषा साध्य करण्यासाठी आपण त्यांना मदत केली पाहिजे, मार्ग शोधून काढला पाहिजे.

'भाषा आणि जीवन'
मार्च १९८४

शब्दार्थ -

अटीतटीने	-	अतिशय प्रयत्नपूर्वक, खूप कष्ट करून
न्यूनगंड	-	आपत्यात काही कमी आहे याची आत्मविश्वास घालवणारी जाणीव.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) झोपडपट्टीतील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे असे वातावरण असते का?

२) सुशिक्षित कुटुंबातल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचे श्रेय कोणाला जाते? कशामुळे?

३) झोपडपट्टीतल्या मुलाच्या भाषेवर कशाकशाचा परिणाम झालेला असतो?

४) 'मातृभाषा' शिकवण्याच्या कोणकोणत्या बाजू लेखिकेने मांडल्या आहेत?

५) झोपडपट्टीतल्या विद्यार्थ्यांना शिकवणा-या शिक्षकावर कोणती जबाबदारी येऊन पडते?

प्रश्न खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ साहजिकच अशा मुलांना शिकवण्यात त्यांना काही रस नसतो.

२ शिकून कुठे साहेब व्हायला निघालास?

३ सर्वोच्च मार्कांचे श्रेय मुलाकडे जाते की त्या मुलाच्या सुशिक्षित आईच्या प्रेरणेला आणि परिश्रमांना जाते, असा मला प्रश्न पडतो.

४ भाषा हा अभ्यासविषय नसून सर्वप्रथम ते मुलांना ज्ञानग्रहण करायला आवश्यक असे एक माध्यम आहे.

५ वास्तवात ती त्या मुलाची मातृभाषा नसते.

६ त्या मुलांना असे वाटता कामा नये की वर्गातली काही मुले आपल्यापेक्षा [चांगलं] बोलतात.

(पूरक लेखन/ वाचन)

१) एखादी भाषा शिकवणे म्हणजे विद्यार्थ्यांनी ग्रहण केलेले कोणत्याही विषयाचे ज्ञान दुस-याला समजेल अशा प्रकारे त्याला त्या भाषेत व्यक्त करता येणे किंवा त्या भाषेतील अधिकाधिक ज्ञान ग्रहण करायला समर्थ बनवणे. लेखिकेचा हा विचार स्पष्ट करणारा एक निबंध तुमच्या अनुभवाच्या आधारे लिहा.

२) तुमच्या वर्गात शालेय भाषेपेक्षा वेगळी भाषा बोलणारे विद्यार्थी असतात का? त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी तुम्ही काय करता?

४) विद्यार्थ्यांनी अर्धवट शिक्षण सोडून देण्यात भाषेतील अडचणींचा वाटा किती असतो असे तुम्हाला वाटते? या विषयावर गटचर्चा करा.

धडा सोळावा
शरावती

लेखक श्री. रामचंद्र भिकाजी जोशी
(जन्म १९०३ - मृत्यू १९८८)

परिचय

रा. भि. जोशी हे मराठीत प्रवासवर्णनकार म्हणून सर्वांना माहीत आहेत. प्रवासवर्णन हा ललित निबंधाचाच एक प्रकार आहे. पहाणा-याच्या व्यक्तिमत्त्वानुसार प्रवासवर्णनातले लालित्य वाढते. रा. भि. जोश्यांची प्रवासवर्णने वाचताना याचा अनुभव येतो. त्यांचा उर्दू आणि संस्कृत भाषांचा गाढा व्यासंग आहे. निरीक्षणात बारकावा, सतत ताजी सौंदर्यदृष्टी, निरनिराळ्या ऐतिहासिक, पौराणिक आणि वाङ्‌मयीन संदर्भांनी त्यांचे प्रवासवर्णन समृद्ध असते. 'वाटचाल', 'मजल दरमजल', 'उथव', 'घाटशिळेवर उभी' ही त्यांची सर्वच प्रवासवर्णने अतिशय वाचनीय आहेत. भटकंतीची त्यांना मुळापासून आवड आहे. काहीवेळा ही ठिकाणे प्रत्यक्ष पहाण्यापेक्षा अधिक जिवंत, समृद्ध ठसा त्यांचे प्रवासवर्णन वाचून आपल्या मनावर उमटतो. 'सोन्याचा उंबरठा' हे त्यांचे व्यक्तिचित्रांचे संकलन आहे. त्यांनी काही उर्दू व इंग्रजी ग्रंथांचे भाषांतरही केले आहे.

शरावती

सकाळी सगळे दृश्य बदललेले होते. आधल्या रात्रीच्या काळोखाच्या दरीच्या जागी. हिरव्या पिवळ्या रानाने झाकळलेली काळ्या - पिंगट दगडया कपारीची दरी पसरलेली दिसत होती. समोर 'राजा' नऊशे फुटांवरून ओळंबा धरल्यासारखा सरळ

खालच्या कुंडात कोसळत होता. त्याच्या शेजारी रॉकेटचा प्रवाह मधल्याच एका खडकावर आपटून सहस्त्रशः विदीर्ण होऊन, वर उडी घेऊन खाली सूर मारीत होता. आणि त्याच्या डावीकडे त्या तीन दगडांपासून जरा बाजूला, 'ला दाम ब्लॉक' (गौरी) एखाद्या सलज्ज कुलवतीप्रमाणे संकोचाने अंग सावरत खाली उतरत होती. तिच्या त्या उतरण्याला धबधबा म्हणणे म्हणजे तिचा उपमर्द होईल. हिरकण्यांच्या पडद्यासारखा तिचा प्रवाह आधी एका कपारीवर, तिथून खालच्या दुस-या कपारीवर, तिथून तिसरीवर असा घरंगळत होता. पश्चिमेकडून जेव्हा तिस-या प्रहराचे ऊन तिच्या अंगावर पडत असेल तेव्हा तिचे उज्वल रूप देवांनी खाली उतरून पहाण्याच्या योग्यतेचे असेल आणि खालीदेखील तिचे कुंड, राणीवशाची स्नानाची पुष्करणी वेगळी असावी तसे, वेगळे होते. नदीला पूर आला म्हणजे मग मात्र गर्दीत जसे सभ्य - असभ्य, नाजूक आडदांड असे भेद ठेवणे अशक्य होऊन सगळे एकमेकात मिसळतात तसे हे प्रवाह बरेचसे एकमेकांशी अंगे घाशीत उडया घेतात. पण ह्यावेळी जो तो आपले वैशिष्ट्य आणि वेगळेपण सांभाळून होता आणि कधी कधी किंचित कृश झालेल्या स्त्रीचे लावण्य जसे वेगळीच रेखीव शोभा धारण करते तशी 'गौरी' यावेळी सुंदर दिसत होती. जिथून ती खाली उतरत होती, तिथेच कडयाच्या टोकाशी उभा राहून एक चाफा तिचे लावण्य निरखीत होता. तिच्या दर्शनाने तो इतका बेहोष झाला होता की, आपल्या अंगावरची पाने गळाल्याचेही त्याला भान नव्हते. आपल्या शुचिस्मिताने आपण वातावरण प्रसन्न करीत आहोत याचेही त्याला भान नसेल आणि तो इतका वाकला होता की कडयाच्या कपारीत त्याचे पाय जखडले गेले नसते तर तिचे रूप अखेरपर्यंत पहाण्यासाठी त्याने खाली उडीही घेतली असती.

दोन्ही कुंडांच्या मधला कडा बराच पुढे आलेला आहे. त्याच्या पायथ्याकडला काही भाग प्रचंड अशा कासवाच्या वर उचललेल्या डोक्यासारखा दिसत होता. जणू समुद्रमंथनाचे काम संपल्यावर, अमृत पिण्यासाठी आणि रत्नांच्या वाटणीसाठी उत्सुक झालेले देव, गरज सरो आणि वैद्य मरो या न्यायाने मंदाराचलाखालच्या कासवाला तिथेच विसरले होते, आणि शरावतीच्या पायाखालच्या त्या विवरातून ते बाहेर येऊ पहात होते. डोके वर आले आणि शरीर खाली राहिले ते राहिलेच. कल्पांतानंतर पुन्हा

जेव्हा अमृताची गरज लागेल तेव्हा त्यांना कासवाची आठवण होऊन त्याचा शिलोद्धार होणार. तोपर्यंतचा काळ त्याला कासवाच्या सोशिकपणानेच कंठावा लागेल.

वरून कोसळलेले आणि खालून मोकळे झालेले हत्ती एवढेप्रचंड खडक खाली कुंडाच्या आसपास पसरले आहेत. त्यावर उभे राहून वर पाहिले. 'यतो वाचो निवर्तन्ते' असे रौद्र दृश्य होते. ज्यांच्या प्रवाहांमधे शेकडो फुटांचे खरोखर अंतर ते धबधबे वर एकमेकांना खेटलेले दिसत होते. कडयाच्या टोकावरच्या प्रचंड वृक्षांना वृंदावनातल्या तुळशीच्या रोपटयांचा आकार आला होता. गंगावतरणाच्यावेळी आकाशातून कोसळणा-या गंगेकडे पहाताना भगीरथाला आणि शिवाच्या गणांना कसे वाटले असेल हयाची कल्पना मन करू लागले.

खाली कुंडातले काळे - हिरवे पाणी, वरती शेवाळलेले पिंगट-काळे कडे आणि त्यावरून सहस्त्रावधी वर्षे अविरत कोसळत असलेले ते प्रचंड प्रवाह. खालून वर, वरून खाली फिरताना दृष्टी स्वधर्म विसरून जाते, विवश होते, भ्रमते. पांढ-याशुभ्र कबुतरांसारख्या दिसणा-या शेकडो पक्ष्यांचा थवा त्या धबधब्याच्या आतबाहेर मधूनच गर्रकन गिरकी घेऊन जाताना दृष्टीस पडला, म्हणजे मग त्या घोर-गंभीर दृश्याला उज्वल नाजूकपणाचा स्पर्श होऊन जातो आणि दृष्टी परत भानावर येते.

गिरसप्प्यापेक्षा अधिक उंच, अधिक रुंद, किंवा अधिक मोठे धबधबे जगात इतरत्र आहेत, पण भव्यता आणि सौंदर्य यांचा असा संयोग इतरत्र नाही असे म्हणतात. उन्हाळ्यात त्या क्षीण प्रवाहातही एवढी भव्यता होती, मग पावसाळ्यानंतरच्या दोन - चार महिन्यांत जेव्हा प्रवाह पुष्ट असतो, तेव्हाचे त्याचे रूपवैभव अलौकिकच असले पाहिजे. त्यावेळी सबंध दरी घोषरवाने निनादून तुषारांनी दाटून जात असेल. त्यावर उन्हाची तिरीप पडली म्हणजे इंद्रधनुष्ये दिसू लागत असतील; आणि पहाणा-याला क्षणमात्र का होईना, योगिजनांना कष्टसाध्य समाधीनेच लाभणारा दिव्यत्वाचा साक्षात्कार होत असेल. हे अनुपम दृश्य आम्हाला पहायला मिळाले नाही. पण ते स्थानच असे आहे की जे पाहिले तेही 'यदत्पमपि तद् बहुः' असेच वाटावे.

- **' वाटचाल'**

शब्दार्थ व टिपा

शरावती	- कर्नाटकातली एक नदी. हिच्या प्रवाहावरच गिरसप्प्याचा प्रचंड धबधबा आहे.
ला दाम ब्लॉक	- फ्रेंच शब्द. अर्थ - एक सलज्ज युवती.
यतो वाचो निवर्तन्ते	- जिथून शब्द परततात. ज्याचे शब्दांनी वर्णन करता येत नाही असा. 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' असे ब्रह्मानंदाचे उपनिषदात वर्णन आहे. तैत्तिरीय उपनिषदाच्या आनंदवल्लीमधे चौथ्या व नवव्या अनुवाक्याच्या आरंभीच्या मंत्रात हे वाक्य आले - आहे मुळातल्यापेक्षा थोडया वेगळ्या अर्थाने हे वाक्य इथे वापरले आहे.
यदल्पमपि तद् बहुः	- चांगली गोष्ट थोडी मिळाली तरी पुष्कळ मानावी.
झाकळलेली	- झाकली गेलेली, छाया पसरलेली.
कपार	- डोंगरातला अडचणीचा खडकाळ भाग
पिंगट	- पिवळसर
ओळंबा	- भिंतीचें, खांबाचे बांधकाम सरळ उभ्या रेषेत (लंबरेषेत) आहे की नाही हे पहाण्यासाठी गवंडी दोरीच्या टोकाला जड गोळा लावलेलें साधन वापरतात. त्याला ओळंबा म्हणतात.
सूर मारणे	- तिरक्या किंवा खाली सरळ रेषेत वेगाने उडी मारणे. (पोहणारे पाण्यात सूर मारतात.)
राणीवसा	- राणीवंश - राजस्त्रिया
उशी घेऊन	- उसळून, वर झेपावून

विवर	-	पोकळ भाग, डोंगरातल्या मोठया गुहा
विवश	-	हतबल, अगतिक, आपल्या ताब्यात नाही अशी.
जखडणे	-	गच्च बांधणे
उपमर्द	-	अपमान, अशिष्ट वर्तन.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ लेखकानी पाहिलेल्या धबधब्यांची नावे काय होती? ती नावे सार्थ होती का?

२ लेखकाला 'गौरी' चे सौंदर्य कशाप्रकारचे वाटले?

३ या उता-यातला चाफा सोनचाफा आहे का? कशावरून?

४ चाक्यावर गौरीच्या सौंदर्याचा काय परिणाम झाला?

५ लेखकाने खडकाच्या वर्णनात कोणत्या पुराणकथेचा संदर्भ दिला आहे?

६ धबधब्यांच्या भव्य सौंदर्याचा लेखकाच्या मनावर काय परिणाम झाला?

७ लेखकाची वृत्ती तत्त्वज्ञाची आहे हे तुम्हाला कुठे दिसून येते?

८ लेखक या ठिकाणी कोणत्या ऋतूत गेला होता? कशावरून?

प्रश्न २ खालील विधानांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ तिच्या त्या उतरण्याला धबधबा म्हणणे तिचा उपमर्द होईल.

२ तिचे कुंड, राणीवशाची स्नानाची पुष्करणी वेगळी असावी तसे, वेगळे होते.

३ पण हयावेळी जो तो आपले वैशिष्टय आणि वेगळेपण सांभाळून होता.

४ तिचे रूप अखेरपर्यंत पहाण्यासाठी त्याने खाली उडीही घेतली असती.

५ तोपर्यंतचा काळ त्याला कासवाच्या सोशिकपणानेच कंठावा लागेल.

६ 'यतो वाचो निवर्तन्ते' असे रौद्र दृश्य होते.

७ गंगावतरणाच्यावेळी ———— याची कल्पना मन करू लागले.

८ पण भव्यता अणि सौंदर्य हयांचा असा संगम इतरत्र नाही, असे म्हणतात.

भाषाभ्यास

प्रश्न १ खालील शब्दांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

ओळंबा, दांडगट, उपमर्द, घरंगळत, आडदांड, खेटलेले/ खेटून

प्रश्न २ खालील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

उशी घेणे, सूर मारणे, बेहोष होणे, भान नसणे, काळ कंठावा लागणे, विवश होणे, भानावर येणे

प्रश्न ३ 'गरज सरो अणि वैद्य मरो' या म्हणीचा खुलासा लिहा. या अर्थाची म्हण तुमच्या भाषेत असल्यास ती लिहा.

प्रश्न ४ सकाळी सगळे दृश्य बदललेले होते. यात बदल हे क्रियापद आहे. बदल (पु) जेव्हा नाम असते तेव्हा होणे हे क्रियापद येते. असे नाम आणि धातु अशी दोन्ही कामे करणारे शब्द पहा -

ओरड, चाल, वाढ, खेळ, जन्म, आवड इ.

या शब्दांचा दोन्ही प्रकारे वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ५ ते बाहेर येऊ पहात होते - ते बाहेर येण्याचा प्रयत्न करत होते, त्याची बाहेर येण्याची इच्छा होती हा अर्थ.

उदा: पाकिस्तानी खेळाडू सामना वाचवू पहात होते.

चोर पोलिसांना चुकवू पहात होता.

वाघीण पिंज-यातून सुटू पहात होती.

याप्रमाणे तुम्ही ५ वाक्ये बनवा.

प्रश्न ६ शरीर खाली राहिले ते राहिलेच - एखादी कृती पूर्ण झाली आणि तशीच राहिली हा अर्थ व्यक्त करणारी रचना.

उदाः त्याचे पैसे बुडाले ते बुडालेच !

तिचा नवरा घर सोडून गेला तो गेलाच!

गाडीत त्यांची बॅग हरवली ती हरवलीच!

सामना हातातून निसटला तो निसटलाच!

याप्रमाणे तुम्ही स्वतंत्र वाक्ये बनवा.

प्रश्न ७ 'मग' या उभयान्वयी अव्ययाचा सर्वसामान्य वापर 'नंतर' या अर्थाने होतो.

उदाः- आधी जेव मग अभ्यास कर. पण 'उन्हाळ्यात त्या क्षीण प्रवाहातही एवढी भव्यता होती मग ———— अलौकिकच असले पाहिजे या वाक्यात तुलनेसाठी त्याचा उपयोग केला आहे.

उदाः आताच इतकं उकडतं मग मे महिन्यात काय होईल?

बारशाला एवढा खर्च केला मग लग्नात किती कराल?

कोणार्क आता एवढं सुंदर आहे मग पूर्ण झालं तेव्हा कसं दिसत असेल?

अशी तुम्ही स्वतंत्र वाक्ये बनवा. काही प्रसंग ————

कवीचं साधं बोलणं ————

व्यापा-याची श्रीमंती ————

लताबाईंचा आवाज ————

जमीनदाराचा धाक ————

पूरक लेखन/ वाचन

१ रा. भि. जोश्यांचे एखादे प्रवासवर्णनपर पुस्तक वाचा.

२ अनंत काणेकर, काका कालेलकर, पु.ल. देशपांडे (विनोदी) असे आणखीही बरेच प्रवासवर्णनकार मराठीत आहेत. त्यांनी कोणती प्रवासवर्णने लिहिली याची माहिती घ्या.

३ तुमच्या प्रांतात धबधबा आहे का? तुम्ही तो पाहिला आहे का? असल्यास त्याचे वर्णन करा.

४ तुमच्या भाषेत कोणी प्रवासवर्णन लिहिले आहे, त्याची माहिती द्या.

५ तुम्ही पाहिलेल्या एखाद्या निसर्गरम्य ठिकाणाचे वर्णन लिहा.

धडा सतरावा

तुळजा भवानी

लेखक पंडित महादेवशास्त्री जोशी
(जन्म १९०६ - मृत्यू १९९३)

परिचय

पं. महादेवशास्त्री जोशी हे मराठीतले प्रसिद्ध कथालेखक, निबंधकार आणि प्रवासवर्णनकार आहेत. संस्कृतच्या अध्ययनाने आणि धार्मिक ग्रंथांच्या संस्कारांनी शास्त्रीजींचे मन अत्यंत प्रगल्भ बनले. त्यांच्या कथांमधून जुन्या पिढीतल्या एकत्र कुटुंबाचे, नात्यागोत्यांचे अणि.विशेषकरून संस्कारी मराठी स्त्रीमनाचे सुंदर दर्शन घडते. त्यांच्या 'मानिनी' या गाजलेल्या कथेवर आधारित चित्रपटाला राज्यसरकारचे पारितोषिक मिळाले होते. 'महाराष्ट्राची धारातीर्थे' (भाग १ व २) अणि 'तीर्थरूप महाराष्ट्र' (भाग १ व २) या दोन ग्रंथांमधून त्यांनी महाराष्ट्रातील किल्ले आणि तीर्थक्षेत्रे यांचे माहितीपूर्ण, ललितरम्य प्रवासवर्णन लिहिले आहे. या दोन ग्रंथांतून त्यांनी महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपराच जिवंत केली. 'भारतीय संस्कृती कोश' ही त्यांची सर्वात महत्त्वाची रचना आहे.

'वेलविस्तार', 'कल्पित आणि सत्य', 'भावबळ' यांसारखे त्यांचे कथासंग्रह कौटुंबिक वातावरण आणि भावपूर्ण चित्रणासाठी वाचनीय आहेत. 'नवनीत रामायण', 'महाभारत', 'भागवत', 'सुलभ काव्यशास्त्र', 'गोड स्त्रीगीते' लिहून त्यांनी विदग्ध संस्कृत साहित्य सोप्या मराठीत उपलब्ध करून दिले.

तुळजा भवानी

तुळजाभवानी ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. ही महाराष्ट्राची प्राणशक्ती आहे. महाराष्ट्र महोदयाची स्वयंस्फूर्ती आहे. महाराष्ट्राच्या सुपुत्रांची ती अंबा आहे.

आततायी असुरांची ती चामुंडा आहे. भक्तजनांची ती माउली आहे आणि श्रांत अनाथांची ती साउली आहे. ज्याला महाराष्ट्रात जन्म घेतल्याचा अभिमान आहे, त्याने एकवार तरी तिच्या पायांशी गेलेच पाहिजे. तिचे आश्वासक दर्शन घेतलेच पाहिजे.

सोलापूरहून तुळजापूर पंचवीस मैलांवर आहे. मराठवाडयातल्या उस्मानाबाद किंवा पूर्वीच्या धाराशिव जिल्हयातले ते एक तालुक्याचे ठिकाण आहे. आमची गाडी दीड तासात तो मार्ग क्रमून (सोलापूरहून) बालाघाटाच्या चढणीला लागली. घाटमाथ्यावरच्या पठारावर तुळजापूर वसले आहे.

एका धर्मशाळेपुढे गाडी उभी रहाताच क्षेत्रोपाध्यांनी आम्हाला घेरले. त्यांच्यापैकी आमच्या नशिबाला आला तो उपाध्या आम्ही पत्करला. दोनहजार फूट उंचीवरचे ते अर्धचंद्राकार गाव पहात पहात आम्ही त्याच्या मागून निघालो. गाव लहान असले तरी इथे सिमेंटचे रस्ते आहेत, वीज खेळवलेली आहे आणि नळही आणलेले आहेत. थोडे खाली गेल्यावर मंदिर प्राकाराचा पहिला अर्धवट उभारलेला दरवाजा दिसला. त्यापलीकडे देवीचे शिखरही डोळ्यांत भरू लागले. एकेक पायरी उतरत आम्ही देवीचे आवार जवळ करू लागलो.

पुढचा ठेंगणा दगडी सभामंडप ओलांडून आम्ही मध्यमंडपात प्रविष्ट झालो. आम्ही तिथे काळ्या फरशीवरून चालत नव्हतो, तर चांदीच्या चकचकीत रुपयांवरून! अंबिकेच्या घरी लक्ष्मी भक्तभाविकांच्या पायातळी लोळत होती, धनिकांनी अधिक धनसंपदा मिळवण्याच्या आकांक्षेने देवीच्या वाटेवर त्या रौप्यमुद्रा खिळवल्या होत्या.

जगदंबेची श्रीमूर्त गंडकी शिळेची आहे. ती सुमारे तीन फूट उंच आहे. भोवती प्रभावळ आहे.मस्तकीच्या मुकुटावर सयोनिलिंग असून मुकुटाखालून केसांच्या बटा बाहेर आलेल्या आहेत. देवी अष्टभुजा आहे. बिचवा, शंख, चक्र, धनुष्य, बाण, पानपात्र आणि असुराची शेंडी या वस्तू तिच्या हातात आहेत. पाठीवर बाणांचा भाता आहे. मुखाच्या उजव्या डाव्या अंगांना चंद्रसूर्य आहेत. उजवा पाय महिषासुरावर असून त्याच्या उजवीकडे सिंह अन् त्याखाली मार्कंडेय ऋषी आहे. डावा पाय पीठिकेवर असून दोन पायांमधे

तुटलेले महिषमस्तक आहे. या मूर्तीचे सौष्ठव पहाता ती सतराव्या किंवा अठराव्या शतकातली असावी असे श्री. ग.ह. खरे म्हणतात.

भारतात महिषमर्दिनी अष्टभुजेची उपासना प्राचीन असली, तरी तुळजाभवानी या नावाने महाराष्ट्रात तिची उपासना नेमकी केव्हा सुरू झाली, ते निश्चयाने सांगता येत नाही. इ. स. च्या अकराव्या शतकात परमार उपनावाचे एक राजघराणे कर्नाटकातून मिथिलेत गेले. त्या घराण्यातल्या हरिसिंहदेवाने इ. स. १३२४ साली आपली कुलदेवता म्हणून तुळजाभवानीची काही मंदिरे उभारली अशी माहिती मिळते. यावरून तुळजाभवा-नीची प्राचीनता इ. स. च्या ११ व्या शतकाच्याही मागे जाते.महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटकातही तिची उपासना प्रचलित होती, हेही कळून येते.

देवीची नित्यपूजा दिवसातून चार वेळा होते. पहाटेस पुजारी येऊन देवीचे श्रीमुख आणि करचरण पुसतो. तेच वस्त्र नंतर भक्तांच्या हातावर पिळतो, जे चार थेंब हातावर पडतील ते देवीचे चरणतीर्थ म्हणून भक्त प्राशन करतात. लगेच देवीला भाजीभाकरीची न्याहारी होते. दुपारी महापूजा. इथले पुजारी मराठे आहेत. ते पंचामृताच्या वेळी दह्यादुधाची भांडी देवीच्या मस्तकावर ओततात.नंतर शुद्धोदकाने स्नान घालतात. भाळी चंदनाचा मळवट भरतात. मस्तकी हळदकुंकू वहातात, हृदयावर बुक्का उधळतात. नंतर आरती, महानैवेद्य होतो. सायंकाळी धूपारती आणि रात्री प्रक्षाळण.

भक्तमंडळी तुळजापुरी दर्शनाला येतात, त्यापैकी ब-याच लोकांचे नवस फेडायचे असतात.कोणत्या तरी आपत्प्रसंगी ते केलेले असतात. नवस म्हणजे आर्त अथवा अर्थार्थी भक्ताने देवाशी केलेला एकप्रकारचा सौदा. यात देवाकडून आधी 'कोहळा' घ्यायचा असतो आणि तो मिळाला तरच त्याला आपला 'आवळा' द्यायचा असतो. नुसता नवस म्हटल्याने आलिकडील पिढीला त्यातला तपशील कळायचा नाही. मानवी मनाचे सौंदर्य, औचित्य, आचरटपणा, अघोरीपण या सर्वांचे दर्शन या नवसांच्या प्रकारांवरून चांगले होऊ शकेल.

पंचामृत अन् ओटी भरणे, हा इथला सर्वसामान्य नवस. मग कोणाची लोटांगणे असतात. कोण्या महिलेला निंबाचे टाळे नेसून पूजा - प्रदक्षिणा करायची असते. कोणी नवसासायासाने पुत्रवती झालेली नारी देवीला पाळणा - खेळणा बांधते. एखादी सौभाग्य चिरंतन करण्यासाठी वाणवसा करते.कोणी बाक्या प्रसंगी बोलून जाते, "अंबे भवानी, माझे कुंकू राख. मी तुझ्या दारी कुंकवाचा सडा घालीन"

आई अंबाबाई । खण नारळ ग तुला

राख माझ्या कुंकवाला । जन्मवेरी

तपस्येच्या बळावर अविनाशी सौभाग्य मिळवून बसलेल्या जगदंबेकडे स्त्रियांनी अक्षय चुडे मागायचे नाहीत, तर दुस-या कोणाकडे मागायचे? कोणी देवीवरून कोंबडी उतरतात. आपले पोटचे मूल देवीला वहाण्याचीसुद्धा एकाकाळी प्रथा होती. असे नवसाचे अनेक प्रकार.

तुळजाभवानी ही शिवाजी महाराजांची कुलस्वामिनी. त्यांची तिच्यावर अढळ निष्ठा होती. त्यांच्या हातातले खड्ग हा भवानीचाच वरप्रसाद होता.

कोणतेही महत्त्वाचे राजकारण उद्भवले, की महाराज प्रथम भवानी देवीचा कौल घेत. त्यांचे काया - वाचा - मन पवित्र होते. यज्ञमय होते. म्हणून ध्यान धरताच त्यांच्या अंगात भवानीचा संचार होत असे. देवी त्यांच्याच मुखाने भविष्यार्थ सांगे. देवीचे बोल बाळाजी आवजी शेजारी बसून लिहून घेई. शिवरायाला जिता धरून आणण्याचा विडा उचलून जेव्हा अफजुलखान विजापुराहून निघाला, तेव्हा महाराजांना ते मोठे अरिष्ट वाटले. खानाच्या बाबतीत काय धोरण ठेवावे, याविषयी संदिध, सचिंत होऊन ते कुलस्वामिनीच्या चरणांशी आले. त्यावेळी देवी त्यांच्या अंगात येऊन कोणते शब्द बोलली, ते चित्रगुप्त सांगतो -

"अरे मुला, चिंता का करतोस? तुजला माझा वर आहे. अरिष्ट दूर करीन; तुजला ही शिकारच साधून देत्ये."

-**'तीर्थरूप महाराष्ट्र'**

शब्दार्थ

कुलस्वामिनी	-	कुळाची म्हणजे घराण्याची देवता
आततायी	-	अविचारी, घाईने करणारा/ घाईगडबडीने केलेली गोष्ट, विचार
घाटमाथा	-	पर्वताच्या शिखराची जागा
गंडकी	-	नेपाळात उगम पावणा-या या पवित्र नदीतील शिळा शाळिग्राम, कसोटीचा दगड.
प्रभावळ	-	मूर्तीच्या मागे रुपे इ. धातूची केलेली महिरप, गोल कमान.
बिचवा	-	एकप्रकारची कटयार
सौष्ठव	-	आकाराचा भरीवपणा, उठावदारपणा.
मळवट	-	संपूर्ण कपाळभर लावलेले कुंकू.
लोटांगण	-	साष्टांग नमस्कार (सर्वांग जमिनीवर टेकवून)
वाणवसा	-	सुवासिनींना खण, नारळ, बांगडया, कुंकू इ. सौभाग्य वस्तूंची भेट देणे.
बाका (प्रसंग)	-	कठीण, अडचणीचा, संकटाचा (प्रसंग)
अक्षयचुडे	-	चुडे म्हणजे बांगडया हे सौभाग्याचे चिन्ह. अक्षयचुडे म्हणजे मरेपर्यंत सौभाग्य.

कौल	-	एखादी गोष्ट आपल्याला अनुकूल घडेल की प्रतिकूल हे देवासमोर काही विशिष्ट विधी करून अजमावतात. या विधीला 'कौल लावणे' असे म्हणतात.
जिता	-	जिवंत·
अरिष्ट	-	संकट.
विडा उचलणे	-	निश्चय करणे.

सांस्कृतिक टिपा

१) **वाणवसा** - वाण म्हणजे सुवासिनीला द्यायच्या वस्तू आणि वसा म्हणजे व्रत, एखादा धार्मिक नियम. वटपौर्णिमेदिवशी, संक्रांतीच्या हळदीकुंकू समारंभात, मंगळागौरीच्या उद्यापनाला साडीचोळी, कुंकवाचा करंडा, बांगडया, जोडवी अशा सौभाग्यचिन्ह मानलेल्या वस्तू सुवासिनी बायका एकमेकींना देतात त्याला 'वाण' म्हणतात. वसा याचा अर्थ एखादा धार्मिक नियम, व्रत, विशिष्ट धार्मिक विधी नियमितपणे करणे. सोमवारी उपास करणे, सकाळी गाईची पूजा करणे, गुरूवारी दत्ताला प्रदक्षिणा घालणे इ. अनेक नेम 'वसा' या प्रकारात येतात. श्रावण सोमवारी, शुक्रवारी विशिष्ट देवतेची पूजा करून काही ठराविक वस्तूंचा दानधर्म करणे म्हणजे वसा. कहाणीत 'उतशील मातशील घेतला वसा टाकून देशील', 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' असे संभाषण असते.

२) **क्षेत्रोपाध्यची** - तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी रहात असलेले ब्राह्मण पुजारी म्हणजे क्षेत्रोपाध्ये. कुलोपाध्ये, ग्रामोपाध्ये तसे हे क्षेत्रोपाध्ये. तीर्थयात्रेला येणारे भाविक हे त्यांचे तात्पुरते यजमान असतात. पुजारी ज्यांच्यातर्फे पूजा करतात त्यांना 'यजमान' म्हणतात. या भक्तांच्या इच्छेप्रमाणे क्षेत्रोपाध्ये देवाला अभिषेक, महानैवेद्य इ. पूजाविधी करतात. कोणाचे धार्मिक विधी करून दिले याची नोंद क्षेत्रोपाध्ये ठेवतात. हे पुजारी तीर्थाच्या

ठिकाणी पिढयानपिढया रहात असतात. त्यामुळे भाविकांच्या पुदच्या पिढीतले कोणी आले की, 'आपण त्यांचे क्षेत्रोपाध्ये' अशी ओळख ते देतात. यजमानाच्या रहाण्याजेवण्याची सोय ते करतात. पण त्यासाठी त्यांच्याकडून धार्मिक विधी करवून घेणे आवश्यक असते.

३) **कौल** - एखादे शुभकार्य किंवा महत्त्वाचे काम करावे की नाही, ते आपल्याला लाभदायक होईल किंवा नाही, याबद्दल देवाची/देवीची आज्ञा घेण्यासाठी हा विधी करतात. देवाच्या अंगावर तांदूळ, फुलं, सुपारी असे पदार्थ लावतात. या लावलेल्या वस्तू उजव्या बाजूला पडल्या तर अनुकूल, डावीकडे पडल्या तर प्रतिकूल असा अर्थ मानतात. खेडयातल्या लोकांचा, विशेषतः कोकणातल्या लोकांचा कौलावर फार विश्वास असतो.

४) **फरशीवर रौप्यमुद्रा** - देवळातल्या फरशीवर, जिथून भक्त अनवाणी चालत जातात तिथे रुप्याचं, चांदीचं नाणं आपल्या नावानी ठोकून बसतात. हेतू हा की देवाकडे येणा-या भक्तांच्या पावलांचा स्पर्श होऊन आपल्याला पुण्य मिळेल. पंढरपूरला देवळाच्या फरशीवर काही भक्तांनी स्वतःची नावे कोरून घेतली आहेत. भक्त त्यावरून चालत गेले की त्यांना नमस्कार केल्याचे पुण्य मिळते. अशी कल्पना आहे. नामदेवांनी याच पुण्यासाठी विठ्ठल मंदिराच्या पहिल्या पायरीखाली आपल्याला स्थान द्यावे अशी इच्छा व्यक्त केली होती. पण भक्त नामदेवाच्या पायरीला पाय लावत नाहीत.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ महाराष्ट्रात तुळजाभवानीचे काय महत्त्व आहे?

२ देवळात लक्ष्मी पायतळी लोळत होती असे का म्हटले आहे?

३ देवी महिषासुराचा वध करणारी आहे, पार्वती आहे हे कोणत्या विशेषांवरून दिसून येते?

४ देवीचे तीर्थ, तिची पूजा यांमधे महाराष्ट्रातला म्हणून कोणता 'वेगळेपणा' आहे?

५ भक्तांच्या नवसांना 'कोहळा' घेऊन आवळा' देणे का म्हटले आहे?

६ या नवसांची फेड करताना औचित्य आणि अघोरीपणा या दोन्हीचे दर्शन कसे होते?

७ तुळजाभवानी आणि शिवाजी महाराज यांचे नाते कशाप्रकारचे होते?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ ज्याला महाराष्ट्रात जन्म घेतल्याचा अभिमान आहे, त्याने एकवार तरी तिच्या पायांशी गेलेच पाहीज.

२ अंबिकेच्या घरी लक्ष्मी भक्तभाविकांच्या पायतळी लोळत होती.

३ देवीला भाजीभाकरीची न्याहारी होते.

४ इथले पुजारी मराठे आहेत.

५ यात देवाकडून आधी 'कोहळा' घ्यायचा असतो आणि तो मिळाला तरच आपला 'आवळा' द्यायचा असतो.

६ मी तुझ्यादारी कुंकवाचा सडा घालीन.

७ 'तुजला ही शिकारच साधून देत्ये'.

भाषाभ्यास

प्रश्न १ खालील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

नशिबाला येणे, डोळ्यात भरणे, जवळ करणे, प्रविष्ट होणे, नवस फेडणे, आवळा देऊन कोहळा काढणे, वाणवसा करणे, कौल घेणे, संचार होणे, विडा उचलणे, शिकार साधणे.

प्रश्न २ या उता-याची भाषा संस्कृतप्रचुर आहे खालील संस्कृत शब्दांसाठी सोपे मराठी शब्द लिहा.

श्रांत, मार्ग क्रमून, मंदिरप्राकार, क्षेत्रोपाध्ये, प्रविष्ट होणे, रौप्यमुदा, अष्टभुजा, उपनाव, श्रीमुख, करचरण, शुध्दोदक, मस्तकी, आपत्प्रसंगी, आर्त, अर्थार्थी, प्रथा, चिरंतन, खड्ग, उदभवले, काया-वाचा, अरिष्ट, भविष्यार्थ, चरणांशी, प्राशन करणे, भाळी.

प्रश्न ३ नंतर शुध्दोदकाने स्नान घालतात. भाळी चंदनाचा मळवट भरतात. मस्तकी हळदकुंकू वहातात. हदयावर बुक्का उधळतात. या वाक्यांमधली क्रियापदे लक्षात ध्या. विशिष्ट नामांसाठी (अधोरेखित) विशिष्ट क्रियापदच वापरायचे हे लक्षात ठेवा.

प्रश्न ४ 'तुजला माझा वर आहे. तुजला ही शिकारच साधून देत्ये' या वाक्यांतली अधोरेखित रूपे भाषेचे जुने वळण दाखवतात. त्याजागी प्रमाण मराठीत अनुक्रमे तुला, तुला, देते ही रूपे येतील.

प्रश्न ५ आम्ही देवीचे आवार जवळ करू लागलो या वाक्यात जवळ कर याचा अर्थ 'जवळ जाऊ लागलो' असा आहे.

दुसरा थोडासा लाक्षणिक अर्थही या वाक्प्रचाराला आहे.

उदा: 'त्यांनी फक्त व्यसनी आणि तोंडपुज्या लोकांना जवळ केले' म्हणजे आपलेसे केले, मित्र मानले.या दोन्ही अर्थाची तुम्ही वाक्ये बनवा.

प्रश्न ६ जगदंबेकडे स्त्रियांनी अक्षयचुडे मागायचे नाहीत, तर दुस-या कोणाकडे मागायचे ? ही रचना लक्षात घ्या एरवादी गोष्ट विशिष्ट बाबतीत अनिवार्य आहे असे व्यक्त करणारी रचना आहे उदाः

१ लोकांनी न्यायालायात दाद मागायची नाही तर कुठे?

२ मुलांनी आईवडलांजवळ हट्ट करायचा नाही तर दुस-या कुणाकडे?

३ भावानी भावाला मदत करायची नाही तर कोणाला? अशी तुम्ही ५ वाक्ये बनवा.

प्रश्न ७ 'घरचा आणि घराचा' यातला फरक तुम्ही माध्यमिक अभ्यासक्रमात समजून घेतला आहे.आता इथे 'पोटचे मूल' हे शब्द पहा.

या विशेषणाप्रमाणे पाठचा भाऊ, हातचा मळ, पायीची वहाण, गळचा फास, तोंडच्या गोष्टी, तोंडचा घास, हातचा स्वैपाक, हातचं काकण या वाक्प्रचारांचाही शरीराच्या अवयवांशी संबंध आहे. त्यांचा तुम्ही अर्थ समजून घेऊन वाक्यात उपयोग करा.

पूरक लेखन/वाचन

१ पुण्यापासून देहू आणि आळंदी ही तीर्थक्षेत्रे जवळ आहेत. त्यांना भेट देऊन त्याचे असेच प्रवास/ क्षेत्रवर्णन लिहा.

२ तुमच्या प्रांतात कोणत्या देवीचं ठिकाण जास्त प्रसिध्द आहे, त्याची माहिती द्या.

३ 'तीर्थरूप महाराष्ट्र' मधून दुस-या एखाद्या तीर्थाची माहिती वाचून सारांशरूपात लिहून काढा.

धडा अठरावा

साकाळचा अभ्यास

लेखक - श्री. राम गणेश गडकरी
(जन्म १८८५ - मुत्यू १९१९)

परिचय

राम गणेश गडकरी हे मराठीतले सुप्रसिद्ध नाटककार, कवी आणि विनोदी लेखक 'गोविंदाग्रज' या नावाने त्यांनी लिहिलेल्या कविता 'वाग्वैजयंती' या संग्रहात आहेत. 'बाळकराम' हे नाव घेऊन त्यांनी विनोदी लेखन केले. 'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव', 'भावबंधन', 'एकच प्याला' व अपूर्ण 'राजसंन्यास' या त्यांच्या नाटकांमुळेमात्र ते प्रतिभाशाली नाटककार म्हणून ओळखले जातात.

गडक-यांची कल्पनाशक्ती विलक्षण होती. भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. त्यांचे लेखन उत्कट भावना, आलंकारिक भाषा अणि भव्य कल्पनांनी नटलेले दिसते. त्यांच्या नाटकांचा, विशेषतः 'एकच प्याला' या शोकांतिकेचा मराठी मनावर फार प्रभाव आहे. 'प्रेमसंन्यास', 'भावबंधन', 'एकच प्याला' या नाटकांमधून जसा त्यांनी अनेक सामजिक प्रश्नां स्पर्श केला तसेच 'बाळकराम' नावाने लिहिलेल्या 'रिकामपणाची कामगिरी' त समाजातल्या अनेक अपप्रवृत्तींचा उपहास केला. त्यांच्या आलंकारिक, कल्पनारम्य भाषेची मोहिनी मराठी मनावर फार प्रभावी ठरली आहे.

सकाळचा अभ्यास

[दामू कोशातून शब्द काढीत आहे; एका बाजूला दिनू भूगोल घोकीत आहे; प्रत्येकाजवळ पुस्तके, वह्या पडल्या आहेत. जवळच कपडे पडले आहेत]

दामू - (डिक्शनरीत पहातो) एफ ए बी एल ई, एफ ए --

दिनू - (मोठयाने) खानदेश जिल्हयातील तालुके --- (तीनदा घोकतो) धुळे, अंमळनेर, एरंडोल, पाचोरे. धुळे, अंमळनेर, एरंडोल -----

दामू - एफ ए बी एल ई फेबल कल्पित गोष्ट. (लिहू - लागतो)

दिनू - धुळे, अंमळनेर --

दामू - दिन्या, हळू घोक ना रे! माझा शब्द चुकला की इकडे! हे बघ फेबल म्हणजे कल्पित नेर झाले आहे. हळू घोक (शब्द पाहू लागतो) बी ई ए यू -----

दिनू - धुळे, अंमळनेर, एरंडोल ----

दामू - लागलास का पुन्हा ओरडायला? (वेडावून) धुळे, अंमळनेर - मोठा आला आहे. भूगोल करणारा-हळू घोक.

दिनू - अन तू मोठा आला आहेस शब्द काढणारा! नाही घोकीत हळू जा! तुला वाटेल तर माजघरात जाऊन बस. धुळे, अंमळनेर ---

दामू - ऐकत नाहीस? नाही? देऊ का भडकावून एक श्रीमुखात?

दिनू - का रे दादा त्रास देतोस? ए आईग, हा दादा बघ मला उगीच मारतो आहे. धुळे - अंमळनेर ---

दामू - मारतो का रे? नाहीग आई. हाच मोठमोठयाने ओरडतो आहे सारखा.अन अभ्यास करू देत नाही. आता ओरड तर खरा की सांगतो कसे काय आहे ते. बी ई ए यू [डिक्शनरी चाळू लागतो]

दिनू - ओरडेन ओरडेन जा! तुला भिईन की काय? धुळे अंमळनेर -----

दामू - दम खा! काढतोच तुझे धुळे अंमळनेर [त्याला मारायला धावून जातो. तो पळू लागतो.]

दिनू - आई, बघ ग हा दादा ! धुळे अंमळनेर - (घरात पळून जातो)

दामू - पळून गेलास, नाहीतर दाखवला असता स्वारीला इंगा! धुळे अंमळनेर करतो मोठा! येऊ दे आता बाहेर बच्चंजीला! म्हणजे काढतो सारा खानदेश जिल्हा! (जागेवर येऊन बसताना पेन्सिलीवर पाय पडतो) अरे, अरे, अरे! गडबडीत पेन्सील मोडून दोन तुकडे झाले तिचे, पण हे बरे झाले! एक तुकडा हरवला तर दुसरा आहेच! अन आज पाटीवर शुद्धलेखन काढायचे आहे कुठे? हे एवढे शब्द काढले की झाले काम! अबब! केवढा लांबलचक शब्द हा! बी इ ए यू
[दिनू येतो]

दिनू - दादा, तुला आईने --

दामू - आलास का पुन्हा त्रास द्यायला? बी ई ए यू ---

दिनू - तुला आईनं चहा घ्यायला बोलावलं आहे. यायचं असेल तर ये, नाहीतर नको यऊ. [दिनू जातो]

दामू - अरे चोरा! नको येऊ काय? म्हणजे एकटयालाच चहा प्यायला! मग काढीन मी शब्द! [दामू जातो. जगू दुसरीकडून येतो]

जगू - (धापा टाकीत) दादा - दादा, अरे ती बघ तिकडे - (पाहून) अरेच्चा! दादा कुठं गेला? इथं तर दादाही नाही आणि दिनूही नाही. हां - हेच ते चित्रांचे पुस्तक! (रीडर उचलतो) कशी छान चित्रे आहेत रंगीबेरंगी! बरं सापडलं आहे आयतंच! शेजारच्या रघूला दाखवतो आता नेऊन ! असं लपवून न्यावं, नाहीतर दादा पाहील! आलाच दिनू!
[जगू दामूचे रीडर घेऊन जातो. दिनू येतो]

दिनू - धुळे, अंमळनेर - पुढे काय बरे? किती तालुके आहेत हे? धुळे - अंमळनेर - पण पुढे कोणता तालुका? [भूगोलात पहातो. दामू येतो]

दामू - अरे!माझं रीडर काय झालं इथलं? आता होतं की इथं? दिन्या, रामोशा, एवढयासाठी आधी धावत आलास काय? तरीच, आण माझं रीडर देतोस की नाही?

दिनू - अरे वा! मला रे काय ठाऊक तुझं रीडर नि फिडर! मी आपला भूगोल पाठ करत बसलो आहे.मी कशाला घेऊ रीडर?

दामू - भूगोल पाठ करत होतास नाही का? कसा देत नाहीस रीडर तेच पहातो. [त्याच्याकडे धावून जातो]

दिनू - (मोठयाने ओरडून) कारे मारतोस दादा? आई --

दामू - दिन्या, हात तरी लावला आहे का तुला? नाही ग आई, दिन्या उगीच कांगावा करतो आहे. यानं माझं रीडर लपवून ठेवलं आहे, अन आता देत नाही.

दिनू - मी शपथ घेईन! पाहिलं सुद्धा नाही तुझं रीडर मी! तूच कुठंतरी टाकून दिलं असशील आंणि मला विचारतो आहेस!

दामू - कुठंतरी टाकून दिलं! आता इथं नव्हतं का? तुझ्यादेखत तर शब्द काढत होतो.

दिनू - मी नव्हतो पहात तुझ्याकडे. मी माझा भूगोल करीत होतो.

दामू - मग झालं काय बुवा रीडर? आता शब्द कसे काढायचे?

दिनू - अरे, त्या गादीबिदीत असेल! रात्री तू पडल्या पडल्या वाचीत नव्हतास का?

दामू - खरं रे खरं! चल आपण या गाद्या उलगडून पाहू.

दिनू - चल. धुळे, अंमळनेर, एरंडोल, पाचोरे.

दामू - तो शब्दसुध्दा मी विसरलो. हा बी ई ए यू - [दोघेही बिछाने उलगडतात]

दामू - बी इ ए यू - बिछान्यात तर नाही कुठे

दिनू - मग गुंडाळून ठेवू हे बिछाने? धुळे, अंमळनेर, एरंडोल [बिछाने घाईने गुंडाळून ठेवतात त्यातच दामूचे कपडे आणि टोपीही गुंडाळून ठेवतात. दोघेही आपापल्या जागी बसतात]

दामू - बी ई ए यू - आता शब्द कसे करावे बुवा?

दिनू - (हसत) भलं झालं; आता एका माणसाला मार बसणार. धुळे, अंमळनेर ---

दामू - हसतोस काय? तूच लपवलं आहेस पुस्तक! आण पाहू तुझी पिशवी? मला तुझा झाडा घ्यायचा आहे.

दिनू - तर - तर! आणत नाही जा.

दामू - आणत नाहीस? बघू या बरं गंमत! आण पिशवी.
[त्याच्या अंगावर धावून जातो. तोच पाय पडून दिनूची पाटी फुटते]

दिनू - फोडलीस का माझी पाटी? आता आईला सांगतो.

दामू - सांग सांग जा! मुद्दाम पाय दिला का पाटीवर? तूच मुद्दाम पाटी वाटेत ठेवलीस. मीच सांगतो आईला, की या दिन्यानं माझं रीडर लपवलं आहे! आण इकडे ती पिशवी. [पिशवीची ओढाताण होते. पिशवीचा बंद तुटतो]

दिनू - धुळे, अंमळनेर. सोड पिशवी, सोड ना रे! धुळे --

दामू - रीडर दे. नाही सोडत पिशवी!

दिनू - धुळे अंमळनेर - सोड, पिशवी सोड (जोराने पिशवी ओढतो. बंद तुटतो. दिनू पडतो) तोडलास का बंद पिशवीचा? आता आईला सांगतो.

दामू - मी तोडला का बंद? मी नुसती पिशवी धरून ठेवली ह।ती. तूच जोराने ओढलीस अन माझं नाव घेतोस का?

दिनू - येऊ दे बाबांना आता! म्हणजे चामडीच लोळवायला सांगतो. धुळे, अंमळनेर --- (दोघेही आपापल्या जागेवर बसतात)

दामू - कोणता तो मोठा शब्द? बी ई ए यू -- पण आता शब्द करायचे कसे? रीडरच नाही मुळी!

दिनू - (वेडावीत) टाईमटेबल गेलं रीडरमधे! ठेवावं कशाला रीडरमधे? घ्या आता छडी लागे छमछम ---

दामू - दिन्या, तुलारे कोणी चोमडेपणा सांगितला आहे? जाऊदे माझं टाईमटेबल गेलं तर.

दिनू - तुला बोलतो आहे का मी?आम्ही आपले मनाशी बोलतो.

दामू - असं आहे का? दाखवू का एकदा इंगा?

दिनू - हो हो दाखव! धुळे, अंमळनेर -- आईला सांगीन. टाईमटेबल गेलं रीडरमधे --

दामू - शेजारच्या गणूला अभ्यास विचारून येतो [जाऊ लागतो]

दिनू - मी बाबांना सांगीन, की एक मनुष्य अभ्यास टाकून खेळायला गेला होता.

दामू - सांग जा - खेळायला जातो आहे का मी? [जातो]

दिनू - गेला की दादा बाहेर! अरेरे! माझं टाईमटेबल हरवलं असतं तर मी गेलो नसतो असा? धुळे, अंमळनेर.

-'संपूर्ण बाळकराम'

शब्दार्थ

घोकणे	-	पाठ करण्यासाठी मोठयाने म्हणणे
माजघर	-	घराची पुढची दर्शनी खोली ओलांडल्यावर येणारी मधली खोली. 'मधली' खोली,
दम खा	-	थांब. विसावा घे.
आयतं	-	तयार
कांगावा	-	खोटा आरडाओरडा
देखत	-	समोर. डोळ्यांसमोर.
झाडा	-	तलाशी, तपासणी
चामडी लोळवणे	-	खूप मार देणे.
चोमडेपणा	-	दुस-याच्या कामात अनावश्यक लुडबूड. एकाची गोष्ट दुस-याला सांगणे. चहाडी.
इंगा दाखवणे	-	शक्ती दाखवणे. बळाची जाणीव करून देणे. इंगा म्हणजे कातडे घोटून नरम करायचे चांभाराचे हत्यार. म्हणून इंगा दाखवणे याचा अर्थ दुस-याला सरळ करणे, नरम आणणे असा होतो.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ दामू, दिनू आणि जगू या भावंडांत लहानमोठे कोण आहे? कशावरून?

२ दामू आणि दिनूचे भांडण कशावरून सुरू होते?

३ सकाळच्या अभ्यासात कोणते व्यत्यय येतात? का?

४ मुलांच्या अभ्यासाचे विषय कोणते होते?

५ दिनू आणि दामूचा किती अभ्यास झाला?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा

१ पळून गेलास, नाहीतर दाखवला असता स्वारीला इंगा!

२ रामोशा, एवढयासाठी आधी धावत आलास काय?

३ नाही ग आई, दिन्या उगीचं कांगावा करतो आहे.

४ तूच मुद्दाम पाटी वाटेत ठेवलीस.

५ मी बाबांना सांगीन, की एक मनुष्य अभ्यास टाकून खेळायला गेला होता.

६ माझं टाईमटेबल हरवलं असतं तर मी गेलो नसतो असा?

भाषाभ्यास

प्रश्न १ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

श्रीमुखात भडकावून देणे, इंगा दाखवणे, कांगावा करणे.

झाडा घेणे, नाव घेणे, चामडी लोळवणे.

प्रश्न २ दिन्या हळू घोकनारे! - घोक + ना + रे आज्ञार्थी रूपापुढे ना जोडल्याने अधिक विनंतीवजा रचना होते.

उदाः- या - याना बस - बसना त्याला बसनारे किंवा स्त्री असल्यास येनाग लावले की त्याविनंतीला अनौपचारिकता येते, आग्रह येतो.

उदाः- आई लाडू दे - आई लाडू देना - लाडू देनाग अशी एकवचनात आणि अनेकवचनात ५ ५ वाक्ये बनवा. अनेक वचनासाठी 'हो' वापरा.

प्रश्न ३ मोठा आला आहे भूगोल करणारा! उपहास व्यक्त करणारी वाक्यरचना अर्थ - भूगोल करण्याची आजिबात कुवत नसलेला!

उदाः मोठे आले आहेत गावजेवण देणारे!

मोठी आली आहे पुरणपोळ्या करणारी!

अशी तुम्ही ५ स्वतंत्र वाक्ये बनवा.

प्रश्न ४ पडल्या पडल्या - पडलेल्या स्थितीत, पडलेला असताना याप्रमाणे बसल्या बसल्या, झोपल्या झोपल्या, उभे राहिल्या राहिल्या इ. स्थितीप्रमाणे या रचनेचा दुसराही अर्थ होतो. तो म्हणजे एखादी कृती केल्या बरोबर

उदाः- आल्या आल्या - आल्याबरोबर. येताच. उठल्याउठल्या -उठल्याबरोबर.

दोन्ही प्रकारची वाक्ये पाहून त्यांतला फरक लक्षात घ्या.

अ) १ शांताबाईंनी बसल्या बसल्या स्वैपाकाची सर्व तयारी करून दिली.

२ रामभाऊ शेताच्या बांधावर उभे राहिल्या राहिल्या सगळीकडे लक्ष ठेवतात.

आ) १ आज उठल्याउठल्या एक चांगली बातमी ऐकली.

२ वर्गात आल्या आल्या शिक्षकांनी प्रश्न विचारले.

तुम्ही दोन्ही अंर्थाची स्वतंत्र वाक्ये बनवा.

प्रश्न ५ ज्यांचा अर्थ साध्या वाक्यात नकारार्थी होतो अशी 'प्रश्नार्थक वाक्ये पहा

१ आज पाटीवर शुद्धलेखन काढायचे आहे कुठे?

२ तुला भिईन की काय?

३ मला काय ठाऊक तुझं रीडर नि फीडर?

४ हात तरी लावला आहे का तुला?

अशी उता-यातली आणखी वाक्ये शोधून काढा आणि ती दोन्ही पध्दतींनी लिहून पहा.

प्रश्न ६ पुढील वाक्यांतील शब्दांचा क्रम बदलून साधी वाक्ये बनवा.

उदाः लागलास का पुन्हा ओरडायला ! - पुन्हा ओरडायला लागलास का?

१ नाही घोकीत हळू जा !

२ देऊ का भडकावून एक श्रीमुखात?
३ आलास का पुन्हा त्रास द्यायला!
४ पाहिलंसुद्धा नाही मी तुझं रीडर!
५ तोडलास का बंद पिशवीचा?

पूरक लेखन/वाचन

१ तुम्ही या वयात मराठी भाषा शिकताहात. वसतिगृहात सिंधी/गुजराती प्रशिक्षणार्थ्यांबरोबर तुम्ही अभ्यास करताना घडलेला संवाद लिहा.

२ दोन मुली बाहुलीशी खेळताहेत अशी कल्पना करून संवाद लिहा.

३ 'सकाळचा अभ्यास' पूर्ण वाचा. पुढे तुमच्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवून, हे नाटक बसवून शाळेत सादर करा.

धडा १६ वा

महाराष्ट्राचे मन

लेखक - श्री. विठ्ठल दत्त घाटे
(जन्म १८९५ - मृत्यू १९७७)

परिचय

श्री. वि. द. घाटे हे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि साहित्यिक. 'नाटयरूप महाराष्ट्र', 'नाना देशातील नानालोक', 'पांढरे केस हिरवी मने', 'काही म्हातारे एक म्हातारी', 'मनोगते', 'विचार विलसिते' इत्यादी त्यांची लोकप्रिय पुस्तके. उत्कृष्ट व्यक्तिचित्रे, दिलखुलास ,मोकळ्या शैलीतील ललित निबंध असे मुख्यतः त्यांच्या लेखनाचे स्वरूप आहे. 'दिवस असे होते' हे त्यांचे आत्मवृत्तही मराठीतल्या चांगल्या आत्मवृत्तांत गणले जाते. त्यांनी अत्र्यांच्या सहकार्याने 'नवयुग वाचनमाला' ही पाठयपुस्तकांची नवी मालिका सुरू केली. पूर्वीच्या जुनाट पाठयपुस्तकांमधे आधुनिक शैक्षणिक विचारांनी केलेला हा बदल क्रांतिकारक आणि फलदायी ठरला होता.

घाटयांच्या लेखनात अतिशय डोळस रसिकता, विचारांचा ताजेपणा, आधुनिकाचे स्वागत करणारी निरोगी मनोवृत्ती आणि मार्मिक, मोकळी लेखनशैली हे विशेष आढळतात. त्यांची भाषा व्यक्तिचित्रांना विलक्षण जिवंतपणा मिळवून देते आणि त्यांचे चिंतन गंभीर, जड न बनवता हलकेफुलके, लालित्यपूर्ण, रसपूर्ण बनवते. जीवनाकडे पहाण्याची, किंबहुना जगण्याचीच एक निर्मळ दृष्टी हा त्यांच्या सर्व लेखनाचा पाया आहे.

महाराष्ट्राचे मन

महाराष्ट्राचे स्वतःचे असे मन आहे. मी त्याला मराठी मन म्हणतो. मी लहानाचा मोठा झालो, वाढलो, तसे ते माझे मराठी मन माझ्या बरोबर वाढले आहे. ते माझ्या

रक्तक्तात, विचारात, उच्चारात आणि आचरणात व्यक्त झाले आहे. गुजरातेत गेलो, माळव्यात गेलो, वीस-वीस वर्षं राहिलो, पण हे मराठी मन माझ्या बरोबर होते. त्याने मला सोडले नाही. कसे सोडणार? माझा अहंभाव त्याच्या माध्यमातूनच प्रगट होत असतो. होय, अहंभाव - अहंकार हा मराठी मनाचा स्थायीभाव आहे. तसे म्हटले तर सा-यांच्याच मनात अहंभाव वास करीत असतो. परंतु मराठी मनाचा अहंभाव काही आगळाच आहे. तो जन्मभर पुरतो. तो मराठयांच्या जीवनाची प्रेरक शक्ती आहे.

गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे तो दगडांचा देश आहे. पूर्वी महाराष्ट्राच्या गोदाखो-याचे नावच मुळी अश्मक राष्ट्र होते. ज्वालामुखीच्या भट्टीतून खरपूस भाजून निघालेल्या या निबर दगडांचा, कातळांचा महाराष्ट्राला अभिमान आहे. या दगडांनी उभा केलेला सहयाद्री महाराष्ट्राचे कुलदैवत आहे.

महाराष्ट्र कंगाल आहे आणि त्याच्या कंगालपणाचा - सुद्धा आम्हाला अभिमान आहे. महाराष्ट्राची जमीन सुपीक नाही. भूकंपांच्या एकामागून एक झालेल्या प्रचंड स्फोटांनी घडल्या गेलेल्या महाराष्ट्रभूच्या गर्भात पाणी नाही. खनिजेही नाहीत. पण या कंगाल जमिनीवर मराठयांचे प्रेम आहे, निष्ठा आहे.

मराठा ताठ मानेने चालतो. दारिद्र्याने तो लाचार झाला नाही. कोणाची नोकरी धरली तरी तो शिव्या खाणार नाही आणि लाथा तर कधीच खाणार नाही. अलाहाबादला विद्यार्थीदशेत पाहिलेले दृश्य मी विसरलो नाही. हॉलमधील ब-याच विद्यार्थ्यांचे खाजगी नोकर असत. एकेक विद्यार्थी खाटेवर पडून हुक्का ओढत असे आणि त्याचा नोकर त्याचे पाय रगडी. नोकराची काही चूक झाल्यास त्याला लाथ बसे आणि ती मामुली शिक्षा असे. 'अबे ए लवंडे' ही गडयाला मारायची मामुली हाक असे. ही अशी किळस वाटण्याइतकी लाचारी महाराष्ट्रात सापडणार नाही. महाराष्ट्रात लाथा मारणारे धनीही नाहीत आणि खाणारे चाकरही नाहीत.

महाराष्ट्राला पैशाचा लोभ नाही. पैशामागे लागण्याची हाव नाही. पैसा मिळाला तर अर्थात तो खिशात ठेवील, टाकणार नाही. पण तो मिळवण्यासाठी जिवाचे रान करणार नाही. खरे म्हणजे पैसा कमावायची महाराष्ट्रापाशी अक्कल नाही.

मराठे गोडबोले नाहीत. त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात एकप्रकारचा रोखठोकपणा आणि रांगडेपणा आहे. ते संभाषणात फटकळ असतात. उत्तराला प्रत्युत्तर दिल्याखेरीज त्यांना राहवत नाही.समोरच्या माणसाचे म्हणणे त्याला पटले नाही तर गप्प बसणे किंवा मिळते घेणे त्यांच्या आईने त्यांना शिकवले नाही. साहजिकच मराठा बोलण्यात हमरीतुमरीवर येतो यात नवल नाही. फटकळपणा आम्हाला प्रांजळपणा वाटतो आणि रोखठोकपणा हा आम्ही प्रामाणिकपणा समजतो.

उज्ज्वल इतिहास असणे ही नशिबाची गोष्ट आहे. हे नशीब महाराष्ट्राच्या वाट्याला पुरेमाप आले आहे. मराठयांचा इतिहास अभिमान बाळगण्यासारखा आहे. महाराष्ट्राच्या रणांगणावर जेथे मराठयांचे रक्त सांडले, तेथेच ब्राहमणांचे आणि परभांचेही सांडले. या सांडलेल्या रक्ताने महाराष्ट्र समाजाला एकजीव केले आहे; ताठर बनवले आहे. इतर काही प्रदेशांना म्हणण्यासारखा इतिहास नाही. मराठयांनी मोगलांना खडे चारले आणि स्वराज्य स्थापिले. इतर प्रांतांनी इस्लामी सत्तेशी मिळते घेतले. ते तिच्याशी बरेचसे समरस झाले. त्यांनी मोगलांचे स्वामित्व पत्करले. आता मोगल गेले त्यांच्यामागोमाग इंग्रजही गेले, परंतु रुजलेले पूर्वग्रह शिल्लक राहिले आहेत. आमच्या मनात आणि इतरांच्या सुद्धा. इतिहास उरी बाळगायचा असतो तो त्याच्यापासून धडे शिकण्याकरिता. पूर्वी चुका झाल्या त्या आता होऊ नयेत म्हणून. यासाठी आम्ही मराठयांनी आपल्या खांद्यावरचे भूतकाळाचे ओझे थोडे कमी केले पाहिजे.

कलाभिरची सौंदर्यदृष्टी महाराष्ट्रात नाही, असे मी म्हणणार नाही. परंतु हे गुणधर्म महाराष्ट्राच्या जीवनात आणि आचरणात प्रतिबिंबित झालेले मला दिसत नाहीत. महाराष्ट्राच्या पोषाखातही शान नाही. बाराबंदी हा महाराष्ट्राचा विशेष दिसतो. गेल्या शतकातले चाळिशी उलटण्यापूर्वीच म्हातारे दिसणारे, भले मोठे पागोटे व भल्या मोठया

मिशा धारण करणारे विष्णुशास्त्री, आगरकर इत्यादिकांची चित्रे, पाहिली म्हणजे खेद वाटतो आणि या भल्या माणसांना जीवनकला गावली होती का असा संशय येतो. पर तारुण्यात म्हातारे कपडे घालणारांची मने ही अकली म्हातारी होतात. शास्त्रीबुवांच्या किंवा आगरकरांच्या लिखाणात खिलाडूपणा दिसत नाही याला कारण त्यांच्या डोक्यावरचे ते पागोटयाचे जबरदस्त ओझे!

आमच्या भोजनात शान नाही, वैचित्र्य नाही, रुची नाही. मला वाटते, पोषाखात बाराबंदी तसे जेवणात पिठले! आमचे मराठे शतकानुशतके सागुती खातात, परंतु नि नाना प्रकारचे रुचकर पदार्थ कसे करायचे ते ते मुसलमानांपासून शिकले नाहीत. मांसाचे सारे रुचकर पदार्थ इराणी आहेत. दुस-या बाजीरावाने भोजनकलेत अभिनंदनीय प्रगती केली होती म्हणा तात पण तो ती कला आपल्याबरोबर ब्रहमावर्ती घेऊन गेला. ती मागे राहिली नाही. बाजीरावानंतरचे पुणे तेलंगी आचा-यांच्या अंमलाखाली आहे. ते पकवतील ते खावे, असा सिलसिला आहे. तीच आळवाची पातळ भाजी - ती बटाटयाची सुकी भाजी, तो पहिला, दुसरा अन तिसरा भात -- त्या अपरिहार्य जिलब्या आणि (हा हन्त हन्त) द्रोणातून हमखास घरंगळणारा तो मठ्ठा! महाराष्ट्राला काय खावे, कसे खावे हे शिकले पाहिजे !

हा असा आहे आपला महाराष्ट्र! माझा महाराष्ट्र. आणखी पुष्कळसा आहे, पण असा आहे हे खास! तो मला आवडतो. त्याचे दोषही मला आवडतात. कारण ते माझे दोष आहेत. इतकेंच नव्हे तर ते बरेचसे दोष महाराष्ट्राच्या सद्‌गुणांतूनच निघाले आहेत.

-**'मनोगते'**

शब्दार्थ

स्थायी भाव	-	कायम असणारी, सतत टिकून रहाणारी वृत्ती
आगळा	-	अलग, वेगळा.

किळस	-	घृणा, घाण पाहिवरल्या मनात निर्माण होणारी भावना (शिसारी)
रोखठोकपणा	-	स्पष्टपणा, निः संदिग्धपणा, भीड न ठेवता बोलणे
रांगडेपणा	-	ज्यात शिष्टाचाराची सफाई नाही असा - अनागर
फटकळ	-	दुस-याला काय वाटेल याचा मुळीच विचार न करता स्पष्टपणे बोलणारा माणूस.
निबर	-	जून, (कोवळा नसलेला)
हमरीतुमरी	-	वाद, भांडण (तू तू मैं मैं)
प्रांजळपणा	-	सरळपणा. मनात काही कपट, आतबाहेर न ठेवता बोलण्याचा स्वभाव.
पुरेमाप	-	माप पूर्ण भरून. भरपूर या अर्थी.
बाराबंदी	-	छातीवर बंद बांधायचा सदरा - अंगरखा
गावली	-	सापडली.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१ महाराष्ट्रीयांच्या जीवनात अहंकाराचे स्थान काय आहे?

२ अलाहाबादचे नोकरमालक संबंध पाहून लेखकाची प्रतिक्रिया काय झाली?

३ मराठी लोकांच्या बोलण्याचे विशेष कोणते? इतरांना दोष वाटेल असे त्यात काय असते?

४ इतिहासाबाबत महाराष्ट्राचे वेगळेपण काय आहे? हे भूतकाळाचे ओझे कमी करावे असे लेखक का म्हणतो?

५ कलेची परंपरा असूनही मराठयांच्या जीवनात कलाभिरुची नाही -- स्पष्ट करा.

६ लेखकाने गेल्या पिढीतल्या लेखकांच्या लिखाणाचा संबंध त्यांच्या पोषाखाशी कसा जोडला आहे?

७ इराणी जेवणाशी मराठी जेवणाची तुलना करून लेखकाने काय दाखवले आहे?

प्रश्न २ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ अहंभाव, अहंकार हा मराठी मनाचा स्थायीभाव आहे.

२ त्याच्या कंगालपणाचासुद्धा आम्हाला अभिमान आहे.

३ (इथे) लाथा मारणारे धनीही नाहीत आणि खाणारे चाकरही नाहीत.

४ पैसा कमवायची महाराष्ट्रापाशी अक्कल नाही.

५ फटकळपणा आम्हाला प्रांजळपणा वाटतो आणि रोखठोकपणा हा आम्ही प्रामाणिकपणा समजतो.

६ आम्ही आपल्या खांद्यावरचे भूतकाळाचे ओझे थोडे कमी केले पाहिजे.

७ भर तारुण्यात म्हातारे कपडे घालणारांची मनेही अकाली म्हातारी होतात.

८ पोषाखात बाराबंदी तसे जेवणात पिठले!

९ बरेचसे दोष महाराष्ट्राच्या सद्‌गुणातूनच निघाले आहेत.

भाषाभ्यास

प्रश्न १ खालील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

स्थायीभाव, वास करणे, ताठ मानेने, जिवाचे रान करणे, मिळते घेणे, हमरीतुमरीवर येणे, उरी बाळगणे, लोप पावणे, शान असणे, खेद होणे.

प्रश्न २ तसे म्हटले तर-सर्वसाधारण, सर्वांबद्दल विधान करतान 'तसे म्हटले तर' जोडून पुढे वाक्य बनवतात. त्यात एखाद्या गटाबद्दल काही विशेष सांगणारी वाक्यरचना त्यापुढे येते.

उदाः- तसे म्हटले तर सर्वच भारतीय धार्मिक आहेत. पण दक्षिणी ब्राह्मण याबाबतीत फार कडक आहेत.

२ तसे म्हटले तर सा-याच कामगारांची स्थिती वाईट असते. त्यात खाणकामगारांचे जीवन धोक्याचे असते. अशी ५ स्वतंत्र वाक्ये बनवा.

प्रश्न ३ कोणाची नोकरी धरली तरी तो शिव्या खाणार नाही आणि लाथा तर कधीच खाणार नाही या वाक्यात नकाराची तीव्रता क्रमशः वाढवली आहे. उदाः-

१ कोणी आग्रह केला तरी तो सिगरेट घेणार नाही आणि दारू तर कधीच पिणार नाही.

२ ती मुलांवर रागवली तरी टाकून बोलणार नाही आणि मारणार तर कधीच नाही. याप्रमाणे पाच वाक्ये बनवा.

प्रश्न ४ उत्तराला प्रत्युत्तर दिल्याखेरीज त्यांना राहवत नाही. ते उत्तराला प्रत्युत्तर नक्की देतातच - हा अर्थ. याप्रमाणे पुढील वाक्ये बदलून लिहा.

१ विद्यार्थी गरीब शिक्षकांना त्रास देतात.

२ चित्रपटातली सासू सुनेला छळते.

३ गाडीवान बैलांना मारतो.

४ तरूण मुलं वेगात वाहनं चालवतात.

प्रश्न ५ मराठयांचा इतिहास अभिमान बाळगण्यासारखा आहे. बाळगण्यासारखा हा अर्थ व्यक्त करण्यासाठी बाळगण्याजोगा, बाळगावा असा या रचनाही वापरता येतात. पुढील वाक्ये दुस-या दोन पद्धतींनी लिहा -

१ त्यात एवढं रागवण्याजोगं काय आहे?

२ अजिंठा वेरूळ ही ठिकाणं पहाण्यासारखी आहेत.

३ आता हे घर रहावं असं उरलं नाही.

प्रश्न ६ ते पकवतील ते खावे असा सिलसिला आहे.

या वाक्यातील अधोरेखित शब्द हिंदी आहेत. घाटे इंदूर ग्वाल्हेरला राहिले होते त्याचा हा परिणाम आहे.

सामान्यतः मराठीत अशी रचना होत नाही. आता दूरदर्शनमुळेही योगदान, कार्यक्रम संपन्न झाला, पुस्तकाचे विमोचन असे हिंदी शब्द मराठीत येत आहेत.

प्रश्न ७ द्रोणातून हमखास घरंगळणारा तो मठ्ठा! होकाराला जोर येण्यासाठी 'हमखास' हा शब्द वापरतात.

उदा:- नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला मनीषा हमखास दिसणारच. टी. व्ही. वर चांगला सिनेमा असला की वीज हमखास जाणारचा ! हीच वाक्ये 'अजिबात' हा नकारार्थी वाक्यातला शब्द वापरून पुन्हा लिहा.

प्रश्न ८ वीस - वीस वर्षे राहिलो -- यातले दोन वेळा आलेले वीस म्हणजे चाळीस वर्षे असा अर्थ नाही.थोडी थोडकी नाहीत तर पुरी वीस वर्षं राहिलो असा अर्थ उदा:-

१ हा भाग चारचार वेळा समजावून सांगितला.

२ दहादहा हजारांची लॉटरीची तिकिटं आहेत.

पूरक लेखन/वाचन

१) मराठी लोकांबद्दल जसे घाटयांनी लिहिले आहे तसे तुमच्या प्रांतातल्या लोकांविषयी लिहा.

२) घाटयांचे 'मनोगते', 'काही म्हातारे एक म्हातारी', 'विचारविलसिते', 'पांढरे केस हिरवी मने' हे ललित निबंधसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी काही निबंध वाचून तुम्हाला आवडलेल्या निबंधाचे भाषांतर करा.

३) 'नाटयरूप महाराष्ट्र' हे घाटयांनी लहान मुलांसाठी लिहिलेले उकृष्ट पुस्तक आहे त्यातले काही उतारे लिहून घ्या आणि तुमच्या विद्यार्थ्यांकडून बसवून घेऊन शाळेत सादर करा.

४) मराठी लोकांचा तुमचा अनुभव काय आहे? घाटयांच्या विवेचनाशी तुम्ही सहमत आहात का?

पाठ विसावा

ययाति

लेखक श्री. विष्णु सखाराम खांडेकर
(जन्म १८९७ - मृत्यू १९७६)

परिचय

श्री.वि.स. तथा भाऊसाहेब खांडेकर हे ध्येयवादी शिक्षक, तत्त्वनिष्ठ पत्रकार, यशस्वी चित्रपटकथालेखक, समीक्षक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठीतले तपस्वी कादंबरीकार, कथाकार, निबंधकार. १९३० 'हृदयाची हाक' पासून 'अमृतवेल १९७१ इतका प्रदीर्घ काळ लेखन करून त्यांनी दोन पिढयांचा वाचकवर्ग संमोहित करून ठेवला होता. 'उल्का', 'हिरवा चाफा', 'क्रौंचवध', 'दोन ध्रुव' या त्यांच्या पहिल्या कादंब-या. त्यांना रूपकांची आवड आहे. ते गांधीवादाचे पुरस्कर्ते होते. 'ययाति'(१९५९) ही त्यांनी उत्तरकाळात लिहिलेली सर्वश्रेष्ठ कादंबरी. या कादंबरीला साहित्यातला सर्वोच्च पुरस्कार ज्ञानपीठ पारितोषिकाच्या रूपात प्राप्त झाला. ययातीच्या पौराणिक कथेत त्यांनी विसाव्या शतकातल्या आधुनिक भोगलोलुप माणसाचे दर्शन धडवले. एकूणच ही पुराणकथा, तिच्यातील व्यक्तिरेखा यांना त्यांच्या चिंतनाने नवे परिमाण दिले.

भोगलोलुप ययाति चक्रवर्ती राजा असूनही सम्राज्ञी देवयानीच्या क्रोधाचा बळी ठरतो. तिचा तपस्वी पिता शुक्राचार्य त्याला वृद्धत्वाचा शाप देतो. कोसळलेल्या वृद्धत्वातूनच त्याचे चिंतन पुढे जन्म घेते, ही कथा पुढील उता-यात निवडली आहे.

ययाति

मला पहाताच मंचकावर बसलेल्या देवयानीने तिरस्काराने तोंड फिरवले. शुक्राचार्य रागाने महालात येरझारा घालीत होते.

शुक्राचार्यांना प्रणाम करण्याकरता पुढे होण्याचा मी प्रयत्न केला, पण माझे पाऊल पुढे पडेना!सारा महाल माझ्याभोवती फिरू लागला. मी खाली कोसळून पडतो की काय असे मला वाटू लागले. जवळच असलेल्या भिंतीतल्या आरशाला टेकून मी कसाबसा उभा राहिलो. स्वतःला मोठया कष्टाने सावरले.

फे-या घालता घालता शुक्राचार्य एकदम थांबले; त्यांनी पाचदहा क्षण माझ्याकडे रोखून पाहिले.मग क्रुद्ध मुद्रेने ते म्हणाले, "ययाति, मी महर्षी म्हणून तुझ्याकडे आलेलो नाही. तुझा सासरा म्हणून अशा अवेळी या तुझ्या महालात मी पाऊल टाकलं आहे. तुझ्या पापात माझे पाय बुडवले आहेत. मला ओळखलंस तू?"

मी भीत भीत होकारार्थी मान हलवली.

उपहासाने हसत शुक्राचार्य उद्‌गारले, ''मद्यपानानं तुझं डोकं कदाचित ठिकाणावर नसेल! म्हणून मी कोण आहे हे तुला पुन्हा सांगतो. मी महर्षी शुक्राचार्य आहे. ज्यानं संजीवनी विद्या संपादन करून देवांना 'त्राहि भगवन्' करून सोडलं, तो राक्षसांचा अजिंक्य गुरू शुक्राचार्य तुझ्यापुढं उभा आहे! ज्यानं संजीवनीसारखीच दुसरी अद्‌भुत विद्या तपश्चर्येनं पुन्हा संपादन केली आहे, तो देवयानीचा पिता तुझ्यापुढं उभा आहे. इतक्या वर्षांनी आपल्या लाडक्या लेकीचं संसारसुख पहायला मी इथं आलो; पण मी दुर्दैवी ठरलो. माझी मुलगी दुःखसागरात आकंठ बुडालेली पहाण्याचं दुर्भाग्य माझ्या कपाळी आलं. मर्कटा, मी पृथ्वीमोलाचं रत्न मोठया विश्वासानं तुझ्या स्वाधीन केलं अन ती गारगोटी आहे असं मानून तू ते दूर भिरकावून दिलंस?"

शुक्राचार्यांचा रुद्रावतार पाहून माझी गाळण उडाली. काय बोलावं ते सुचेना! तोंडातून शब्द फुटेना!शेवटी सारा धीर एकवटून मी म्हणालो, "महाराज, मी अपराधी आहे आपला. शतशः अपराधी आहे; पण दुर्दैवानं जे घडलं त्यात देवयानीचाही दोष आहे!"

माझ्या तोंडातून हे शब्द बाहेर पडताच तोंड फिरवून मंचकावर बसलेली देवयानी चवताळून उठली आणि अधिक्षेपाने माझ्याकडे पहात म्हणाली, "बाबा, इथं पावलोपावली माझा अपमान कसा केला जातो हे डोळ्यांनी पहाण्यासाठी का तुम्ही मला इथं घेऊन आला आहात? तरी मी तुम्हाला सांगत होते, उद्या सकाळी अशोकवनाकडं जाऊया म्हणून! तुम्ही प्रवासानं शिणला आहात. चला, राजवाडयावर परत चला. व्यसनात बुडालेली माणसं पिशाच्चापेक्षाही भयंकर असतात. रात्री त्यांचं तोंडसुद्धा पाहू नये!"

माझा संताप अनावर झाला. तोंडातून शब्द निघून गेले, "आणि अहंकारात बुडालेली माणसं?"

देवयानी अधिकच संतापली. शुक्राचार्यांजवळ जाऊन त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत ती म्हणाली, "बाबा, तिकडं यदु मोठया थाटानं नगरात प्रवेश करत असेल, नि इकडे तुम्ही दारूत आणि बायकांत बुडालेल्या एका --"

शुक्राचार्यांनी तिचा हात झिडकारून टाकला. ते रागाने म्हणाले, "देवयानी; तू माझं सर्वस्व आहेस पण तू मूर्ख आहेस. वेडी आहेस. कुठल्या वेळी कसं वागावं हे तुला कळत नाही. मागे कचाला जिवंत करण्याची गळ घालून तू माझी संजीवनी विद्या वाया घालवलीस. इतक्या वर्षांनी मी इथं आलो; पण मी आल्याबरोबर तुझं पतिपुराण सुरू झालं. आता तुझं अवाक्षरही मी ऐकणार नाही. तुझ्या अठरा वर्षांच्या दुःखाचा सोक्षमोक्ष या क्षणी झाला पाहिजे. जावई म्हणून मी ययातीची गय करणार नाही. याला जन्मभर आठवण राहील अशी शिक्षा --

देवयानी पुन्हा त्यांच्याजवळ जाऊन गोड वाणीने सांगू लागली, "यदूला सिंहासनावर बसवलं म्हणजे यांचे डोळे चांगले उघडतील. आता दुस-या कसल्याही संसारसुखाची माझी इच्छा राहिलेली नाही. सिंहासनावर बसलेल्या यदूला एकदा डोळे भरून पाहीन आणि तुम्ही जिथं तपाला बसला असाल, तिथं तुमची सेवा करायला येईन".

तिचे हे नाटक पाहून माझ्या अंगाचा तिळपापड झाला मला राज्याचा लोभ नव्हता! पण माझी संमती न घेता यदूला सिंहासनावर बसवून देवयानी माझा अपमान करू पहात होती. तो मला असहय झाला. मी तीव्र स्वराने उद्‌गारलो, "मी राजा आहे. माझ्या संमतीवाचून यदूला अभिषेक कसा होईल?" शुक्राचार्य शांतपणे म्हणाले, "राजा, तुझा अधिकार मला मान्य आहे. पण तुला एक साधा प्रश्न विचारायचा आहे मला. राजा म्हणून तुला जसा काही अधिकार आहे, तसा देवयानीला पत्नी म्हणून आहे की नाही? तिचं पाणिग्रहण करताना 'नातिचरामि' अशी शपथ तू घेतली होतीस ना?''

'होय महाराज'.

'तिचं तू पालन केलंस?'

'महर्षींनी क्षमा करावी. माझ्या हातून तिचं पालन झालं नाही'.

'का?'

'तो माझ्या यौवनाचा दोष होता! मी मोहाला बळी पडलो.'

'यौवनाचा दोष?तू तरुण होतास आणि देवयानी काय म्हातारी झाली होती? तू मोहाला बळी पडलास!परमेश्वरानं काय तुझ्यासाठीच या जगात मोह निर्माण केले आहेत? मूर्खा, तुझ्यापेक्षा माझ्यासारख्या तपस्व्याभोवती पसरलेलं मोहाचं जाळं अधिक सूक्ष्म आणि बळकट असतं. त्याच्या तपश्चर्येचा भंग व्हावा म्हणून इंद्र अप्सरा पाठवतो. पण या शुक्रासारखा तपस्वी असल्या मोहाकडं ढुंकूनसुद्धा पहात नाही. क्षुद्र मोहांना क्षुद्र माणसंच बळी पडतात!"

'मला क्षमा करा महाराज, मी अपराधी आहे. शतशः अपराधी आहे'.

'क्षमा माणसाच्या पहिल्या अपराधासाठी असते. निर्ढावलेला गुन्हेगार साध्या शिक्षेनं सुधारत नाही.'

बोलता बोलता ते विचारमग्न झाले. गुरगुरू लागलेल्या ज्वालामुखीच्या तोंडावर प्रचंड खडकाला साखळदंडाने बांधून ठेवलेल्या माणसासारखी माझी स्थिती झाली!

माझ्याकडे तिरस्काराने पहात शुक्राचार्य म्हणाले, 'राजा, देवयानीला लाथाडून तू शर्मिष्ठेला जवळ केलंस. खरं आहे ना हे?'

'देवयानीवर माझं प्रेम नव्हतं. ते शर्मिष्ठेवर होतं!' हे शब्द माझ्या जिभेवर धावत आले; पण त्यांना ओठाबाहेर पाडायचा धीर मला झाला नाही.

शुक्राचार्यांचा स्वर चढत चालला होता. काळ्याकुट्ट ढगांचा गडगडाट होत रहावा, तसे त्यांचे शब्द वाटत होते. ते रागारागाने माझ्याजवळ आले आणि म्हणाले, 'शर्मिष्ठेच्या बाबतीत जपून रहायला मी तुला सांगितलं होतं ना?'

मी होकारार्थी मान हलवली.

'माझी आज्ञा -- देवयानीच्या पित्याची आज्ञा - महर्षी शुक्राचार्यांची आज्ञा तू मोडलीस. या आज्ञाभंगाचं प्रायश्चित्त तुला भोगलंच पाहिजे'.

'पण - पण - महाराज, यौवन आंधळं असतं?'

'तुझा हा आंधळेपणा जावा एवढीच माझी इच्छा आहे. शर्मिष्ठेसारख्या दासीकडं कामुकतेनं पहाण्याची इच्छा तुझ्या डोळ्यांना पुन्हा होऊ नये म्हणून मी त्यांच्यात चांगलं अंजन घालणार आहे. यौवन आंधळं असतं! यौवनानं तुला मोहवश केलं होय ना? मग माझा तुला एवढाच शाप आहे - हे तुझं यौवन या क्षणी नष्ट हावो! भगवान महेश्वरांच्या कृपेनं लाभलेल्या नव्या विद्येचं स्मरण करून हा शुक्र एवढीच इच्छा व्यक्त करीत आहे, की माझ्यासमोर उभा असलेला हा पापी ययाति या क्षणीं जख्खड म्हातारा होवो!'

ती शापवाणी ऐकताच अंगावर वीज पडावी तशी माझी स्थिती झाली. सारे जग शून्य झाले. मन सुन्न झाले.

शेवटी धीर करून भीत भीत मी जवळच्या आरशातच माझ्या प्रतिबिंबाकडे पाहिलं. मी जे पाहिलं त्याने मला प्राणांतिक वेदना होऊ लागल्या. माझा चेहरा सुरकुत्यांनी भरून गेला होता. माझ्या डोक्यावर रुक्ष पांढरे केस पसरले होते. आरशापुढे एक गलितगात्र वृद्ध उभा होता. मृत्यू कुठे राहतो याची जणू तो दीन वाणीने चौकशी करत होता.

-**'ययाति'**

शब्दार्थ - टिपा

मंचक	-	पलंग
येरझारा	-	एका दिशेने जाणे परत तसेच मागे येणे. अस्वस्थ माणसाची कृती.
'त्राहि भगवन'	-	देवा, वाचव
आकंठ	-	गळ्यापर्यंत
मर्कट	-	माकड
गारगोटी	-	पारदर्शक पांढरा दगड.
चवताळणे	-	अतिशय संतापणे. डिवचलेली नागीण, किंवा वाघीण जशी संतापाने प्रतिहल्ला करते - तसे संतापणे
गाळण उडणे	-	भीतीने काय करावे ते न सुचणे.
गळ घालणे	-	फार आग्रहाची विनंती करणे (एखादे काम करण्यासाठी)
सोक्षमोक्ष	-	शेवट, निकाल.

गय करणे	-	सहानुभूतीने विचार करून सोडून देणे.
तिळपापड होणे	-	अतिशय रागवणे (तीळ लावलेल्या पापडाची गरम तेलात जी स्थिती होते तशी)
'नातिचरामि'	-	लग्नात नवरा 'न अतिचरामि' मी मर्यादा ओलांडून, अयोग्य वागणार नाही अशी शपथ घेतो.
निर्ढावलेला	-	गुन्हे करून तयार झालेला - भयभीती निघून गेलेला
जख्खड म्हातारा	-	जराजर्जर - फारफार म्हातारा.
गालितगात्र	-	सर्व अवयवांमधली शक्ती जाऊन ते गळून गेले आहेत असा.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ ययातीला अवेळी भेटण्याइतके शुक्राचार्य का संतापले होते?

२ शुक्राचार्यांचा अहंकार कोणत्या शब्दांमधून व्यक्त होतो?

३ ययाति आणि देवयानी यांना एकमेकांचा इतका तिरस्कार वाटण्याचे कारण काय?

४ आपल्या भोगलोलुपतेचे ययातीने कसे समर्थन केले?

५ शुक्राचार्यांनी ययातीला दिलेला शाप हीच त्याच्या अपराधाला योग्य शिक्षा कशी होती?

प्रश्न २ टिपा लिहा

१) दुखावलेली देवयानी

२) अहंकारी शुक्राचार्य

३) ययातिच्या दुर्वर्तनाची जबाबदारी अखेर कोणाची?

प्रश्न ३ खालील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ तुझ्या पापात माझे पाय बुडविले आहेत.

२ माझी मुलगी दुःखसागरात आकंठ बुडालेली पहाण्याचं दुर्भाग्य माझ्या कपाळी आलं.

३ दुर्दैवानं जे घडलं त्यात देवयानीचाही दोष आहे.

४ व्यसनात बुडालेली माणसं पिशाचापेक्षाही भयंकर असतात.

५ 'आणि अहंकारात बुडालेली?'

६ माझ्या संमतीवाचून यदूला अभिषेक कसा होईल?

७ क्षुद्र मोहांना क्षुद्र माणसंच बळी पडतात.

८ क्षमा माणसाच्या पहिल्या अपराधासाठी असते.

९ हे तुझं यौवन या क्षणी नष्ट होवो.

१० मृत्यू कुठे रहातो यांची जणू तो दीन वाणीने चौकशी करत होता.

भाषाभ्यास

प्रश्न १ पुढील वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

तोंड फिरवणे, येरझारा घालणे, रोखून पहाणे, त्राहि भगवन करून सोडणे, गाळण उडणे, चवताळून उठणे, झिडकारून टाकणे, गळ घालणे, वाया घालवणे, गय करणे, डोळे उघडणे, अंगाचा तिळपापड होणे, बळी पडणे, ढुंकूनसुद्धा न पहाणे, डोळ्यांत अंजन घालणे, अंगावर वीज पडणे, सुन्न होणे.

प्रश्न २ ही एक पौराणिक विषयावरील कादंबरी आहे म्हणून वातावरण निर्मितीसाठी भाषेत संस्कृत शब्द बरेच आहेत. खालील संस्कृत शब्दांसाठी मराठी शब्द द्या.

मंचक, क्रुद्ध, मुद्रा, संपादन करणे, पिता, आकंठ, मर्कट, अधिक्षेप, पिशाच्च,

वाणी, पाणिग्रहण, यौवन, आज्ञाभंग, स्मरण, प्राणांतिक, गलितगात्र, वृद्ध.

प्रश्न ३ संस्कृतप्रमाणेच खास मराठी शब्दांचा वापरही या भाषेत आहे पुढील शब्दांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

तिरस्कार, येरझारा, कसाबसा, संसारसुख, गारगोटी, भिरकावणे, चवताळणे, पावलोपावली, शिणणे, झिडकारणे, बळकट निर्ढावलेला, लाथाडणे, जख्खड म्हातारा, सुरकुत्या.

प्रश्न ४ सुन्न आणि शून्य हे शब्द उच्चाराप्रमाणे जरी जवळचे वाटले तरी त्याचा अर्थ भिन्न आहे. सुन्न म्हणजे बधिर, संवेदना नसलेला. शून्य - अर्थहीन, पोकळ. दोन्हींचा योग्य वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ५ विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.

अर्जिक्य, लाडका, दुर्दैवी, दुर्भाग्य, अपराधी, असहाय, मान्य, बळकट, आंधळा, होकारार्थी, कामुक.

प्रश्न ६ पतिपुराण - एखाद्या कंटाळवाण्या बोलण्याला पुराण शब्द

जोडून उपहास व्यक्त करतात. उदाः- नोकरीपुराण, सासूपुराण, सत्कारपुराण, नोकरपुराण इ. एकदोन शब्द तुम्ही तयार करून वाक्यात उपयोग करा.

पूरक लेखन/वाचन

१ या कादंबरीचे अनेक भारतीय भाषांमधे भाषांतर झाले आहे. ते भाषांतर वाचा. मूळ मराठी कादंबरीही वाचा.

२ ययातिच्या कथेवर मराठीत 'ययाति आणि देवयानी' हे वि. वा. शिवाडकरांचे (कुसुमाग्रज)नाटक आहे. तसेच गिरीश कर्नाड यांच्या

मूळ कन्नड नाटकाचे 'शर्मिष्ठा' हे भाषांतरही आहे. ही दोन्ही नाटके वाचा.

३ पौराणिक कथांवर आजच्या संदर्भात लेखन करणा-या तुमच्या भाषेतल्या लेखकांची माहिती द्या.

४ तुमच्या भाषेत ज्ञानपीठ पारितोषिक प्राप्त साहित्यकृतीचा थोडक्यात परिचय करून द्या.

कविता पहिली

अभंग १

जनाबाई
(१३ वे शतक)

परिचय

गोदातीरी खेड येथे एका शूद्रापोटी या संत कवयित्रीचा जन्म झाला. आईच्या मृत्यूनंतर पोरक्या जनीला बापाने पंढरपूरच्या दामाजीशेट या सधन शिंप्याकडे ठेवले. संत नामदेवाच्या घरी दासीची कामे करण्यात तिचा जन्म गेला. पण तिचा अधिकार संतमंडळात मुक्ताबाईच्या बरोबरीने मानला जात होता. इतर भाषांमधील संतांपेक्षा मराठी संतकवींच्या काव्याचा वेगळेपणा म्हणजे त्यांनी विठ्ठलाशी भांडणही केले आहे. जनाबाईच्या काही अभंगात ती विठ्ठलाला शिव्याही देते. इतका अकृत्रिम जिव्हाळा या संतांना वाटत होता.मोलकरणीची कष्टाची कामे करताना विठ्ठल आपल्याला हातभार लावतो अशी जवळीक तिच्या अभंगात आहे. तिचे ३५० अभंग म्हणजे उत्कृष्ट भावगीतेच आहेत. ईश्वराच्या भेटीची तळमळ, त्याच्याविषयी वाटणारा विश्वास तिने साध्या भाषेतून उत्कटपणे व्यक्त केला. तिच्या अभंगांतून स्त्रीमनाच्या भक्तीचे सुंदर दर्शन होते.

पक्षी जाय दिगंतरा । बाळकासी आणी चारा
घार हिंडते आकाशी । झाप घाली पिल्लांपासी
माता गुंतली कामासी । चित्त तिचे बाळांपाशी

वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधुनी उदरी
तैसी आम्हां विठ्ठलमाये । जनी वेळोवेळा पाहे

- **जनाबाई.**

शब्दार्थ

दिगंतरा	-	दूर, दुस-या दिशेला
झाप घालणे	-	वेगाने खाली येणे (झेपावणे)

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ विठ्ठल आपल्या भक्तांची कशी काळजी घेतो?

२ भक्त आणि विठ्ठल यांच्यातले नाते स्पष्ट करण्यासाठी जनाबाईनी कोणती उदाहरणे दिली आहेत?

३ या अभंगात जनाबाईचे स्त्रीमन कसे दिसून येते?

भाषाभ्यास

या अभंगात जुनी भाषा आणि कवितेतली रूपे यामुळे काही शब्द आजच्या मराठीपेक्षा, गद्यापेक्षा वेगळे आहेत. अशा पुढे दिलेल्या शब्दांसाठी आजचे शब्द द्या.

जाय, बाळकासी, आणी, कामासी, झाडावरी, उदरी, तैसी, माये.

पूरक लेखन/वाचन

१ जनाबाईचा 'विठू माझा लेकुरवाळा' अभंग वाचून त्याचा अर्थ लिहा.

२ महानुभाव साहित्यातील दृष्टांतपाठ या ग्रंथात 'वानरीएचा दृष्टांत' आहे. तो वाचून समजून घ्या.

३ तुमच्या भाषेतल्या संत - कवयित्रीच्या एखाद्या रचनेचा परिचय करून द्या.

४ भारतीय संतांनी निरनिराळ्या भाषांमधे रचना केली तरी त्यांचा आविष्कार ब-याच वेळा सारखा असतो. जनाबाईच्या अभंगासारखी तुमच्या भाषेत एखादी रचना असल्यास तिचा परिचय करून द्या.

अभंग २

तुकाराम
(जन्म १६०८ - मृत्यू १६४९)

परिचय

देहूच्या संपन्न वाणी कुटुंबात तुकारामाचा जन्म झाला. पण प्रपंचात एकामागून एक आलेल्या संकटांनी त्यांना ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवला. संसाराची व्यर्थता पटल्यामुळे त्यांनी चिंतनाला सुरुवात केली आणि ईश्वरी साक्षात्कारापर्यंत मार्ग आक्रमिला. नंतर सामान्य प्रापंचिकांना दुःखमुक्त करण्यासाठी उपदेश केला. तुकारामाचे पाच हजार अभंग म्हणजे त्याच्या मनाची वाटचाल आहे. त्यात आत्मशोध आहे, भक्ती आहे; तसेच समाजातल्या दंभावर आघातही आहेत. भावनेचा सच्चेपणा, तळमळ आणि भाषेचा थेटपणा यामुळे तुकारामाचे अभंग प्रत्येक मराठी माणसाच्या तोंडी जाऊन बसले. तुकारामाची कित्येक वचने मराठी लोक सुभाषितांसारखी सहज वापरत असतात. कारण त्यात अवघ्या जीवनाचे सार तितक्याच रोखठोक शब्दांत व्यक्त झाले आहे.

अभंग

मऊ मेणाहुन आम्ही विष्णुदास ।
कठिण वज्रास भेदू ऐसे ।।
मेले जित असों निजोनिया जागे ।
जो जो जे जे मागे ते ते देऊ ।।

भले तरि देऊ कासेची लंगोटी ।
नाठाळाचे काठी देऊ माथां ।।
मायबापाहुनि बहु मायावंत ।
करू घातपात शत्रूहूनि ।।
अमृत ते गोड काय आम्हांपुढे ।
विष ते बापुडे कडू किती ।।
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड
ज्याचे पुरे कोड त्याचे परी ।।

'तुकारामाची गाथा'

अभंग क्र.१८७

शब्दार्थ

नाठाळ - दुष्ट - नष्ट. न सुधारणारा.

कोड - इच्छा

स्वाधाय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ तुकारामानी या अभंगातून भक्त अथवा संतांच्या मनाचे कोणते विरोधी पैलू दाखवले आहेत?

२ मऊ मेणाहुनि आणि कठिण वज्रास भेदणा-या एखाद्या साधुपुरुषाचे उदाहरण देऊन हा विचार स्पष्ट करा.

३ 'विष ते बापुडे कडू किती' असे तुकारामांनी का म्हटले आहे?

४ 'ज्याचे पुरे कोड त्याचे परी' हा विचार स्पष्ट करा.

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ मेले जित असों निजोनिया जागे.

२ नाठाळाचे काठी देऊ माथां.

३ अमृत ते गोड काय आम्हापुढे विष ते बापुडे कडू किती.

पूरक वाचन/लेखन

प्रश्न १ वैष्णवांचे वर्णन करणारे अभंग प्रत्येक भारतीय भाषेत आहेत.

उदा:- गुजराती - वैष्णवजन तो तेणे कहिए - तुमच्या भाषेतला वैष्णवांवरचा अभंग लिहून त्याचा अर्थ मराठीत लिहा.

प्रश्न २ सामाजिक दंभावर आघात करणारा तुकारामाचा एखादा अभंग वाचून त्याचे सार मराठीत लिहा

उदा:-ऐसे कैसे झाले भोंदू.

कविता दुसरी

रानातल्या कविता

कवी.श्री. नामदेव धोंडी महानोर
(जन्म १९४२)

परिचय

ना. धों. महानोर हे अजिंठयाजवळच्या पळसखेड या खेडेगावातले शेतकरी कवी आहेत. खे- डयातल्या शेतातूनच त्यांच्या कवितेचा जन्म झाला. शेत, शेतातलं पीक, खेडयातला निसर्ग आणि त्या निसर्गाशी बांधलेलं तिथल्या माणसांचं जीवन यांची विलक्षण मनोहर चित्रं महानोरांनी आपल्या कवितांमधून रंगवली. त्यांच्या कवितांवर लोकसंगीताचा, लोककाव्याचा संस्कार आहे. महानोरांची कविता हे कवीला आपल्या शेताबद्दल वाटणारं उत्कट प्रेम आणि निसर्गसौंदर्यातली चैतन्याची वेगवेगळी रूपे यांचे शब्दरूप आहे. 'रानातल्या कविता', 'पावसाळी कविता', 'प्रार्थना दयाघना', 'वही', 'पळसखेडची गाणी', 'अजिंठा' इ. त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. रजाकार राजवटीची पार्श्वभूमी असलेली त्यांची 'गांधारी' ही ग्रामीण कादंबरीही महत्त्वपूर्ण आहे.

रानातल्या कविता

हया नभाने हया भुईला दान द्यावे
आणि हया मातीतुनी चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळयाला चांदणे लखडून जावे

हया नभाने हया भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता ऋतुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे

-'रानातल्या कविता'

शब्दार्थ

भुई	-	जमीन, शेत (भूमी पासून)
फळाला येणे	-	सफल होणे
लखडून	-	माखून, सर्व बाजूंनी लागलेले असे
कांती	-	तेज, सौंदर्य
काळीज	-	हृदय
शब्दगंधा	-	कविता.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ शेतात पीक कसं यावं असं कवीला वाटतं?

२ शेतातला जोंधळा पाहून कवीच्या मनात कोणते विचार येतात?

३ आपल्या शेताबद्दल आणि झोपडीबद्दल कवीला काय वाटते?

४ कवीने कवितेला शब्दगंधा का म्हटले आहे?

५ आपल्या कवितेचा जन्म कसा व्हावा अशी कवीची इच्छा आहे?

६ या कवितेतल्या सौंदर्यस्थळाचे मर्म वर्णन करा.

७ या कवितेतून शेतक-याला आपल्या शेताबद्दल वाटणारे प्रेम कसे व्यक्त होते?

८ कवी आणि शेतकरी या दोन्ही नात्यांनी कवी इथे निर्मितीचा आनंद कसा घेतो?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ जोंधळ्याला चांदणे लखडून जावे.

२ पाखरांशी खेळ मी मांडून गावे.

३ गुंतलेले प्राण ह्या रानात माझे.

४ मी असा आनंदुनी बेहोष होता, शब्दगंधे, तू मला बाहूंत घ्यावे.

भाषाभ्यास

प्रश्न १ समानार्थी शब्द द्या.

भुई, नभ, जोंधळा, पाखरं, काळीज, बाहू, चैतन्य, फाटकी, बेहोष, कांती.

प्रश्न २ वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

पुण्य फळाला येणे, पापणीला पूर येंणे

प्राण गुंतणे, आनंदानी बेहोष होणे.

प्रश्न ३ खालील काव्यपंक्ती साध्या वाक्यात लिहा.

गुंतलेले प्राण हया रानात माझे

फाटकी ही झोपडी काळीज माझे.

प्रश्न ४ खालील काव्यपंक्ती 'जेव्हा' वापरून गद्यात लिहा.

'मी असा आनंदुनी बेहोष होता शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे'

टिपा

१ **ऋतुगंध कांती** - पीक तयार होणे हा ऋतू सर्वात संपन्नतेचा असतो. या ऋतूत जमीन तयार पिकांनी लहरत असते. चमकदार हिरवा रंग, सोनेरी पिकं (कांती) आणि या सर्वांचा ताजा वास हवेत भरून राहिलेला असतो. त्याचा अनुभव घेताना मनाला नाचावेसे वाटते. पक्षीसुध्दा हा अनुभव घेताना खेळ मांडून गातात. तुमच्या भाषेतल्या अशा एखाद्या रचनेचे उदाहरण द्या.

२ **शब्दगंधे** - गंधित म्हणजे सुगंधी शब्दांनी बनलेली ती कविता. गद्याचे शब्द असे सुगंधी नसतात.शब्द हेच कवितेचं शरीर आहे. आणि हे शब्द सुगंधी आहेत अशी कविकल्पना. सुंदर स्त्रीच्या शरीराला अंगभूत सुगंध असतो असे मानतात. योजनगंधा किंवा अंगाला निळया कमळांचा सुगंध असलेली द्रौपदी ही प्राचीन उदाहरणे आपल्याला माहीत आहेत. कवितेचं शब्द हे शरीर आणि भाव, काव्य हा आत्मा ही कल्पना कवीने इथे मांडली आहे.

पूरक लेखन/वाचन

१ तुमच्या भाषेत कोणी शेतकरी कवी आहे का? शेतावरचं प्रेम व्यक्त करणा-या त्यांनी लिहिलेल्या एखाद्या कवितेचा परिचय करून द्या.

२ बहिणाबाईंची 'देव अजब गारोडी' ही कविताही शेतात वाढणा-या पिकावर आहे. ही कविता वाचून तिचा भावार्थ लिहा.

३ 'प्रार्थना दयाघना' या महानोरांच्या दीर्घकाव्यातला एक भाग निवडून त्याचा भावार्थ लिहा.

कविता तिसरी

संसार

कवयित्री - बहिणाबाई चौधरी
(जन्म १८८० - मृत्यू १९५१)

परिचय

खानदेशातल्या एका शेतकरी कुटुंबातली ही निरक्षर स्त्री जन्मतः कवितेचे लेणे घेऊन आली होती. आपलं माहेर, सासर, सासरमाहेरची माणसं, खेडयातली इतर माणसं हे त्यांच्या कवितांचं जग.पण गृहस्थजीवनाची वाट चालताना घरात, शेतात येणा-या अनुभवांमधून जीवनाचे दर्शन त्यांनी 'अहिराणी' या आपल्या खानदेशी बोलीत केलेल्या रचनांमधून घडवले. या काव्यात बहिणाईचे स्त्रीजीवन, शेतावरचा जीव, निसर्गाचे अचूक वर्णन, मार्मिक विनोदबुद्धी तर आहेच पण त्याहीपेक्षा जीवनातल्या अनुभवांना येणारे 'शहाणपण' अधिक महत्त्वाचे आहे. स्त्रीच्या अकृत्रिम बोलीचा गोडवा त्यांच्या भाषेत आहे.

संसार

अरे संसार संसार
जसा तावा चुल्ह्यावर

आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर!
अरे संसार संसार
खोटा कधी म्हनू नही
राउळाच्या कयसाले
लोटा कधी म्हनू नही
अरे संसार संसार
नही रडनं कुढनं
येडया, गयातला हार
म्हनू नको रे ल़ोढनं!
अरे, संसार संसार
खीरा येलावऱचा तोड
एक तोंडामधे कडू
बाकी अवघा लागे गोड
अरे, संसार संसार
म्हनू नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूल
मर्धी गोडंब्याचा ठेवा.
देखा संसार संसार

शेंग वरतून काटे
अरे, वरतून काटे
मधी चिक्ने सागरगोटे.
ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा आधार
देतो दुःखाले होकार
अन सुखाले नकार
देखा संसार संसार
दोन्ही जीवाचा सुधार
कधी नगद उधार
सुखादुःखाचा व्यापार
अरे संसार संसार
असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
त्याच्यावरती मदार

-'बहिणाबाईची गाणी'

शब्दार्थ

तावा	-	तवा
चुल्हा	-	चूल

राऊळ	-	देऊळ
लोटा	-	पाणी पिण्याचा धातूचा पेला
कुढणे	-	मनातल्या मनात दुःख करत रहाणे
लोढणे	-	गुरे रानात चरायला सोडतात तेव्हा ती दूर जाऊ नयेत म्हणून त्यांच्या गळ्यात एक लाकूड बांधतात. त्याला लोढणे म्हणतात. त्यामुळे गुरांना चालताना अडथळा येतो.
खीरा	-	काकडी. महाराष्ट्रात प्रदेशाप्रमाणे काकडीसाठी तीनही लिंगाचे शब्द सापडतात. खीरा - (पु) उत्तर महाराष्ट्र. काकडी (स्त्री) मध्य महाराष्ट्र वाळुक - (नपु) दक्षिण महाराष्ट्र तवसं (नपु) कोकण.
भीलावा	-	बिबा.
भीमफूल	-	बिब्याला आलेले गोड फळ
गोडंबा	-	गर, मगज. (काजू बदामासारख्याचे कठीण टरफल फोडून बाहेर काढलेला आतला पौष्टिक भाग)
चिक्ने	-	गुळगुळीत, सुंदर
सागरगोटे	-	दाणे, गजगे
नगद उधार	-	रोख/उधार - पैसे देऊन किंवा पेसे देण्याचे वचन देऊन
मदार	-	भिस्त. एखाद्यावर अवलंबून निश्चिंत होणे.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ संसार हे ओझं नाही हे बहिणाईंनी कोणत्या उदाहरणांतून सांगितले आहे?

२ संसाराच्या दुःखमय आणि सुखमय रूपाला कवयित्रीने कोणत्या दाखल्यांनी स्पष्ट केले आहे?

३ संसारात दुःखाला होकार आणि सुखाला नकार असतो म्हणजे काय?

४ संसार हा सुखदुः खाचा व्यापार आहे असे बहिणाई का म्हणतात?

५ या कवितेतून कवयित्रीची संसारावरील निष्ठा कशी व्यक्त होते?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ आधी हाताले चटके तव्हा मियते भाकर

२ राउळाच्या कयसाले लोटा कधी म्हनू नहीं

३ येडया, गयातला हार म्हनू नको रे लोढनं

४ एका तोंडामधी कडू बाकी अवघा लागे गोड

५ देतो दुःखाले होकार अन सुखाले नकार

६ कधी नगद उधार सुखदुःखाचा व्यापार

भाषाभ्यास

या कवितेत तुम्ही शिकलेल्या मराठीपेक्षा वेगळे शब्द किंवा वेगळे रूप कुठे आढळते ते शब्द शोधून लिहा. त्यांचे प्रमाणभाषेतले शब्द लिहा.

उदाः- कयसाले - कळसाला.

पूरक लेखन/वाचन

बहिणाबाईंच्या 'मन वढाय वढाय' आणि 'कशाले काय म्हनू नाही' या कविता वाचून त्यांचे सार लिहा. संसार असार आहे, दुःखाचे मूळ आहे या संतांच्या, जोग्यांच्या उपदेशाला बहिणाबाईंनी दिलेले हे उत्तर आहे. त्यांनी केलेली ही संसाराची वकिली कशी प्रभावी आहे. ते तुमच्या भाषेत लिहा.

कविता चौथी

जन पळभर म्हणतिल हायहाय ।

कवी - श्री. भास्कर रामचंद्र तांबे
(जन्म १८७३ - मृत्यू १९४१)

परिचय

कवी भा. रा. तांबे हे ग्वाल्हेर संस्थानात राजकवी होते. त्यांनी तालबद्ध, रागबद्ध कविता लिहून मराठी कवितेला गेयतेची देणगी दिली. "आपली कविता आपल्या जीवनाबरोबरच वाढली" असे त्यांनी म्हटले आहे. जीवनात पत्नीने दिलेल्या प्रेमाच्या अनुभवावर त्यांनी मधुर गीते लिहिली. मुले लहान असताना गोड बालगीते लिहिली. उत्तर आयुष्यात ईश्वराच्या भक्तीविषयी कविता लिहिल्या. माळव्याचा निसर्ग, संस्थानातले मध्ययुगीन वातवरण यांचा ठसा त्यांच्या कवितेवर आहे. स्वतःबरोबर इतरांच्या मनातल्या प्रेमभावनेच्या विविध छटा त्यांनी आपल्या गीतांमधून व्यक्त केल्या. नाद-मधुर रचना, स्त्रीविषयी वाटणारा आदर, जीवनावर प्रेम करण्याची वृत्ती आणि सश्रध्द मन हे त्यांच्या कवितेचे विशेष आहेत. इंग्रजी, संस्कृत, बंगाली साहित्याचे ते जाणकार वाचक होते. आपल्या कवितांचे ते उत्कृष्ट गायन करीत.

जन पळभर म्हणतिल हाय हाय !

जन पळभर म्हणतिल हाय हाय !
मी जाता राहिल कार्य काय? ।। धृ ।।
सूर्य तळपतिल, चंद्र झळकतिल,
तारे अपुला क्रम आचरतिल

असेच वारे पुढे वाहतिल,
होईल काही का अंतराय? १
मेघ वर्षतिल, शेते पिकतिल,
गर्वाने या नद्या वाहतिल,
कुणा काळजी की न उमटतिल
पुन्हा तटावर हेच पाय? २
सखेसोयरे डोळे पुसतिल,
पुन्हा आपल्या कामि लागतिल,
उठतिल, बसतिल, हसुनि खिदळतिल
मी जाता त्यांचे काय जाय? ३
रामकृष्णही आले गेले
त्यांविण जग का ओसचि पडले?
कुणी सदोदित सुतका धरिले?
मग काय अटकले मजशिवाय? ४
अशा जगास्तव काय कुढावे?
मोहि कुणाच्या का गुंतावे?
हरिदूता का विन्मुख व्हावे?
का जिरवू नये शांतीत काय? ५

-'तांबे यांची समग्र कविता'.

शब्दार्थ

पळभर	-	क्षणभर
क्रम आचरणे	-	नेमून् दिलेले काम पार पाडणे
अंतराय	-	दुरावा - दूर गेल्याची, अंतर पडल्याची जाणीव
खिदळणे	-	थट्टाविनोद करून खदखदून हसणे
ओस	-	ओसाड, वैराण, शून्य.

सांस्कृतिक टिपा

सुतक - कुटुंबातली एखादी व्यक्ती मरण पावली तर तिच्या जवळच्या नातेवाईकांना दहा दिवस शोक पाळावा लागतो त्याला सुतक म्हणतात. या दिवसांत काही शुभकार्य करता येत नाही. देवपूजा करता येत नाही. सुतकात गोड पदार्थ खाणे, नवे कपडे घालणे इ. सुखोपभोग वर्ज्य असतात.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ माणसाच्या मृत्यूचा निसर्गावर काय परिणाम होतो?

२ आपल्या मृत्यूनंतर लोक काय करतील असे कवीला वाटते?

३ माणसाच्या मृत्यूचा नातेवाईक, मित्रमंडळींवर काय परिणाम होतो?

४ राम - कृष्णांसारख्या थोर व्यक्तींच्या मृत्यूचा जगावर काही परिणाम झाला का?

५ कवीने जगाच्या अनुभवांवरून कोणता निष्कर्ष काढला आहे?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ असेच वारे पुढे वाहतिल होर्रल काहि का अंतराय.

२ कुणा काळजी की न उमटतिल पुन्हा तटावर हेच पाय.

३ सखेसोयरे होळे पुसतिल पुन्हा आपल्या कामि लागतिल.

४ त्यां विण जग का ओ सचि पडले ? कु णी सदो दित सू तक धरिले ?

५ का जिरवू नये शांतीत काय ?

भाषाभ्यास

प्रश्न १ समानार्थी शब्द द्या.

पळ, तळप, क्रम आचर, अंतराय, मेघ, तट, सखेसोयरे, त्याविण, अटकले, जगास्तव, कुढणे, विन्मुख होणे.

प्रश्न २ 'सूर्य तळपतिल चंद्र झळकतिल तारे अपुला क्रम आचरतिल' या ओळींत ळ आणि र ही अक्षरे पुन्हापुन्हा आली आहेत. याला अनुप्रास अलंकार म्हणतात. तुमच्या भाषेतली अनुप्रासाची चार उदाहरणे द्या.

प्रश्न ३ खालील काव्यपंक्तींचे शब्द गद्याच्या क्रमानुसार लिहा.

१ मी जाता राहिल कार्य काय?

२ कुणा काळजी की न उमटतिल पुन्हा तटावर हेच पाय?

३ का जिरवू नये शांतीत काय?

प्रश्न ४ केवळ कवितेतच येणारे शब्द किंवा प्रत्यय शोधून लिहा. त्याची गद्यातली रूपे द्या.

उदाः- स्तव - साठी

पूरक लेखन/वाचन

प्रश्न १ या कवितेचा सारांश लिहा.

२ अशा अर्थाची कविता तुमच्या भाषेत असल्यास तिचा परिचय आणि अर्थ थोडक्यात लिहा.

३ 'मधुघट' आणि 'नववधू प्रिया मी' या तांब्यांच्या कविता वाचून त्यांचे सार लिहा.

४ 'जन पळभर' आणि वर उल्लेखलेल्या दोन कवितांच्या ध्वनिमुद्रिका लता मंगेशकरांच्या स्वरात उपलब्ध आहेत. या कविता ऐकून पाठ करा आणि म्हणून दाखवा.

कविता पाचवी

घरी

कवी - अनिल ऊर्फ
श्री. आत्माराम रावजी देशपांडे
(जन्म १९०१ - मृत्यू १९९२)

परिचय

कवी अनिल हे मराठीतील मुक्तछंदाचे प्रणेते. त्यांनी आपल्या खंडकाव्यांतून मुक्तछंदाची काव्यशास्त्रीय मीमांसा करून त्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. जीवनावर निष्ठा असलेले हे कवी.कुसुमावती हया त्यांच्या पत्नी. त्यांनी दोघांनी 'फुलवात' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. त्यानंतर 'सांगाती', 'पेर्ते व्हा'हे अनिलांचे संग्रह प्रसिद्ध झाले. वैयक्तिक अनुभवांनाही मानवतावादी दृष्टीची जोड आणि सामाजिकता हे त्यांच्या कवितांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या प्रेमकविता जीवनाला सामो-या जाणा-या आहेत. 'भग्न मूर्ती', 'निर्वासित चिनी मुलास' ही त्यांची वैचारिक खंडकाव्ये आहेत. 'दशापदी' या त्यांच्या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचे परितोषिक (१९७७) मिळाले होते. प्रेम आणि जीवन यांविषयीची त्यांची श्रद्धाच त्यांच्या कवितांमधून व्यक्त होते.

घरी

जाहल्या तिन्ही सांजा
दीप गगनी लागले
घरी शिणवील डोळे
कोणीतरी

जाहल्या तिन्ही सांजा
किती वाढला अंधार
घरी काळजीत फार
कोणीतरी

जाहल्या तिन्ही सांजा
काळोख झाला दाट
घरी पाहतसे वाट
कोणीतरी

जाहल्या तिन्ही सांजा
नको राहू आता दुरी
घरी आठवण करी
कोणीतरी

जाहल्या तिन्ही सांजा
वाट ओळखीची जरी
घरी चिंता फार करी
कोणीतरी

जाहल्या तिन्ही सांजा
कोणीतरी घरा आले
पंचप्राण ओवाळिले
कोणीतरी

-'फुलवात'

शब्दार्थ

शिणवील	-	दमवील, थकवील
हुरहूर	-	काळजी, अस्वस्थता
पंचप्राण ओवाळले	-	(घरी सुखरूप आल्यावर) जीव ओवाळून प्रेम केले.

सांस्कृतिक टिपा

१ पंचप्राण ओवाळिले - प्रवासाहून आल्यावर घरात शिरताना तसेच घरात जात नाहीत. विशेषतः नवी नवरी, नवरा, लहान मूल घेऊन आलेली बाळंतीण, संकटातून वाचून परत आलेली व्यक्ती इ. बाहेर रस्त्यात अशुभ शक्ती त्यांच्यामागून येत असतात अशी समजूत आहे. घरात शिरण्यापूर्वी त्या माणसावरून भाकरीचा तुकडा किंवा दहीभात ओवाळून फेकून देतात. मग पायावर पाणी ओतून डोळ्याला पाणी लावून त्यांना घरात घेतात. भाकरी - दहीभात टाकण्यामागे अशी कल्पना आहे की, त्या अशुभ शक्तींनी त्याला त्रास देऊ नये. तो अन्नाचा घास घेऊन मागे फिरावे. या कवितेत पती सुखरूप घरी परत आला म्हणून पत्नी भाकरीचा तुकडा किंवा दहीभात न घेता आपले पंचप्राण ओवाळून टाकायला तयार आहे, अशी प्रेमाची उत्कटता वर्णन केली आहे.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा

१ 'घरी' या कवितेतले कोणीतरी कोण आहेत?

२ संध्याकाळच्या वेळी गृहिणीच्या मनाची अवस्था कशी असते?

३ 'अंधार दाटला' तरी घरापासून दूर रहाणा-या 'कोणालातरी' कवी काय उपदेश करतो?

४ कुटुंबजीवनातील प्रीतीच्या क्षणांचे वर्णन कवीनी 'घरी' या कवितेत कसे केले आहे?

५ 'घरी' या कवितेचे सौंदर्य स्पष्ट करा.

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ घरी शिणवील डोळे कोणीतरी

२ नको राहू आता दुरी
घरी आठवण करी - कोणीतरी

३ किती करावा उशीर
घरी हुरहूर फार - कोणातरी

४ कोणीतरी घरा आले
पंचप्राण ओवाळिले - कोणीतरी

भाषाभ्यास

प्रश्न १ समानार्थी शब्द द्या.

तिन्ही सांजा, दीप, गगन, शिणव, काळजी, काळोख, हुरहूर, वाट

पूरक वाचन/लेखन

१ तुमच्या भाषेतल्या अशा एखाद्या प्रेमकवितेचा परिचय करून द्या.

२ 'सुखरूप आहे ना ग' ही माधव जूलियनांची कविता आणि 'कुणास्तव कुणीतरी' ही रे. टिळकांची कविता वाचून त्यांचे सारलेखन करा.

३ 'घरी' ही कविता परंपरागत 'ओवी' या जातिवृत्तात आहे. मराठीत स्त्रीगीते, जात्यावर दळताना म्हणायची गाणी, संतांची कविता याच छंदात आहे. 'ओवी ज्ञानेशाची' असे म्हटले जाते. तुमच्याकडे आधुनिक कवी जुन्या परंपरागत छंदात लिहितात का? त्यांची थोडक्यात महिती लिहा.

४ या कवितेचे काव्यरूप भाषांतर करा.

कविता सहावी

फलाटदादा

कवी - श्री. बाळ सीताराम मर्ढेकर
(जन्म १९०६ - मृत्यू १९५६)

परिचय

बा. सी. मर्ढेकर हे मराठी नवकवितेचे जनक मानले जातात. दुस-या महायुद्धानंतरच्या, विशेषतः. मुंबईसारख्या महानगरातील यांत्रिक मानवी जीवनाचे चित्र मर्ढेकरांच्या 'काही कविता' 'आणखी काही कविता' मधून प्रथम आले. कवितांचा आशय आणि तो व्यक्त करण्याची पद्धती या दोन्ही बाबतीत मर्ढेकरांच्या कवितेत पूर्ण परिवर्तन दिसते. 'सौंदर्य आणि साहित्य' या त्यांच्या ग्रंथाने मराठी समीक्षेलाही नवे वळण दिले. मानवाच्या कृत्रिम, यांत्रिक जीवनाची विफलता त्यांच्या कवितेतून व्यक्त होत असली तरी हा कवी मानवी मूल्यांवर श्रद्धा असलेला आणि अतिशय ईश्वरनिष्ठ आहे. यंत्रयुगात जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न त्यांची कविता करते. त्यांच्या काही कवितांमधे तत्त्वचिंतन तर काहींमधे कोमल, हळुवार भावांची नाजूक चित्रेही आहेत.

फलाटदादा

फलाटदादा, फलाटदादा
येते गाडी, जाते गाडी,
फलाटदादा, आली ही --
पण

शिंगल पडला, गेली गाडी!
हिम्मत तुमची खरी पहाडी,
फलाटदादा, फलाटदादा,
कितीक गेला गडी तुडवुनी
छातीवरती तुमांस समदा!
फलाटदादा, फलाटदादा,
येते गाडी, जातेगाडी,
फलाटदादा, आली ही ---
पण
शिंगल पडला, गेली गाडी

फलाटदादा इंजनवाली
पसंद पहिली भपकेदार?
का आता ही विलेक्‌टिकीची
नक्‌टी नागिण तल्लख तार?
किती पायांची छोटया, मोठया
मऊ चामडी गेला हुंगुन,
किती बुटांच्या ठोकर टाचा
फलाटदादा, गेला पचवुन!
सपाट, नाजुक, नखरेबाज

बिलगुन गेल्या किती चंपल्या
किती रांगडी ठसकेदार
वहाण गेली दावित टिकल्या!
फलाटदादा, बोला वो तुमि!
आली गाडी, गेली गाडी,
परी न हसता, अथवा रडता,
रामरामचा फुफाट हरघडी!

किती बावटेवाले दादा
मुछीदार अन मुछीबगर बी,
हमाल-पोर्टर निळे तांबडे
तुमी पाहिले हजरंजबाबी!
पचक् पान हयो कुनी थुंकले,
कुनि मायेचे निरोप दिधले
बिडि - माचिस कुनि इकीत फिरले
विलायती कुनि मुके घेतले!
हर गार्डाची न्यारी शिट्टी,
हर ड्रायव्हरचा न्यारा हात,
तुमांस दादा, ठाऊक आहे
पर समद्यांची बारिक बात!

बोला वो तुमि, बोला वो तुमि,
फलाटदादा, आली गाडी,
उरात गुपिते कितीक तुमच्या?
बोला वो तुमि!
गेली गाडी.

किती तो-याने ऐटबाज अन
दिमाख दावित, घेत सलामी,
थ्रू गाडी ही येई - जाई
झगाळ जनु की रानीवानी!
मनात ठसली, फलाटदादा,
झोकदार ही पल्लेवाली?
फडाकडी वा लोकलगाडी
चटकचांदणी थिल्लर पटली?
लटांबराची गबाळ संथ
मालगाडि का बोलघेवडी
बरी वाटली ऐसपैसशी,
घरलक्ष्मी जनु यडीभाबडी?
फलाटदादा, बोला बोला!
मिस्किल शिंगल हिरवा झाला,

गेली गाडी.
फलाटदादा

आता तरि वो बोला, बोला!

मिस्किल शिंगल, भोळा सांधा,

सीधे रूळ नि खडी गोमटी,

कुरूप काळी पाठ लावता

ज्या जीवाला धरिले पोटी,

हया समद्यांच्या गोष्टी सांगा,

फलाटदादा, आली गाडी,
बोला वो तुमि! पाठ टेकतो

शिंगल पडला
गोली गाडी

फलाटदादा

फलाटदादा

बोला वो तुमि,

गेली गाडी!

बोला वो तुमि?

फलाट दादा,

फलाटदादा . . . . !

-'मर्ढेकरांची कविता'

शब्दार्थ

फलाटदादा	-	रेल्वेचा प्लॅटफॉर्म हा कुणी जिवंत माणूस आहे अशी कल्पना केली आहे.
शिंगल	-	सिग्नल
भपकेदार	-	थाटमाट डोळ्यात भरेल अशी
रांगडी	-	रानवट, ओबडधोबड. शहरी नाजूकपण नसलेली
हरघडी	-	प्रत्येक क्षणाला
ठसकेदार	-	पहाणाराच्या किंवा ऐकणाराच्या मनावर ठसा उमटवेल अशी चटकदार
मुछीदार/बिगर	-	मिशी असलेले/नसलेले
हजरजबाबी	-	ताबडतोप योग्य उत्तर चतुराईने देणारा.
तोरा	-	गर्व, ऐट
दिमाख	-	थाटमाट, श्रीमंतीचा अभिमान
पल्लेवाली	-	लांब, लांब अंतर कापणारी
फटाकडी	-	नखरेल, जादा धीट(स्त्री)
थिल्लर	-	उथळ स्वभावाची
चटकचांदणी	-	नटलेली, आकर्षक
लटांबर	-	मागून येणारी लहान लहान मुले
गबाळ	-	अव्यवस्थित. टापटिपीविषयी बेफिकीर असलेली
बोलघेवडी	-	खूप बोलणारी.
यडीभाबडी	-	साधीभोळी

उरात	-	हृदयात
न्यारा	-	निराळा

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ कवीला 'फलाटदादा' कवितेतून काय सुचवायचे आहे?

२ निरनिराळ्या चपलांच्या वर्णनातून कवीने त्या वापरणारी माणसे कशी उभी केली आहेत?

३ फलाटदादाला कोणाकोणाची गुपितं माहीत आहेत?

४ वेगवेगळ्या गाडयांच्या वर्णनातून निरनिराळ्या स्त्रियांचा स्वभाव कवीने कसा व्यक्त केला आहे?

५ 'फलाटदादा' ची माणुसकी कुठे दिसून येते?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१	कितीक गेला गडी तुडवुनी	छातीवरती तुमांस समदा
२	का आता ही विलेक्टिकीची	नकटी नागिण तल्लख तार
३	किती रांगडी ठसकेदार	वहाण गेली दावित टिकल्या
४	तुमांस दादा ठाऊक आहे	पर समद्यांची बारिक बात
५	उरात गुपिते कितीक तुमच्या	बोला वो तुमि
६	फटाकडी वा लोकल गाडी	चटकचांदणी थिल्लर पटली?
७	लटांबराची गबाळ संथ	घरलक्ष्मी जनु यडीभाबडी

भाषाभ्यास

प्रश्न १ मूळ इंग्रजी शब्द द्या.

फलाट, चंपल्या, शिंगल, मूछी, इंजन, बावटा, विलेक्‌टिकीची, माचिस

प्रश्न २ खालील शब्दांना प्रमाणभाषेतले शब्द द्या

गडी, चामडी, हरघडी, हयो, न्यारी, तुमांस, वहाण, मुछीबगर, कुनी, हर, समदा, रामराम, बी, इकीत, उरात, रानीवानी, यडीभाबडी, जनु.

प्रश्न ३ भपकेदार, नखरेबाज, मुछीबगर या शब्दांची फोड करा.

त्यातले प्रत्यय उर्दूतले आहेत. या कवितेत असे आणखीही शब्द आहेत. ते शोधून त्यांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ४ खालील शब्दांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

पहाडी हिंमत, भपकेदार, नखरेबाज, रांगडी, ठसकेदार, हजरजबाबी, गुपित, तो-याने, ऐटबाज, झोकदार, फटाकडी, चटकचांदणी, लटांबर, गबाळ, बोलघेवडी, ऐसपैस, यडीभाबडी, भोळी, मिस्किल

पूरक लेखन/वाचन

१ फलाटदादा बोलतो आहे अशी कल्पना करून संवाद लिहा.

२ या कवितेप्रमाणे तुम्ही एखाद्या रिक्षावाल्याशी बोलताहात अशी कल्पना करून असेच वर्णन लिहा.

३ या कवितेतले रूपक स्पष्ट करा.

४ या कवितेतल्या दोन सौंदर्यस्थळांचे सौंदर्य स्पष्ट करा.

कविता सातवी

जिप्सी

कवी. श्री. मंगेश केशव पाडगावकर
(जन्म १९३१)

परिचय

'धारानृत्य', 'छोरी', 'उत्सव', 'सलाम' हे मंगेश पाडगावकरांचे काव्यसंग्रह. 'भोलानाथ', 'बबलगम' हे बालगीतांचे संग्रह. निसर्ग, प्रेम आणि जीवनावरील श्रद्धा यांना त्यांच्या कवितेत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या कवितेत नादसौंदर्य आणि सुंदर कल्पनाचित्रे प्रामुख्याने आढळतात. 'सलाम' सारख्या संग्रहात त्यांनी राजकीय आणि सामाजिक जीवनातल्या नाकर्तेपणाचा जळजळीत भाषेत उपहास केला. पण आधीच्या कवितांमधून प्रेम आणि निसर्ग यांची गोड चित्रे दिसतात. या बाबतीत ते बोरकरांचे वारस आहेत. पाडगावकरांनी सुंदर गीतेही लिहिली आहेत. त्यांच्या 'सलाम' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचे पारितोषिक (१९८०) मिळाले आहे.

'जिप्सी' या कवितेत या कलावंताचे कलंदर मन व्यक्त होते. रूढ चाकोरी मोडून टाकण्याची आणि नित्य नव्या अज्ञाताचा शोध घेण्याची कलावंताची वृत्ती या कवितेतून प्रकट झाली आहे.

जिप्सी

एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून
आठवले बालपण जेव्हा होतो मी खेळत
होतो बांधीत मी घर सवंगडयांच्या संगत

कौले पानांची घराला आणि झावळ्यांच्या भिंती
आठवते अजूनही होतो रंगत मी किती!
पण अकस्मात होतो जात सारे उधळून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून!
शाळेतले ते दिवस पाटी - पुस्तक हातात
टोपी जरीची सुंदर - - - स्वारी निघाली थाटात
जाड काचेची चाळिशी लावूनिया डोळ्यांवर
होते बोलत पंतोजी उग्र रोखून नजर
पण ठरेचना मन चार भिंतींच्या जगात
उडे खिडकीमधून दूर दूरच्या ढगात
झाडे पानांच्या हातांनी होती मला बोलावीत
शेपटीच्या झुबक्याने खार होती खुणावत
कसे आवरावे मन? गेलो पळून तिथून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून!
आणि पुढे कशासाठी गेलो घर मी सोडून?
सारी सारी सुखे होती, काही नव्हतेच न्यून
पण खोल खोल मनी कुणीतरी होते दुःखी
अशा सुखात असून जिप्सी उरला असुखी
दिसू लागले डोंगर जरा मिटता लोचन
तिथे कुणीतरी मला नेऊ लागले ओढून
मिटलेल्या डोळ्यांपुढे खळखळणा-या लाटा - - -
सळसळणारी पाने - - - दूर पळणा-या वाटा

वाटांसवे त्या पळालो सारे काही झुगारून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून!
कधी कधी पहाटते उरी आपली प्रतीती
जाळीमधून धुक्याच्या तेज झिरपते चित्ती
जाचू लागते जिप्सीला ज्ञात विश्वाची चौकट
आणि जाणवते काही गूढ - - - अंधुक - - पुसट
खेळ मांडिलेला सारा पुन्हा उधळाया सजे
आपणच निर्मिलेले आपणच मोडू धजे
गूढ अज्ञात धुक्यात आणि जातसे बुडून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून!
घर असूनही आता घर उरलेले नाही
चार भिंतींची जिप्सीला ओढ राहिलेली नाही
कुणी सांगावे? असेल पूर्वजन्मीचा हा शाप
घडी सुस्थिरपणाची विसकटे आपोआप - - -
कुणीतरी साद घाली दूर अनंतामधून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून!

-'जिप्सी'

शब्दार्थ

जिप्सी - भटक्या टोळीतला मनुष्य. इथे भटक्या मनोवृत्तीचा

सवंगडी - मित्र

झावळ्या	-	नारळाच्या झाडाची पानं
संगत	-	सोबत, बरोबर,
चाळिशी	-	वयाच्या चाळीस वर्षांनतर लागणारा चष्मा.
पंतोजी	-	शाळेतले शिक्षक
ठरेचना	-	स्थिर होईना. थांबायला तयार होत नव्हते.
न्यून	-	उणे. काहीतरी कमी असणे.
झुगारून	-	फेकून देऊन, दूर लोटून.
प्रतीती	-	अनुभव, साक्षात्कार
झिरपते	-	पाझरते, कणाकणाने बाहेर येते (मातीच्या भांड्यातून पाणी बाहेर येते त्याला झिरपणे म्हणतात)
गूढ	-	रहस्यमय (Mystic)
सजे	-	सज्ज, तयार होतो
धजे	-	धाडस करतो.
साद	-	हाक.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ कवीच्या मनातला जिप्सी बाळपणीच कसा जागा झाला?

२ शालेय वातावरणात कवीचं मन का रमलं नाही?

३ संसार मांडल्यावरही कवी घराला का बांधला गेला नाही?

४ ज्ञात विश्वाची चौकट कवीला का जाचते?

५ 'घर असूनही आता घर उरलेले नाही' असे कवीला का वाटते?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ सांगून अर्थ स्पष्ट करा.

१ कौले पानांची घराला आणि झावळ्यांच्या भिंती

२ पण ठरेचना मन चार भिंतींच्या जगात

३ अशा सुखात असून जिप्सी उरला असुखी

४ जाचू लागते जिप्सीला ज्ञात विश्वाची चौकट

५ खेळ मांडलेला सारा पुन्हा उधळाया सजे.

६ घर असूनही आता घर उरलेले नाही

७ कुणीतरी साद घाली दूर अनंतामधून!

भाषाभ्यास

प्रश्न १ समानार्थी शब्द द्या

दडून, सवंगडी, संगत, उधळून, थाटात, चाळिशी, पंतोजी, ठरेचना, न्यून, असुखी, सवे, झुगारून, उरी, ज्ञात, ओढ

प्रश्न २ 'बालपण' याप्रमाणे 'पण' जोडून शब्द बनवा - तरुण, म्हातारा

पुढील शब्दांना 'पणा' जोडा - चांगला, वाईट, साधा, गरीब, प्रामाणिक, उदार, मोठा. या शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ३ खालील ओळीतील शब्दक्रम साध्या पद्धतीनी लिहा.

१ एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून

२ आठवते बालपण जेव्हा होतो मी खेळत

३ होतो बांधीत मी घर सवंगडयांच्या संगत

४ आठवते अजूनही होतो रंगत मी किती

५ पण अकस्मात होतो जात सारे उधळून
६ होते बोलत पंतोजी उग्र रोखून नजर
७ पण ठरेचना मन चार भिंतींच्या जगात
८ झाडे पानांच्या हातांनी होती मला बोलावत

प्रश्न ४ वरील कवितेत 'ळ' चा अनुप्रास असलेल्या ओळी शोधून काढा.

पूरक लेखन/वाचन

प्रश्न १ कवितेचा सारांश थोडक्यात लिहा.

२ जिप्सीबरोबर कवीचे कोणते साम्य आहे?

३ स्थिर आयुष्यात कलावंताला रस वाटत नाही अशी भावना कवी किंवा लेखकांनी तुमच्या भाषेत व्यक्त केली आहे का? असल्यास थोडक्यात माहिती लिहा.

४ 'तुझे गीत गाण्यासाठी' हे गीत मिळवून पाठ करा. त्याचा सारांश थोडक्यात लिहा.

कविता आठवी

नवा शिपाई

ऊर्फ श्री. कृष्णाजी केशव दामले. कवी केशवसुत
(जन्म १८६६ - मृत्यू १९०५)

परिचय

कृष्णाजी केशव दामले ऊर्फ कवी केशवसुतांना 'आधुनिक मराठी कवितेचे जनक' म्हणून ओळखले जाते. इंग्रजीतील स्फुट कवितांच्या वाचनातून तशा प्रकारची मराठी रचना केशवसुतांच्या पूर्वीपासून लिहिली जात होती. पण तिचे स्वरूप परावलंबी, अलंकरणात्मक, कृत्रिम होते. केशवसुतांनी प्रथम निसर्ग, प्रेम, सामाजिक आणि राजकीय विचार, तत्त्वचिंतन याविषयी स्वतःच्या भावना अकृत्रिम भाषेत व्यक्त केल्या. आत्मनिष्ठ अशा आधुनिक कवितांची सुरुवात केशवसुतांपासून झालेली दिसते. इंग्रजीतील sonnet सुनीत ही रचना मराठीत आणताना त्यांनी बरेच प्रयोग करून हा काव्यप्रकार यशस्वीपणे मराठीत रूढ केला.

राजकीय पारतंत्र्याचा असलेला केशवसुतांचा काळ सामाजिक जागृतीचा होता. आगरकरांच्या सुधारकी विचारांनी केशवसुत प्रभावित झाले होते. त्यांनी रूढींचा, सामाजिक विषमतेचा निषेध केला. एका नव्या समाजरचनेचे स्वप्न पाहिले. त्यांची 'तुतारी' ही कविता तर 'सामाजिक प्रगतीची आर्ष ऋचा' मानली जाते. केशवसुतांची भाषा त्यांच्या कवितेच्या आशयाला शोभेल अशी, कृत्रिम गुळगुळीतपणा नसलेली आहे. तिच्यात नटवी, खोटी कोमलता नाही.

नवा शिपाई

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे

कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे
ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा
खादाड असे माझी भूक
चतकोराने मला न सूख
कूपातिल मी नच मंडूक
मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे १
जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत
कोठेही जा - पायाखाली तृणावृता भू दिसते
कोठेही जा - डोईवरते दिसते नीलांबर ते
सावलीत गोजिरी मुले
उन्हात दिसती गोड फुले
बघता मन हर्षून डुले
ती माझी, मी त्यांचा - एकच ओघ अम्हांतुन वाहे
नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे २
पूजितसे मी कवणाला? - तर मी पूजी अपुल्याला
अपुल्यामध्ये विश्व पाहुनी पूजी मी विश्वाला

'मी' हा शब्दच मजला नलगे, संपुष्टी हे लोक
आणुनि तो, निजशिरी ओढिती अनर्थ भलते देख
लहानमोठे मज न कळे
साधुअधम हे द्वयहि गळे
दूर - जवळ हा भाव पळे
सर्वच मोठे - साधु - जवळ त्या सकली मी भरुनी राहे
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे ३

-**'केशवसुतांची कविता'.**

शब्दार्थ

मनू	-	विशिष्ट काळ. जगाच्या उत्पत्तीपासून दुस-या उत्पत्तीपर्यंतच्या काळाला कल्प म्हणतात. या कल्पाचे चौदा भाग असून एकेका भागावर अधिपत्य करणारा एक मनू असतो असे मानतात.
दंम	-	ताकद, शक्ती
वठणीला आणणे	-	आज्ञाधारक बनवणे, ताळ्यावर आणणे (नाठाळ जनावराला)
खादाड	-	प्रमाणाबाहेर खाणारा.
चतकोर	-	भाकरी, चपातीचा चौथा भाग.
कूप	-	विहीर.
मंडूक	-	बेडूक

तृणावृता	-	गवताने झाकलेली, जिच्यावर गवत उगवले आहे अशी.
डोई	-	डोकं
नीलांबर	-	निळं आकाश
गोजिरी	-	नाजूक, सुंदर, मोहक. (पिल्लू, वासरू, मूल इ. साठी वापरतात)
ओघ	-	प्रवाह
नलगे	-	लागत नाही, नको
संपुष्टी	-	संपुष्टात. संपुष्ट म्हणजे लहान पेटी, डबा (प्रवासात देवाच्या मूर्ती ठेवायला उपयोगी) त्यात ठेवायचा पदार्थही लहानच असणार म्हणून संपुष्टात येणे म्हणजे कमी होणे, मर्यादित होणे असा अर्थ आला.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ कवीची स्वतंत्र वृत्ती कोणत्या शब्दांमधून व्यक्त होते?

२ जगातले सगळेच आपले आहेत हा अनुभव कवीला कशामुळे येतो?

३ कवीने वर्णन केलेले 'मी' आणि 'विश्व' यामधले नाते स्पष्ट करून सांगा.

४ कोणते भेद कवीला जाणवत नाहीत? का?

५ नव्या युगाची चाहूल कवीच्या कोणत्या विचारांतून व्यक्त होते?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा

२ मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे.

३ ती माझी - मी त्यांचा एकच ओघ अम्हांतुन वाहे

४ अपुल्यामध्ये विश्व पाहुनी पूजी मी विश्वाला

५ सर्वच मोठे - साधु - जवळ त्या सकली मी भरुनी राहे.

भाषाभ्यास

प्रश्न १ विरुद्ध अर्थाचे शब्द द्या.

शूर, आखडणे, खादाड, सावली, हर्षून

प्रश्न २ पुढील शब्दांसाठी प्रमाण भाषेतले गद्यातले शब्द द्या.

पाहे, नच, साहे, भू, डोईवरते, डुले, अम्हांतुनि, पूजितसे, कवणाला, अपुल्याला, नलगे, निजशिरी, मज, सकली, न, मजला.

प्रश्न ३ या कवितेली रूपक अलंकाराची उदाहरणे ओळखून लिहा.

प्रश्न ४ पुढील ओळींमधे शब्दांचा योग्य क्रम (अन्वय) लावाः

१ तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा

२ मी हा शब्दच मजला नलगे, संपुष्टी हे लोक आणुनि तो, निजशिरी ओढिती अनर्थ भलते देख

३ खादाड असे माझी भूक, चतकोराने मला न सूख.

प्रश्न ५ पुढील संस्कृत शब्दांसाठी मराठी शब्द द्या.

पतित, साकल्य, कूप, मंडूक, तृणावृता, नीलांबर, हर्षून, निजशिरी

पूरक वाचन/लेखन

१ नलगे - याचा अर्थ लागत नाही, नको असा आहे. या शब्दावरील मराठीत प्रसिद्ध असलेला श्लेष रघुनाथपंडिताच्या 'नलदमयंती स्वयंवराख्यान' या काव्यात आहे. नळराजाच्या विरहाने दमयंती आजारी पडते. तिची आई तिला

'औषध देऊ का' विचारते. दमयंती 'औषध नलगे मजला' (अर्थ - मला औषध नको, नळ हेच माझं औषध) असे श्लेषात उत्तर देते.

२ केशवसुतांची 'तुतारी' ही कविता वाचाः

३ नवजागृतीविषयी तुमच्या भांषेत असलेल्या एखाद्या कवितेचा मराठीत परिचय करून द्या.

४ 'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत' या कडव्यात व्यक्त झालेली भावना भाषाशिक्षणासाठी आल्यावर तुम्हाला अनुभवता आली का? तुमच्या अनुभवाचे थोडक्यात वर्णन लिहा.

कविता नववी

एका नव्या संघर्षात

कवी - श्री. नारायण सुर्वे
(जन्म १९२६)

परिचय

नारायण गंगाराम सुर्वे हे आजच्या काळातले साम्यवादी विचारसरणीचे कवी आहेत.मुंबईच्या गिरणगावात, कामगारांच्या वस्तीतच त्यांचा जन्म झाला. त्यामुळे दलितांचे, कामगारांच्या जीवनाचे प्रत्यक्ष अनुभव हेच त्यांच्या कवितांचे विश्व बनले. 'ऐसा गा मी ब्रहम', 'माझे विद्यापीठ' आणि 'जाहीरनामा' हे त्यांचे काव्यसंग्रह. कामगार वस्तीतील दुःखे, तिथला काळोख याबद्दल लिहितानाही कवीची भूमिका आशावादी संघर्षाची आहे. सुखवस्तू, गुलगुलीत दुनियेचा त्यांनी केलेला उपहासही तितकाच भेदक आहे. 'माझ्या मेहनतीच्या घामाचा वास जसा माझाच असतो तसाच तो मला कवितेत हवा असतो' असे हा कवी म्हणतो. 'माणसासाठी आणि माणसाविषयी' लिहिणा-या या कवीने सतत चिंता वाहिली ती प्रत्येकाला माणूस म्हणून सन्मानाने कसे जगता येईल याची. उत्कट भावनां, दाहक विचार आणि अचूक, राकट भाषा हे त्यांच्या कवितेचे विशेष आहेत.

एका नव्या सघर्षात

हा माझाही देश; आणि त्यातील हे पोकेपोकेसे लोक
आपल्या घरालाच असे पोकेपण यावे, तर काय करावे?
इथल्या वस्त्यांना हुंगणारा केवळ कातळाचा काळोख

कंदील खोपटास खोवून वावरू नये, तर काय करावे?
परमेश्वरसान्निध्य साधू पाहणारी ही पुरातन संस्कृती
आपली आपणच टवाळी करू नये, तर काय करावे?
ज्यांना जन्मभर दुःख, दैन्य, दारिध्रच मिळाले असेल
त्यांनी तपशीलासह सर्वच नाकारू नये; तर काय करावे?
आश्वासित शब्दांवर आता माझाही विश्वास उरलेला नाही
प्रत्येक संदर्भातून दुर्गंधीच येत आहे; तर काय करावे?
युद्धकैद्यांसारखा वाहणारा पुलावरून माणसांचा लोंढा
उजेडाची फुले त्यांचे हाती ठेवू नये; तर काय करावे?
थांबू तर शकत नाही ; आणि तुमचे हे असे औदासिन्य
एका नव्या संघर्षासाठी धुमाळीत घुसू नये, तर काय करावे?

-**'जाहीरनामा'**

शब्दार्थ

पोकेपोकेसे	-	पोक म्हणजे पाठीला आलेला बाक. पोका म्हणजे पाठीत वाकलेला इथे प्रतिकार न करणारा, लाचार.
हुंगणे	-	वास घेणे
कातळ	-	काळा कठीण पाषाण
खोपट	-	झोपडीवजा लहान घर

टवाळी	-	टिंगल, टर, कुचेष्टा
आश्वासित	-	आश्वासन म्हणून दिलेले
धुमाळी	-	युद्धाची, संघर्षाची ऐन गर्दी.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ निराशा वाटावी असे कवीला आपल्या समाजात कायकाय दिसते?

२ 'इथल्या वस्त्यांना हुंगणारा केवळ कातळाचा काळोख' या ओळीतून कवीला काय व्यक्त करायचे आहे?

३ हा कवी अगतिक आहे की आशावादी? कशावरून?

४ आपल्या संस्कृतीत कवीला कोणता विरोधाभास दिसतो?

५ आश्वासनांचा कवीला काय अनुभव आला?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ आपल्या घरालाच असे पोकेपण यावे; तर काय करावे?

२ प्रत्येक संदर्भातून दुर्गंधीच येत आहे ....

३ युद्धकैद्यांसारखा वाहणारा पुलावरून माणसांचा लोंढा ....

४ उजेडाची फुले त्यांचे हाती ठेवू नये; तर काय करावे?

५ थांबू तर शकत नाही, आणि तुमचे हे औदासिन्य.

भाषाभ्यास

प्रश्न १ 'केवळ कातळाचा काळोख' या शब्दरचनेत कोणता अलंकार आहे? अशीच दुसरी रचना या कवितेतून शोधून दाखवा.

प्रश्न २ पुढील शब्दांच्या विरूद्ध अर्थाचे शब्द द्या:

पोका, काळोख, टवाळी, दारिद्र्य, दुर्गंधी, संघर्ष, औदासिन्य

प्रश्न ३ पुढील शब्दांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा

हुंगणे, खोपट, टवाळी, लोंढा, धुमाळी

प्रश्न ४ खालील वाक्ये होकारार्थी करा

१ कंदील खोपटास खोवून वावरू नये.

२ आपली आपणच टवाळी करू नये.

३ त्यांनी तपशीलासह सर्व नाकारू नये.

४ उजेडाची फुले त्यांचे हाती ठेवू नये.

५ एका नव्या संघर्षासाठी धुमाळीत घुसू नये.

यातले अकर्मक आणि सकर्मक धातूंमधले बदल लक्षात घ्या.

प्रश्न ५ अन्वय लावा

युद्धकैद्यांसारखा वाहणारा पुलावरून माणसांचा लोंढा

प्रश्न ६ साधू पहाणारी - साधण्याचा, मिळवण्याचा प्रयत्न करणारी. साधण्याची इच्छा करणारी हा अर्थ. धातु + ऊ + पहा या रचनेतून हा अर्थ व्यक्त होतो उदा:-

१ तो काहीतरी बोलू पहात होता पण -

२ तुम्ही मराठी समाजात मिसळू पहाता.

३ मुलं मोठया माणसांसारखी वागू पहातात

अशी ५ वाक्ये बनवा.

पूरक लेखन/ वाचन

प्रश्न १ कातळाचा काळोख, संदर्भातून दुर्गंधी, उजेडाची फुले या रूपकांचे सौंदर्य खुलासेवार स्पष्ट करा.

२ या कवितेचा अर्थ गद्यात लिहून त्याचे तुमच्या भाषेत भाषांतर करा.

कविता दहावी

अशीच येते कधी एकदा

कवयित्री - श्रीमती इंदिरा ना. संत
(जन्म १९१४)

परिचय

श्रीमती इंदिरा संत या मराठीतल्या अग्रगण्य कवयित्री आहेत. प्रसिद्ध लघुनिबंधकार कै. ना.मा. संत यांच्या त्या पत्नी. 'शेला' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. त्यात तरुण स्त्रीच्या अनुभवविश्वातली चित्रे विलक्षण हळुवारपणे त्यांनी रेखाटली. निसर्गाच्या निरनिराळ्या रूपांचे चाकोरीबाहेरचे सूक्ष्म तपशील त्यांच्या कवितेत सापडतात. त्यांचे पती श्री. संत यांच्या अकाली निधनाने त्यांचे विश्वच बदलले. विरहाच्या, वेदनेच्या अनेक सूक्ष्मातिसूक्ष्म छटा त्यांच्या 'रंगबावरी', 'मेंदी', 'मृगजळ', 'मृण्मयी' इ. काव्यसंग्रहांतून आढळतात. स्त्रीच्या भोवती असलेलं जग मर्यादित असलं तरी तरल संवेदनक्षमतेच्या सामर्थ्यामुळे ती किती गूढ, खोल, उत्कट आणि अनेकपदरी अनुभव घेऊ शकते याचे अत्यंत गौरवशाली उदाहरण म्हणजे इंदिरा संतांची कविता. साधी पण अतिशय अर्थगर्भ, प्रतिमांनी समृद्ध, हळुवार शब्दयोजनेने साकारलेली त्यांची कविता मराठीत अत्यंत दर्जेदार कविता म्हणून मान्यता पावली आहे. त्यांच्या 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीने (१९८४) गौरविले होते.

अशीच येते कधी एकदा

अशीच येते कधी एकदा
उत्साहाला भरती ताजी

आणि मनाच्या अवकाशामधि
मनोरथांची आतषबाजी
कालच्याच त्या जुन्या जगाचे
आज बनावे नवे खेळणे;
तीन विटांच्या कष्टांवरती
भातुकलीचे चढते लेणे.
पाककुशलता चटणीपासुन,
वस्त्रांमधली रंगसंगती,
बाजारातुन सफर मजेने,
आणि कुणाशी गप्पागोष्टी.
उगाच वाटे फूल खुडावे - - -
उगाच वाटे गाणे गावे - - -
दुधामिठाचे हिशेब बथ्थड
निळ्या कागदावरी लिहावे
---लिहायचा तर लिहिता यावा
अशा क्षणांचा अर्थ सुसंगत
मनोमनाच्या कर्दळीवरी
कसा बहर हा चढतो रंगित

----'मेंदी'

शब्दार्थ

भरती - समुद्राचे पाणी वाढते त्याला भरती म्हणतात. पाणी ओसरते (कमी होते) त्याला ओहोटी म्हणतात.

आतषबाजी - दारूकाम. फुलबाज्या, चंद्रज्योती इ. शोभेची दारू उडवण्याचा खेळ

भातुकली - लहान मुलींचा 'घर घर' म्हणून मांडलेला खेळ. छोटया मुली स्वैपाक, लहान बाळाचे संगोपन, बाहुलाबाहुलीचं लग्न इ. खेळ खेळतात. छोटीछोटी खेळातली भांडी घेऊन खाऊच्या पदार्थांचा स्वैपाक करतात. या खेळाला भातुकली म्हणतात. तरुणपणीच्या संसाराचं हे बाळरूप म्हणता येईल.

बथ्थड - बोथट, मठ्ठ, ज्यात कसलीही बुद्धी, रसिकता नाही असे.

स्वाध्याय

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१ रोजच्या जीवनात कवयित्रीला कोणत्या गोष्टी कराव्या लागतात?

२ उत्साहाला भरती येते तेव्हा तिला काय करावेसे वाटते?

३ या अकस्मात येणा-या उत्साहाबद्दल कवयित्रीला काय वाटते?

४ उत्साहामुळे नीरस जीवनाचे रूप कसे पालटते?

प्रश्न २ खालील ओळींचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा.

१ आणि मनाच्या अवकाशामधि
मनोरथांची आतषबाजी

२ तीन विटांच्या कष्टांवरती
भातुकलीचे चढते लेणे

३ दुधामिठाचे हिशेब बथ्थड
निळ्या कागदावरी लिहावे

भाषाभ्यास

प्रश्न १ विरुध्दार्थी शब्द द्या.

उत्साह, ताजी, संगती, सुसंगत, बहर, रंगित

प्रश्न २ भरती येणे हा वाक्प्रचार आनंद, उत्साह, प्रेम इ. साठीच वापरतात हे लक्षात घ्या. दुःख, राग, निराशा यांच्यासाठी वापरत नाहीत. दिलेल्या शब्दांसह तुम्ही त्याची वाक्ये बनवा.

प्रश्न ३ 'अवकाश' चे दोन अर्थ आहेत. एक अर्थ सवड, मोकळा वेळ किंवा उशीर. यावरून'सावकाश'हा शब्द आला आहे.

उदा:- स्वैपाकाला थोडा अवकाश आहे, जरा थांब. कामातूनच थोडा अवकाश काढून एक फोन कर. दुसरा अर्थ आकाशाची पोकळी (space) यावरून 'अवकाशयान' हा शब्द. दोन्ही शब्दांचा तुम्ही वाक्यात उपयोग करा.

प्रश्न ४ लेणे - चेही दोन अर्थ आहेत. एक दागिना लेणी - लुगडी, अहेवलेणे, सौभाग्यलेणे इ.शब्दांमधे हा अर्थ आहे. दुसरा डोंगरात खोदलेले शिल्प. एकप्रकारे तोही पाषाणाचा दागिनाच असतो. उदा० अजिंठयाची लेणी.

प्रश्न ४ पाककुशलता म्हणजे स्वैपाक करण्यातले कौशल्य, निपुणता, सुगरणपणा. कुशल हा शब्द जोडून अन्य नामांपासूनही विशेषणे बनवता येतात.

उदाः- गानकुशल, नृत्यकुशल, वादकुशल, संभाषणकुशल. अर्थात हे शब्द गुणांसाठी बनवतात - दोषांसाठी नाही.

प्रश्न ५ 'खुडणे' हे क्रियापद पानं, फुलं, कळ्या, कणसं, झाडांचे शेंडे किंवा तुरे, मिरच्या इ.झाडावरून काढण्याला वापरतात. दिलेल्या नामांची 'खुडणे' क्रियापदासह वाक्ये बनवा.

पूरक लेखन/वाचन

१ कवयित्रीने या कवितेत वर्णन केलेला अनुभव तुम्हाला कधी येतो का? अशावेळी तुम्हाला काय करावेसे वाटते याचे वर्णन करा.

२ 'उदासीनता' ही बालकवींची कविता वाचून तिचे सार लिहा.

३ प्रेम आणि विरह या दोन्ही भावनांच्या सूक्ष्म छटा वर्णन करणा-या अनेक सुंदर कविता इंदिरा संत यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या संग्रहातून तुम्हाला आवडलेल्या दोन कवितांचे सार लिहा.